ई/४०७५६२

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

त्रैमासिक

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

खंड १७, वर्ष ५४, अंक ३–४

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या पुरस्काराने प्रकाशित)

अनुक्रमणिका

गो. त्र्यं. कुलकर्णी व मा. रा. कंटक,	मुघलांच्या सेवेतील ..मराठे सरदार	१
य. न. केळकर,	ज्योतिर्लिंग त्रिंबकेश्वर व जोगळेकर	१३
मा. रा. कंटक,	संभाजीकालीन...नवा प्रकाश	२३
शोभना गोखले,	कान्हेरी येथील अप्रकाशित ब्राह्मी लेख	३८
वसुधा गंधे,	लीलाशुक बिल्वमंगलाचे कृष्णकर्णामृत	४२
ग. ऊ. थिटे,	आकाशभैरवकल्पातील साम्राज्यलक्ष्मीपीठिका	४८
उषा रानडे,	प्रभुवंश : एक अध्ययन	५४
रा. पां. गोस्वामी,	बासष्टाव्या संमेलनाचा वृत्तान्त	५८
मु. श्री. कानडे,	हा 'लेखन–वर्णन' कार ज्ञानदेव कोण ?	६७
ग्रंथपरीक्षण व परिचय		७२
चिटणिसांचे निवेदन		७८

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११११ सदाशिव पेठ, ...
... चौक, पुणे–४११ ०३०

संपादन समिति

डॉ. म. श्री. माटे [कार्यकारी संपादक]

प्रा. ग. ह. खरे

डॉ. चिं. ना. परचुरे

डॉ. मु. श्री. कानडे

प्रा. व. स जोशी

© डॉ. चिं. ना. परचुरे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ; १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रकाशक : डॉ. चिं. ना. परचुरे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

मुद्रक : म. बा. जोशी, बी. ए. ज्ञानविलास छापखाना
२७, बुधवार पेठ, पुणे २.

शक १८९८ वैशाख शुद्ध १; (शक १८९५ चा अंक ३ व ४ म्हणून प्रसिद्ध केला आहे.)

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखातील मते किंवा विधाने याबद्दल मंडळाकडे उत्तरदायित्व नाही. त्याबद्दल लेखक सर्वस्वी जबाबदार आहेत.

२८३
व. भा
५६२
(९६१)
ई/४०८०

*मुघलांच्या सेवेतील काही प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध शिवकालीन मराठे सरदार

गो. त्र्यं. कुलकर्णी
मा. रा. कंटक

प्रस्तुत निबंध आंध्रप्रदेश सरकारच्या हैद्राबाद येथील दफ्तरखान्यातील काही अप्रकाशित फारशी कागदपत्रांवर मुख्यत: आधारलेला आहे.[१] या ऐतिहासिक कागदपत्रांपैकी बहुतेक कागद मुघल बादशाह शाहजहान याच्या काळातील, सन १६३० ते १६५३ च्या दरम्यानचे आहेत. अवरंगजेबाच्या काळातील फक्त दोनच कागद असून, ते सन १६७०–७१ च्या सुमाराचे आहेत. या कागदपत्रांचे सियाह हुजूर (दैनंदिन टिपणे किंवा अखबार), चेंहरा (मुघलांच्या चाकरीतील व्यक्तींची नाव, गाव, जातकुळीवार माहिती देणारी टिपणे), फर्माने (बादशाही आज्ञापत्रे), तजवीज (शिफारसपत्रे), परवानच्या (फर्मानांच्या संक्षिप्त नकला), याददाश्त (Memoranda अथवा भावी उपयोगासाठी काढलेली संक्षिप्त टिपणे), इत्यादि विविध प्रकार आहेत. या सर्व प्रकारच्या कागदपत्रांतून प्रामुख्याने शाहजहानच्या सेवेत असलेल्या मराठे सरदारांबद्दल थोडक्यात टिपणवजा नोंदी आलेल्या आहेत. त्यांवरून मुघलांची शासकीय पत्रे लिहून ठेवण्याची पद्धती कशी नेटकी होती हे कळून येते. तसेच या कागदपत्रांवरून शिवकालीन मराठे सरदारांविषयी काही नवीन माहिती उजेडात येत आहे.

तसे पाहिल्यास आजपर्यंत मराठेशाहीतील सरदारवर्ग आणि सरंजामी पद्धती यांचा पद्धतशीर अभ्यास फारच थोडा झालेला आहे. मुसलमान सरदारवर्गाबद्दल असा अभ्यास करण्याचा प्रयत्न काही प्रमाणात तरी झालेला दिसून येतो.[३]

---

* छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या राज्याभिषेकाच्या त्रिशतसांवत्सरिक महोत्सवानिमित्त मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळातर्फे (महाराष्ट्रेतिहास परिषदेतर्फे) आयोजित करण्यात आलेल्या मुंबई येथील अधिवेशनात दि. ३ नोव्हेंबर १९७४ रोजी वाचला गेलेला निबंध.

महत्त्वाच्या मुघल सरदारांची माहिती देणारे अकबर, शाहजहान, अवरंगजेब वगैरे बादशहांच्या काळातील ग्रंथ आजही उपलब्ध आहेत. दुर्दैवाने मराठे[४] सरदारांबाबत तशी परिस्थिती नाही. त्यांच्या संबंधात आजवर जो अभ्यास झालेला आहे तो मुख्यत्वे मराठी कागदपत्रे, कुलवृत्तान्त, यांत आलेल्या अपुऱ्या माहितीवरून. त्यातल्या त्यात पेशवाईतील मराठे सरदारांची जितकी माहिती उपलब्ध आहे तितकी शिवकालीन मराठे सरदारांची नाही.[४अ] या दृष्टीने पाहिल्यास प्रस्तुत निबंधाला आधारभूत असलेली हैद्राबाद–दफ्तरखान्यातील फारशी कागदपत्रे शिवकालीन मराठे सरदारवर्गाबद्दलच्या अभ्यासाला पूरक तसेच उपयुक्त ठरणारी आहेत.

या फारसी कागदपत्रांतून शाहजहानच्या दरबारातील ब्राह्मण आणि मराठा या दोन्ही जातींच्या मराठे सरदारांची तसेच अधिकाऱ्यांची माहिती आलेली आहे. त्यांपैकी साबाजी (संताजी ?) निंबाळकर, खंडेराय, राहुजी, लिंगोजी आणि कृष्णाजी भोसले, मलोजी आणि त्याचा मुलगा संताजी, धनाजी आणि त्याचा मुलगा पतंगराव, लखुजी जाधवरांवाचे संबंधित मुनोजी (मंबाजी ?), दयाजी, रामाजी, वाशीमच्या उदारामाचे चाकर गोविंदजी आणि मुकुंदजी पंडित, कृष्णाजी सर्जेराव गाढे याचे सेवक जगन्नाथराव आणि यशवंतराव, गाढ्याचा वकील गोविंद रायाजी पंडित, दत्ताजीचा मुलगा जगदेवराव, ही नावे नव्यानेच पुढे येत आहेत. या कागदपत्रांत इतिहासाला परिचित अशी जी नावे आहेत त्यात शाहजीचे चुलतभाऊ मालोजी आणि परसोजी भोसले, हमीरराव (हंबीरराव) चव्हाण, कृष्णाजी सर्जेराव गाढे, उदाजीराम, ही प्रमुख होत. या सर्व परिचित, अपरिचित सरदारांविषयी अधिक संशोधन होणे जरूर आहे.

मालोजी भोसले, परसोजी भोसले, उदाजीराम, हंबीरराव चव्हाण आणि कृष्णाजी सर्जेराव गाढे या पाच सरदारांचे उल्लेख शिवभारतात आलेले आहेत. त्यांच्यापैकी मालोजी, परसोजी आणि उदाराम या तिघांविषयी शिवभारतकाराने किती अचूक माहिती दिलेली आहे[५] हे इतर ऐतिहासिक साधनांवरून सिद्ध झालेलेच आहे. याखेरीज त्याने हंबीरराव चव्हाण आणि कृष्णाजी सर्जेराव गाढे यांच्याबद्दल जो तपशील दिलेला आहे तो विशेष लक्षणीय आहे. हंबीरराव चव्हाण सन १६२४ च्या भातवडीच्या लढाईत निजामशहाच्या बाजूने आदिलशाह–मुघल युतीविरूद्ध लढला, त्या लढाईत त्याने पराक्रम गाजवला, असे शिवभारतकाराने वर्णन केलेले आहे.[६] बागलाणच्या मोहिते घराण्यात 'हंबीरराव' ही पदवी शिवाजीमहाराजांपूर्वीपासून चालत आलेली होती, त्या घराण्याचे पूर्वीचे आडनाव चव्हाण होते, हे प्रा. ग. ह. खरे यांनी ऐतिहासिक फारसी साहित्याच्या द्वितीय खंडात दाखवून दिलेले आहे.[७] चव्हाण घराण्याचे हे वैशिष्ट्य शिवभारतकारास

माहीत होते असे दिसते. भातवडीच्या लढाईचे वर्णन करताना दोनदा त्याने हंबीरराव चव्हाणाचा 'हम्मीरराज' असा उल्लेख केलेला आहे.[८] तसेच १६६१ च्या उंबरखिडीच्या लढाईत सर्जेराव गाढे हा मुघल सरदार कारतलबखान याच्या सैन्यात होता,[९] असे परमानंद सांगतो. म्हणजे सर्जेराव गाढे हा मुघलांच्या चाकरीत होता आणि त्याला 'सर्जेराव' ही पदवी होती ही गोष्ट त्याला ठाऊक होती. सर्जेराव गाढ्याचे नाव कृष्णाजी होते हे तेवढे त्याला ठाऊक नव्हते. प्रस्तुत निबंधात वापरलेल्या फारसी कागदपत्रांवरून, गाढ्याचे नाव कृष्णाजी होते हे प्रथमच समजून येत आहे; त्याचप्रमाणे गाढ्याला 'सर्जेराव' ही पदवी होती ही शिवभारतकाराची माहितीदेखील खरी ठरत आहे. यावरून असे वाटते की, 'शिवभारताच्या' विश्वसनीयतेबद्दल काही इतिहाससंशोधक जी शंका व्यक्त करतात ती बरोबर नाही. नवीन ऐतिहासिक पुरावा जसजसा उपलब्ध होत आहे तसतसे 'शिवभारता' चे प्रामाण्यही अधिकाधिक इतिहासाच्या कसोटीस उतरत आहे.

हैद्राबाद–दफ्तरातील फारसी कागदपत्रांत उल्लेखिल्या गेलेल्या मराठे सरदारांपैकी बहुतेकजण विदर्भ, खानदेश, मराठवाडा या प्रदेशातील दिसतात. पश्चिम महाराष्ट्रातील तसेच कोकण भागातील मराठे सरदारांचा उल्लेख या कागदपत्रांतून फारसा आढळत नाही. ही गोष्ट साहजिक आहे. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि सतराव्या शतकाच्या सुरुवातीस मुघल सत्तेचे आक्रमण उत्तर हिंदुस्थानातून दक्षिणेत सुरू झाले त्यावेळी तिचा प्रसार उत्तर आणि पूर्व महाराष्ट्रात लवकर झाला. हा प्रसार होत असताना मुघलांनी कोणकोणत्या ठिकाणी आपली ठाणी बसवून चौक्या उभारल्या यासंबंधीच्या नोंदी कालानुक्रमाने संबंधित फारसी कागदपत्रांत दिलेल्या आहेत. त्यावरून मुघल साम्राज्य बऱ्हाणपूर, आदिलाबाद, खानदेश, बागलाण, जालनापूर, वाशीम, पाटण, सुंदरवाडा, देवगाव, बालाघाट, पाईनघाट, तेलंगण, मराठवाड्यातील औसा, धारूर, नांदेड, नगर जिल्ह्यातील संगमनेर, शेवगाव, या प्रादेशिक क्रमाने दक्षिणेत विस्तार पावले, असे दिसून येते. त्याच्या विस्तारवादाला पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्रात निजामशाही, आदिलशाही, कुत्बशाही तसेच शिवाजीमहाराज यांचा जितका कडवा विरोध झाला तितका तो खानदेश, बागलाण, विदर्भ यांत झाला नाही. तेथील छोट्या छोट्या सत्ताधीशांनी फारसा प्रतिकार न करता आपल्या साहाय्यकर्त्या मराठे सरदारांसह मुघल सत्तेपुढे लोटांगण घातले. खानदेश–विदर्भातील या मराठे सरदारांपैकी अनेकजण त्यावेळी दक्षिणचा सुभेदार असलेल्या अवरंगजेबाला भेटून, मुघल दरबारी रीतिरिवाजांनुसार त्याला नजराणे देऊन, त्याची म्हणजे पर्यायाने शाहजहान बादशहाची मर्जी खूष ठेवण्याचा कसा प्रयत्न करीत, हे प्रस्तुत फारसी कागदपत्रांतील पुढील नोंदींवरून दिसून येईल :–

याददाश्त[१०]

भेट. मालोजी (भोसले) व त्याचा मुलगा वगैरे हे मिर्झा अहमद काफी याजबरोबर जळगावच्या ठाण्याहून दौलताबादेस अवरंगजेबाच्या भेटीस आले.

मल्लोजी–४ सदी	येसाजी २००	निसार ९ रु.
संताजी–२००	खंडोजी १००	निसार ५ रु.

सियाह हुजूर

१६ नोव्हेंबर, १६३७

राजपुत्र अवरंगजेब हा दौलताबादेस आला. वाटेत लिंगोजी (भोसले) ने त्याची भेट घेतली. लिंगोजीने अवरंगजेबास १०० अश्रफ्या आणि सात हत्ती नजर केले.

साबाजी (संताजी ?) निंबाळकर, पृथ्वीराज राठोड, दाऊदबेगखान, आणि मालोजी भोसले हे अवरंगजेबाच्या दरबारात हजर होते. भेट घेतली.[११]

१७ नोव्हेंबर, १६३७

राजपुत्र अवरंगजेबाच्या वाढदिवसानिमित्त कारतलबखान ३००० तीन हजारी, जाधवराय १००० एक हजारी, मुनोजी (मंबाजी ?), दयाजी, रुस्तुमराय, रामाजी आणि दत्ताजी यांनी होन आणि रुपये नजर केले.[१२]

२७ जून, १६४४

मालोजी भोसले यास खिलअत आणि फर्मान देण्यात आले.[१३] नमुन्यादाखल या तीन–चार नोंदी पुरेत. संबंधित फारसी कागदपत्रांतून अनेक मराठे सरदारांबद्दल अशा नोंदी आलेल्या आहेत. निजामशाही वगैरे शाहयांप्रमाणेच मुघलांनाही दक्षिणेत साम्राज्यविस्तार करण्यासाठी स्थानिक मराठा जमीनदार आणि सरदारवर्गाला कसे हाताशी धरावे लागले हे या सर्व नोंदीवरून उत्तम तऱ्हेने समजून येते. महाराष्ट्रातील जमीनदारवर्ग, मग तो कोणत्याही भागातील वा जातीचा असो, वतनाच्या किंवा मनसबीच्या लालसेने परकीय सत्तेपुढे लाळ घोटण्यास नेहमीच तयार असे. अशा स्वाभिमानशून्य सरदारवर्गाला टक्कर देत शिवाजीमहाराजांना स्वराज्याचा पाया घालावा लागला.

मराठे सरदारांच्या स्वाभिमानशून्यतेचे एक उत्तम उदाहरण प्रस्तुत फारसी कागदपत्रांतील नोव्हेंबर, १६३७ च्या एका टिपणात आलेले आहे.[१४] कृष्णाजी भोसले या सरदाराची मुलगी नगरजवळील करडे निमोणे या गावी रहमत नावाच्या

एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या हाती सापडली. त्याने तिला सन १६३६ च्या माहुलीच्या मोहिमेत खानजमान याजकडे पाठविले. मालोजी भोसले यान तिला सोडविण्यासाठी ३००० रु. देण्याचे मान्य केले. तेव्हा कृष्णाजीच्या मुलीस सोडून देण्यात आले. यासंबंधात पैसेवसुलीसाठी कलंदरबेग बरकंदाज याला अंबड येथे पाठविण्यात आले. तो दौलताबादेस परत आला आणि त्याने मालोजीकडून १५०० रु. आणून खजिन्यात भरले. हा प्रसंग शिवकालीन मराठे सरदारांच्या मनोवृत्तीवर विदारक प्रकाश पाडणारा आहे. कृष्णाजी भोसल्यासारख्या प्रतिष्ठित आणि मुघल बादशहाशी एकनिष्ठ मराठा सरदाराची मुलगी मुघलांनी पळवावी आणि तिला सोडविण्यासाठी शिवाजीमहाराजांचे चुलत चुलते मालोजी भोसले यांनी पैसे भरावेत, यापरता दैवदुर्विलास कोणता ? कोठे स्त्रीच्या अब्रूला प्राणपणाने जपणारे शिवाजीमहाराज, तर कोठे स्त्रीची विटंबना सहन करणारे गुलामी वृत्तीचे त्यांचे हे सगेसोयरे ! शाहजीचा दुसरा एक चुलतभाऊ खेळोजी भोसले याच्यावरही कृष्णाजीसारखाच प्रसंग आलेला होता. त्याच्या बायकोला मुघल सरदार महाबतखान याने पळवून नेले. तिच्या सुटकेसाठी काही रक्कम त्याला मुघलांना द्यावी लागली.[१५] धन्य ते कृष्णाजी–खेळोजी की ज्यांची स्वामिनिष्ठा अशा गोष्टी घडत असूनही अभंग राहिली ! त्यांच्या या स्वामिनिष्ठेचे चीज बादशहांनी कसे केले ? तर या स्वामिनिष्ठ हुजऱ्यांपुढे जहागिरींचे आणि मनसबींचे चतकोर तुकडे टाकून, त्यांच्या सेवेचा यथेच्छ उपभोग घेत, आपल्या साम्राज्याची आणि खजिन्याची धन करून !

दक्षिणेतील शाह्यांशी झुंजायला उपयोगी पडावेत म्हणून शाहजहानने आपल्या गळाला लावलेल्या मराठे सरदारात केवळ लहान असामीच होत्या असे नाही. बड्या तोलदारीची घराणीही त्यात होती. याची अनेक उदाहरणे हैद्राबाद-दप्तरातील कागदपत्रांतून देता येतील. लखुजी जाधवरावाच्या खुनानंतर पण डिसेंबर १६३० पूर्वी त्याच्या घराण्याला परगणे मुधोळ, सरकार नांदेड, येथे ५,५०,००० दामांची जाहगीर होती.[१६] लखुजीच्या खुनानंतर दोनतीन वर्षांतच त्याचा मुलगा बहादुर याला ५००० स्वारांची मनसब मिळाली.[१७] शाहजीचा चुलतभाऊ मालोजी भोसले याला नोव्हेंबर १६३७ त ३००० जात २००० स्वारांची मनसब होती.[१८] हंबीरराव चव्हाण याला १६४० त ५०० जात २०० स्वारांची मनसब असून; परगणे लोहारा, सुभा खानदेश आणि परगणे टाकळी, सुभे वऱ्हाड, येथे एकूण २९, ६१, ५१० दामांचा तनखा नेमून दिलेला होता.[१९] कृष्णाजी सर्जेराव गाढे हे तर एक बडे प्रस्थ होते. सन १६४३-४४ त त्याला सुभे वऱ्हाड येथील चिखली, औंढा, मूर्तिजापूर, अमरावती, मांडव वगैरे परगण्यात एकूण ४५,५०,०००दामांची जाहगीर असून, ५०० जात ३०० स्वारांची मनसब होती.[२०] जुलै १६४४ मध्ये साबाजी (संताजी ?) निंबाळकर याला ३००० तीन हजारी जात असून, हरणगाव

येथे जाहगीर होती. [२१] खंडेराय याला डिसेंबर १६४४ पूर्वी वऱ्हाडातील वाशीम परगण्यात दोन कोट सतरा लाख दामांची जाहगीर होती.

या सरदारांपैकी कृष्णाजी आणि लिंगोजी या जोडीचे भोसले घराणे कोठले ते निश्चित कळत नाही. कृष्णाजी नावाचा शाहजीचा लांबचा भाऊ (Cousin) होता, असा उल्लेख गोवे येथे जतन करून ठेवलेल्या विजारपूरसंबंधीच्या बातमीपत्रात आहे, असे कै. जदुनाथ सरकार यांनी आपल्या 'हाऊस ऑफ शिवाजी' या ग्रंथात म्हटलेले आहे. [२३] त्याचप्रमाणे ऐतिहासिक फारशी साहित्य, खंड ५, भाग २ मध्ये क्र. १०७ च्या पत्रात एका कृष्णाजी भोसल्याचा उल्लेख आलेला आहे. त्या उल्लेखाप्रमाणे, कृष्णाजी भोसल्याचे आलमेले परगण्यातील बंदहाळ (बुदहाळ ?) गावचे वतन अमानत करण्याबद्दल मुहम्मद आदिलशाह याचा आलमेल्याच्या देसायाना २१ सप्टेंबर, १६२७ रोजी हुकूम सुटलेला आहे.[२४] शाहजीचा चुलत–भाऊ मालोजी याने कृष्णाजी भोसल्याच्या मुलीला सोडविण्यासाठी ज्याअर्थी आपल्या पदरचे पैसे मुघलांकडे भरले त्याअर्थी प्रस्तुतच्या फारसी कागदपत्रांत आलेला कृष्णाजी भोसले आणि कै. जदुनाथ सरकार ज्याचा शाहजीचा लांबचा भाऊ म्हणून हाऊस ऑफ शिवाजीमध्ये उल्लेख करतात तो कृष्णाजी; ही बहुधा एकच व्यक्ती असावी. मुघलांकडे येण्याआधी कृष्णाजी विजापुरकरांच्या नोकरीत असावा. मुहम्मद आदिलशहाने त्याला आपल्या पत्रात हरामखोर म्हणून संबोधिलेले आहे. त्यावरून, मुहम्मद आदिलशहाची कोणत्या तरी कारणाने खप्पा मर्जी झाल्याने हा मुघलांना येऊन मिळाला असावा, असे दिसते. पण या बाबतीत ठामपणे विधान करण्यापूर्वी इतरत्र आणखी काही पुरावा मिळतो का याचा शोध घेतला पाहिजे.

खानदेश-वऱ्हाडातील इतर मराठे सरदारांप्रमाणे कृष्णाजी आणि लिंगोजी यांच्या तनखेजहागिरींची नोंद प्रस्तुत लेखाशी संबंधित फारशी कागदपत्रांत आढळत नाही. पण ते मोठे वजनदार असून, त्यांचे लागेबांधे शाहजहानपर्यंत पोहोचलेले दिसतात. याचा अर्थ असा की सतराव्या शतकाच्या सुरुवातीस शिवाजीमहाराजांचे भोसले घराणे तेवढेच कर्तबगार होते असे नसून इतर अनेक भोसले घराणीदेखील आपापल्या परीने पराक्रम गाजवीत होती. प्रा. श्रीराम शर्मा यानी आपल्या 'Religious Policy of the Mughal Emperors' या ग्रंथात शाहजहान आणि अवरंगजेब यांच्या पदरी असलेल्या ज्या हिंदु मनसबदारांची यादी दिलेली आहे, तीत भोसले आडनावाच्या काही व्यक्ती आहेत. भोसल्यांप्रमाणेच जाधवरावाचे घराणे पराक्रमी आणि परंपरेच्या दृष्टीने अधिक पुरातन. लखुजी जाधवरावाने जशी इमानेइतबारे निजामशाहीची सेवा केली तशीच त्याच्या मुलानातवंडांनी मुघलांची करून आपला वडिलार्जित वारसा पुढे चालू ठेवला. गाढे,

निंबाळकर, जाधवराव, भोसले, चव्हाण यांच्यासारखी मोठमोठी कर्तृत्ववान मराठे घराणी मुसलमानांच्या सेवेत राबल्याने शिवाजीमहाराजांच्या उदयापूर्वी महाराष्ट्रातील एकंदर समाज गुलामगिरी आणि अज्ञान यांच्या अंधकारात खितपत राहिला. या सर्व सरदारांचा वैयक्तिक लाभ, उत्कर्ष झालाही असेल, परंतु समाजातील सर्वसामान्य माणसाची उपेक्षा ही पूर्वीप्रमाणेच चालू राहिली. अशा या उपेक्षितांना हाती धरून शिवाजीमहाराजांनी स्वराज्य, लोकराज्य मिळवून दाखविले, या पार्श्वभूमीवर महाराजांचे कर्तृत्व हे अधिक विशाल आणि उठावदार दिसून येते.

तथापि एक गोष्ट खरी की अनेक मराठे सरदार मुघलांच्या सेवेत शिरल्याने आदिलशाही, निजामशाही वगैरे शाहयांप्रमाणेच मुघल सत्तादेखील दक्षिणेत मोठ्या प्रमाणावर मराठे सरदार-जाहगिरदारांवर अवलंबून राहिली. मुघल साम्राज्यात मराठ्यांना फार मोठ्या जबाबदारीच्या वरच्या श्रेणींच्या जागा क्वचित देण्यात येत हे खरे, पण मुघल राज्ययंत्रणेची तळाची बाजू किंवा पाया हा मात्र दक्षिणेत सर्वस्वी मराठ्यांवर आधारलेला राहिला. या गोष्टीचा फायदा पुढे मराठ्यांना त्यांच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर मिळाला. स्वातंत्र्ययुद्धात मुघलांची सत्ता महाराष्ट्रात खिळखिळी झाल्यावर नेमाजी शिंदे, परसोजी भोसले इत्यादि मराठे सरदारांनी मुघलांविरुद्ध चढाईचे धोरण स्वीकारले. त्या वेळी खानदेश, वऱ्हाड वगैरे भागात आपल्या सामर्थ्याचा प्रभाव पाडणे त्याना सोपे गेले; कारण तेथील मराठे जहागिरदार, मुघल बादशाहीचा त्यांच्यावरील दाब शिथिल झाल्याने मराठ्यांना येऊन मिळाले. हे मराठे जहागिरदार मुघली अमलात जमिनीचा वसूल गोळा करून त्यावर आपली सैन्ये उभारीत. त्यांच्या आर्थिक व लष्करी बळाचा पुरेपूर फायदा मराठी स्वराज्याला मिळाला.

मुघल जागीर अगर मनसब ही बादशहांच्या मर्जीनुरूप एकाची दुसऱ्याला दिली जात असे. त्याप्रमाणे शाहजहान बादशहाने केल्याची अनेक उदाहरणे संबंधित फारसी कागदपत्रांतून आढळून येतात. या बाबतीत त्याने धार्मिक पक्षपात केल्याचे मात्र दिसत नाही. त्याच्या आज्ञेवरून २९ डिसेंबर १६३० रोजी लखुजी जाधवरावाच्या घराण्यातील परगणे मुधोळ, सरकार नांदेड, सुभे बिदर येथील ५,५०,००० दामांची जाहगीर काढून घेण्यात येऊन ती मीर झियाउद्दीन हुसेन वलद मीर अली असगर याला देण्यात आली. [२५] या उलट १६ मार्च, १६४३ रोजी फिरोज दखनी या मुसलमानाची जाहगीर कृष्णाजी सर्जेराव गाढे याला देण्यात आली. [२६] त्याच साली कृष्णाजीचा सेवक यशवंतराव याला भोज याची १०० जात १०० स्वारांची मनसब तगीर करून देण्यात आली. तसेच परगणे चिंचोली येथील अहमदखान घोरी याची १६,५०,००० दामांची जाहगीर खंडेराय याच्या नावावर करण्यात आली. २६ एप्रिल, १६४४ रोजी खंडेराय याची वाशीम वगैरे परगण्या-

तील दोन कोटी सत्तर लाख दामांची जाहगीर उदाराम याला देण्यात आली. [२७] या सर्व व्यवहारामागे, कोणत्याही जाहगिरदाराला एखाद्या विशिष्ट ठिकाणी आपले हितसंबंध निर्माण करून डोईजड होऊ न देण्याचे मुघल बादशहांचे धोरण दिसून येते. या धोरणामुळेच शाहजहानच्या कारकिर्दीत मुघलांच्या मध्यवर्ती सत्तेचा वचक तिच्या सरदार-जाहगिरदारांवर टिकून राहिला. परिणामी, मुघल साम्राज्य सदोष अशा सरंजामशाहीवर उभारलेले असूनही सतराव्या शतकाच्या सुरुवातीस हिंदुस्थानात वेगाने विस्तार पावू शकले.

मुघलांच्या सेवेत तत्पर असलेल्या मराठे सरदारांकडून शिवाजीमहाराजांना स्वराज्य उभारणीच्या कार्यात कसा अडथळा होई हे संबंधित फारसी कागदपत्रांतील २४ मे १६७० च्या[२८] टिपणावरून दिसून येईल. या सुमारास दत्ताजी जाधवराव* याचा मुलगा जगदेवराव हा नगरजवळील करडे निमोणे या ठाण्याचा मुघलांच्या वतीने ठाणेदार होता. महाराजांनी मे १६७० त या ठाण्यावर हल्ला चढविला असता जगदेवरावने त्या ठाण्याचे रक्षण केले. त्याबद्दल अवरंगजेबाने त्याच्या मनसबीत वाढ केली. महाराजांनी करडे निमोणे या मुघल ठाण्यावर सन १६५७ त हल्ला चढविला होता याची इतिहासात नोंद झालेली आहे. [२९] पण त्या ठाण्यावरील त्यांच्या १६७० मधील दुसऱ्या हल्ल्याची माहिती नवी आहे.

महाराजांचा सेनापती हंबीरराव मोहिते हा देखील शाहजहानच्या सेवेत असलेल्या मराठे सरदारांच्या गुलामी वृत्तीचा होता की काय असे क्षणभर वाटायला लावणारी सन १६७१ ची एक नोंद प्रस्तुत फारसी कागदात आलेली आहे. [३०] या नोंदीवरून असे दिसते की १६७० च्या अखेरीस हंबीरराव मोहिते याने जाधवरावाच्या वकिलामार्फत मुल्हेरगडावरील मुघल अधिकारी नेकनामखान याच्याकडे एक अर्ज पाठविला. आपल्याला बादशाही सेवेत घेण्याबाबत अवरंगजेबाकडे शिफारस करावी, हा हंबीररावाच्या अर्जाचा मथितार्थ होता. त्याचा अर्ज वाचून नेकनामखान मुल्हेर किल्ल्याच्या माचीवरून खाली आला आणि त्या किल्ल्याजवळ असलेल्या हंबीररावाकडे गेला. हंबीररावाचे म्हणणे ऐकून घेऊन आणि त्याला बरोबर घेऊन खान मुल्हेरगडाच्या आसपास तळ ठोकून बसलेल्या दाऊदखानाच्या गोटात दाखल झाला. हंबीररावाच्या अर्जासंबंधी नेकनामखान आणि दाऊदखान यांचे आपसात बोलणे झाले. नेकनामखानाने, हंबीररावास बादशाही सेवेत रुजू करून घ्यावे, अशी आपली शिफारस अवरंगजेबाला कळविण्यास दाऊदखानाला सांगितले. मग हंबीररावाचा अर्ज ७ जानेवारी १६७१ च्या वाक्यात दाखल करून घेण्यात आला. हंबीरराव बादशाही हुकमाची वाट पहात मुल्हेरगडाजवळ

*लखुजी जाधवरावाचा मुलगा बहादुर याचा पुत्र.

दाऊदखानाच्या लष्करात राहिला. त्याच्या अर्जावर अवरंगजेबाचा हुकूम झाला की हंबीरराव जेथे आहे तेथेच त्यास ठेवावे.

ही सर्व हकीगत ज्या टिपणात आलेली आहे त्यात केवळ 'हंबीरराव मोहिते' एवढाच व्यक्तिदर्शक उल्लेख आहे. तो कोण, कोठला इत्यादि काहीही माहिती दिलेली नाही. त्यामुळे हा हंबीरराव शिवाजीमहाराजांचा सेनापती हंबीररावच कशावरून, अशी शंका मनाला चाटून जाते. बागलाणच्या मोहिते घराण्यात 'हंबीरराव' ही पदवी शिवाजी महाराजांचे नाव प्रकाशात येण्यापूर्वीपासून चालत आलेली होती. त्या घराण्यातील एखाद्या व्यक्तीचा तर 'हंबीरराव' म्हणून उल्लेख आलेला नसेल ना, अशी दुसरी शंकाही मनात निर्माण होते. तथापि, नेकनामखानाने मुल्हेरगडाखाली उतरून हंबीररावाला जो मान दिला, तसेच त्याने, दाऊदखानाने आणि खुद्द अवरंगजेबाने हंबीररावाच्या अर्जाचा जो आदर केला तो पाहता, ७ जानेवारी १६७१ च्या टिपणातील हंबीरराव हा शिवाजीचा सेनापती हंबीरराव मोहिते होता, याबद्दल कसलाही संशय रहात नाही.¤

सन १६७० च्या अखेरीस हंबीररावाने मुघलांच्या सेवेत जाण्याबद्दल अर्ज करावा ही गोष्ट विचित्र वाटते. हा अर्ज करतेवेळी तो महाराजांचा मुख्य सेनापती नव्हता. महाराजाशी न पटल्याने त्याने मुघलांकडे जाण्याचा प्रयत्न केला म्हणावे तर समकालीन मराठी तसेच इतर कोणत्याही साधनात १६७४ च्या नेसरीच्या लढाईच्या आधीचा त्याचा पूर्वेतिहास उपलब्ध नाही. बरे, बादशाही सेवेत आपले ऊर्जित आहे असे वाटून त्याने महाराजांचा द्रोह केला म्हणावे, तर अशा व्यक्तीला महाराजांसारख्या मनुष्याची उत्तम पारख असलेल्याने, १६७४ त आपले मुख्य सेनापतिपद कसे दिले, असा प्रश्न पडतो. तेव्हा या बाबतीत दोनच प्रकारची शक्यता वाटते. ५ जानेवारी १६७१ ला सालेरीचा किल्ला महाराजांच्या ताब्यात आला. मुल्हेरचा किल्ला अजून त्यांच्या ताब्यात आलेला नव्हता. तो त्यांच्या ताब्यात जाऊ न देण्याची पराकाष्ठा दाऊदखान आणि नेकनामखान हे मुघल सरदार करीत होते. तेव्हा नोकरी मागण्याच्या निमित्ताने त्यांच्या गोटात जाऊन हेरगिरी करण्याचा हंबीररावाचा उद्देश असावा. अथवा दोन्ही खानांशी गोड बोलून वाटाघाटींनी मुल्हेरगड पदरात पाडून घेण्याचा त्याचा बेत असू शकेल. यापैकी कोणताही हेतू असो, हंबीररावाने महाराजांच्या संमतीने सर्व नाटक केले असावे असे म्हणावे लागेल. अर्थात हादेखील केवळ तर्कच आहे.

¤ प्रा. ग. ह. खरे या निष्कर्षाशी सहमत नाहीत. त्यांच्या मते, प्रस्तुत टिपणातील हंबीरराव हा शिवाजीचा सेनापती हंबीरराव होता असे ठाम मत मांडण्यास अधिक विश्वसनीय पुरावा उपलब्ध व्हावयास हवा.

सन १६७१ मधील हंबीररावासंबंधीच्या या घटनेने आणखी एक प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे, हंबीरराव मोहिते याला 'हंबीरराव' ही पदवी नेमकी केव्हा मिळाली, हा होय. सभासद [३१] आणि इतर बखरी यातील माहितीनुसार पाहता, १६७४ च्या नेसरीच्या लढाईत प्रतापराव गुजर मारला गेल्यावर पागेचा जुमलेदार हंसाजी मोहिते याला 'हंबीरराव' हा किताब देऊन महाराजांनी आपला मुख्य सेनापती नेमले. बखरीखेरीज इतर सर्व मराठी साधने हंबीररावाच्या किताबाविषयी गप्प आहेत. प्रा. ग. ह. खरे यानी ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड २ मध्ये, बागलाणच्या भिकूजी चव्हाण ऊर्फ मोहिते याच्यासंबंधीच्या सन १६३० आणि १६३८ या तारखांच्या फारसी पत्रांविषयी टीप देताना असे विधान केले आहे–' पण येथे भिकूजी मोहिते यास हंबीरराव उपपद लावलेले स्पष्ट दिसते. तेव्हा मोहितेकुलाला हंबीरराव हे उपपद शिवाजीच्या पूर्वीच मिळालेले आहे, ही गोष्ट उघड झाली.[३२]' हे विधान करताना खऱ्यांनी भिकूजी मोहिते आणि हंसाजी ऊर्फ हंबीरराव मोहिते यांचे घराणे एकच होते काय, किमानपक्षी दोन्ही घराण्यांचा जवळचा संबंध होता किंवा काय हे स्पष्ट केलेले नाही. तथापि ७ जानेवारी १६७१ च्या हंबीररावाबाबतच्या टिपणावरून एक गोष्ट मात्र स्पष्ट होते. ती म्हणजे, हंबीरराव मोहित्याची 'हंबीरराव' ही पदवी १६७४ च्या नेसरीच्या लढाईच्या आधीची आहे.

हैद्राबाद दफ्तरखान्यातील अप्रकाशित कागदपत्रांत आलेली शिवकालीन मराठे सरदारांविषयीची ही सर्व नवीन माहिती वाचून असे वाटते की त्या दफ्तरखान्यात शिवशाहीच्या इतिहासाला उपयुक्त अशी विपुल साधनसामग्री असली पाहिजे. या साधनसामग्रीचा योग्य परामर्ष घेतला तर शिवशाहीच्या इतिहासाच्या दृष्टीने ते एक वरदानच ठरेल.

–टीपा–

१. सदरहू कागदपत्रे डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांनी हैद्राबाद येथील दफ्तरखान्यात नकलून आणलेली आहेत.

३. उदा. 1) The Mughal Nobility under Aurangzeb, by M. Athar Ali 2) Nobility under the Sultans of Delhi, by S. B. P. Nigam 3) Parties and Politics at the Mughal Court, by Dr. Satishchandra.

४. या ठिकाणी 'मराठे' हा शब्द जातवाचक नाही. महाराष्ट्रातील सर्व जातीजमातींतील सरदार हा त्याचा अर्थ आहे.

४ अ. श्री. मनोहरसिंह राणावत यांच्या 'शाहजहाँ के हिन्दू मनसबदार' या छोटया हिंदी पुस्तकात शाहजहान बादशहाच्या पदरी असलेल्या मराठे सरदारांची नावे व काही मराठे सरदारांसंबंधी टिपणवजा माहिती दिलेली आहे. प्रतुत लेखातील माहिती त्यापेक्षा निराळी व नवीन आहे.

५. कवींद्र परमानंदकृत शिवभारत, संपा. स. म. दिवेकर, पुणे, १९२७, अध्याय ३।३, ४।११, ४।१२, ४।२५, २५।५२.

६. कित्ता, अ. ४।१३, ४।५०

७. ऐतिहासिक फारसी साहित्य, द्वितीय खंड, संपा. ग. ह. खरे, पुणे, १९३७ पृ. १–४.

८. टीप क्र. ६ प्रमाणे.

९. शिवभारत, अ. २८।६१

१०. हैद्राबाद दफ्तरातील शाहजहानसंबंधीचे अप्रकाशित कागद, क्र. ४५२१

११. कित्ता, क्र. ५५, १६ नोव्हेंबर, १६३७.

१२. कित्ता, क्र. ५६, १७ नोव्हेंबर, १६३७.

१३. कित्ता, क्र. ४९९, २७ जून, १६४४.

१४. कित्ता, क्र. ४९, नोव्हेंबर, १६४९

१५. मुगल दरबार भाग १ (नबाब समसाउद्दौला शाहनवाज खाँ याच्या मआसिर-उल्-उमरा या फारसी ग्रंथाचा हिंदी अनुवाद), अनुवादक व्रजरत्नदास, काशी, १९३१, पृ. ३०५.

१६. हैद्राबाद–दफ्तर अप्रकाशित कागद, क्र. ५, २९ डिसेंबर, १६३०.

१७. मुगल दरबार, भाग १, पृ. १७६–७८

१८. हैद्राबाद–दफ्तर अप्रकाशित कागद, २३ नोव्हेंबर, १६३०.

१९. कित्ता, सन १६४०

२०. कित्ता, क्र. ४४८, ४७१, १६ मार्च १६४३, २६ एप्रिल, १६४४

२१. कित्ता, क्र. ५२३, २१ जुलै, १६४४

२२. कित्ता, क्र. ५८२, ३० डिसेंबर, १६४४

२३. House of Shivaji, by Jadunath Sarkar, 3rd ed; Calcutta, 1955, P. 39.

२४. ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड ५, भाग २, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९६९, पत्र क्र. १०७, पृ. १०४

२५. हैद्राबाद–दफ्तर अप्रकाशित कागद, क्र. ५, २९ डिसेंबर, १६३०.

२६. कित्ता, क्र. ४४८, १६ मार्च १६४३

२७. कित्ता, क्र. ५८२, ३० डिसेंबर, १६४४

२८. कित्ता, २४ मे १६७०

२९. Chhatrapati Shivaji, by Setumadhavrao Pagadi, Poona 1974, P. 82. Shivaji and His Times, by J. Sarkar, 5th ed; Calcutta, 1952, P. 51.

३०. हैद्राबाद–दफ्तर अप्रकाशित कागद, ७ जानेवारी, १६७१.

३१. सभासदविरचित श्री शिवप्रभूंचे चरित्र, संपा. वि. स. वाकसकर, १९५७ पृ. ७६

३२. ऐतिहासिक फारसी साहित्य, द्वितीय खंड, पृ. ३–४, तळटीप क्र. २.

ज्योतिर्लिंग त्रिंबकेश्वर व जोगळेकर

य. न. केळकर

त्र्यंबकेश्वरच्या जोगळेकर पुजाऱ्यांच्या घराण्याची विश्वसनीय माहिती दामोदर गोविंद जोगळेकर यांनी वयाच्या ७२ व्या वर्षी श्रावण महिन्यात मुद्दाम 'पुढील पिढ्यांना कळावी' म्हणून लिहून ठेवलेली मला त्र्यंबकेश्वर येथील जोगळेकर दप्तरांत उपलब्ध झाली. ती लेखकाने मिळाला तितका कागदोपत्री दाखला पाहूनच लिहिली आहे; शिवाय घराण्यातील वृद्ध वृद्ध मंडळींनी विश्वसनीय म्हणून ज्या हकीगती सांगितल्या त्यांचाही नावनिशीवार तपशीलवार उल्लेख त्यांत केलेला असल्यामुळे या जोगळेकर घराण्याच्या हकीगतीच्या या इतिहासाला हरिवंश बखरी-सारखेच काही आगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे.

दामोदर गोविंद जोगळेकर शके १७७२ म्ह० सन १८५० साली बायजाबाई शिंदे याजकडे लष्कर ग्वाल्हेरउज्जैनकडे गेले व तिकडे १८ वर्षे होते, त्यावेळी त्यांचे वय ७२ झाले होते व काशीयात्रेसही जाण्याचा त्यांचा विचार ठरला होता. आपणास माहीत असलेली घराण्याची हकीगत व वहिवाट आपल्या पुत्रपौत्रास माहीत असावी म्हणून त्यांनी हा उद्योग केला.

मूळ अर्जक पुरुष नारो दामोदर जोगळेकर कोकणातून नक्की कोणत्या सालात त्र्यंबकास आले ते उपलब्ध नाही; पण 'वहिवाटीच्या दाखल्याचे आढळा-वरून' ते शके १६४० म्ह० सन १७१८ च्या सुमारास तेथे आले. प्रथम 'यात्रस्थ' म्हणून आलेले त्यांचे तीर्थउपाध्ये टेकाळे म्हणून होते त्यांचे घरी राहिले.

कोकणात निर्वाह होत नाही म्हणून इकडेच काही उद्योगधंदा पहावा असे त्यांच्या मनात आले. त्यांचे एक आप्त गोविंद हरी सहस्त्रबुद्धे या नावाचे नाशका-जवळ 'भोगूर' म्हणजेच सध्याचे 'भगूर' येथे रहात होते. त्याकाळी त्र्यंबकास मोगलाई कारकीर्द होती. मोगली अधिकाऱ्यांशी बोलणी-चालणी करण्याचे काम पेशव्यांना वारंवार पडे. म्हणून त्या कामावर पेशव्यांनी या गृहस्थांची नेमणूक केली होती. या सहस्त्रबुध्दयांच्याकडे जाऊन रोजगाराची काही खटपट होते का पहावी म्हणून नारो दामोदर त्यांचेकडे गेले.

नारो दामोदर सुस्वरूप, गौरवर्ण आणि देखणे होते; उमदे वाटत. शिवाय समयोचित बोलण्याचालण्यांत मोठे चतुर होते. सहस्त्रबुद्धे ह्यांनी त्यास आपल्या-कडेच ठेवून घेतले व 'कामाची वहिवाट व रीत समजण्याकरिता नाशिक क्षेत्र व त्र्यंबक किल्ला जरी मोंगलांच्या ताब्यात होता तरी त्या प्रांताची 'बाबती

सरदेशमुखी ही बाब' पेशव्यांच्या हक्कांची होती, तो अंमल किंवा ती बाब वसूल करण्याचे स्वतःचे काम सहस्त्रबुद्धयांनी नारो दामोदरास सांगितले. ही गोष्ट शके १६५५ च्या पूर्वीची म्हणजे सन १७३३ च्या पूर्वीची !

असा बस बसल्यानंतर नारोदामोदरांनी आपले चुलत बंधु नीळकंठ व त्र्यंबक नीळकंठ या दोघांना कोकणातून स्वतःजवळ आणले. सध्या क्षेत्र त्र्यंबक येथे जोगळेकरांचा जो वाडा आहे ते घर त्या सुमाराला म्हणजे सन १७३३ च्या आधी काही दिवस बांधले.

त्या काळी नाशकाचे सावकार पेठे यांचे जव्हार संस्थानात फार वळण व वजन होते. त्यांच्या मार्फत जव्हार संस्थानाची दिवाणगिरी नारो दामोदरास मिळाली. तेव्हा मग त्यांनी नाशिकचे स्वतःचे काम हरी नीळकंठास सांगितले.

नारो दामोदर जव्हारचा दिवाण झाला त्यावेळी ते संस्थान कर्जात संपूर्ण बुडून गेले होते व शिबंदीचा पैकाही वेळेवर देता येईनासा झाला होता, यामुळे ते लोक हातघाईला आले होते. नारो दामोदराने नाना उपाय योजून शिबंदीच्या पगाराची वाट लावून दिली व जव्हारकरास मोठ्या पेचातून सोडविले. तेव्हा खूष होऊन जव्हारकरांनी नारो दामोदर यास एक गाव इनाम करून दिला.

पुढे त्र्यंबक किल्ला जिकून गोदावरीक्षेत्र व ज्योतिर्लिंग निर्वेध करण्याचे पेशव्यांनी ठरविले. ते कारस्थान बरेच दिवस गुप्तपणे शिजत होते. त्याकामी नारो दामोदर व त्र्यंबक सूर्याजी प्रभू या दोघांची फार मदत पेशव्यास झाली. फितुराने किल्ला काबीज करण्यात आला. पुढे पेशवे स्वतः त्र्यंबकेश्वरास गेले, त्या वेळी त्यांनी किल्ल्याची व देवस्थानाची व्यवस्था लावून दिली. त्र्यंबकेश्वराची पूजाअर्चा प्रथम नारो दामोदराच्या हातानेच पुनः सुरू झाली !

नानासाहेब व भाऊसाहेब उभयता क्षेत्र मजकुरी आले तेव्हा त्यांनी नारो दामोदर व त्र्यंबक सूर्याजी यांचा वस्त्रादिक देऊन मोठा बहुमान केला व नारो दामोदरास मौजे तळेगाव पेटा त्रिंबक आणि त्रिंबक सूर्याजीस कोकणात कल्याणालगत मौजे परळी नावाचा गाव पुत्रपौत्रादि वंशपरंपरा इनाम करून दिले. याशिवाय त्यांना दरकीचा अधिकारही दिले. त्रिंबक किल्ल्याचा हवालदारीचा दरक त्रिंबक सूर्याजीस दिला आणि तेथील सबनीशीचा दरक नारो दामोदरास दिला.

पण या योजनेमुळे नारो दामोदरास थोडेसे वैषम्य वाटले. आपली कामगिरी महत्त्वाची झाली असता मिळालेला दरक त्या योग्यतेचा नाही असे त्यास वाटले व दरबारास जाणे टाळू लागला. त्यांनी दरबाराचे बोलावणे आल्यावर हरी नीळकंठास पाठविले तेव्हा भाऊसाहेब पेशव्यांनी विचारले की, 'दोन रोजांत नारोपंत नाना दरबारास का आले नाहीत ?' तेव्हा हरी नीळकंठानी, 'कां ते एकांती विदित करीन !' असे सांगितले तेव्हा त्याला एकांतात बोलावून नारो दामोदराचे सल

समजावून घेतले. तेव्हा भाऊसाहेब पेशवे नारो दामोदराचा रुसवा घालविण्यासाठी स्वतःच त्यांच्या घरी जाण्यास निघाले.हरी नीळकंठाने जलदी करून श्रीमंत भाऊसाहेब घरी येत असल्याचे नारो दामोदरास कळविले. तेव्हा स्वारीला सामोरे झाले पाहिजे. म्हणून नारो दामोदर मार्गाने चालते झाले तोच स्वारी घरानजीक दाखलही झाली. नारो दामोदराने आपल्याकडून करता येईल तेवढा सत्कार भाऊसाहेबांचा केला. नंतर उभयतांचे मुख्य मुद्द्यासंबंधी खलबत झाले तेव्हा भाऊसाहेबांना नारो दामोदराची अशी समजूत घातली की, 'जरी त्रिंबक सूर्याजीस हवालदारीचा दरक दिला आहे तरी तो निरंतरचा असे नाही; परंतु तुमचा सबनिसीचा दरक मात्र निरंतर चालण्याकरिताच दिलेला आहे व ही गोष्ट मुद्दाम योजनापूर्वक केली आहे.' या खुलाशानंतर नारो दामोदरच्या मनातील रुसवा किंवा रोष गेला. नंतर किल्ला घेण्याच्या प्रकरणी ज्या ज्या लोकांनी नारो दामोदरास मदत केली, त्यांची नारो दामोदराने जशीजशी शिफारस केली तशी तशी नवाजीस पेशव्यांनी नक्त रुपये व सोन्याची कडी वगैरे बक्षिसे देऊन केली. नंतर किल्ला पाहण्यास नानासाहेब, भाऊसाहेब गेले. तेथे किल्ल्यावरच नारो दामोदराने पेशव्यांस मोठी मेजवानी केली. त्यावर खूष होऊन पेशव्यांनी संतोषाने स्वयंपाक करणाऱ्यासही बक्षिसे दिली.

त्यानंतर एकदोनदा पेशव्यांची स्वारी श्रीगंगाकुशावर्त तीर्थावर आली तेव्हा तीर्थास प्रदक्षिणा करताना एकीकडे नानासाहेब पेशवे मध्ये नारो दामोदर व दुसऱ्या बाजूस भाऊसाहेब पेशवे आणि त्या दोघां पेशवेबंधूंनी नारो दामोदराचा एक हात आपल्या हातात धरून चाललेले असे दृश्य सर्वांस दिसले. त्यावरून नारो दामोदरावर पेशव्यांची किती बहाल मर्जी आहे व त्याचे त्यांच्याजवळ केवढे वजन आहे हे सर्वांस दिसले. सरकार काम जे कोणी असे निष्ठापूर्वक जीव झोकून करतील त्यांच्यावर पेशवे कशी कृपा करतात हेही या प्रसंगाने पेशव्यास लोकांना दाखवून द्यावयाचे होते.

ही हकीगत माधवराव हरी यांचे कुटुंब गंगाबाई या त्या प्रसंगी हजर होत्या त्यांनी ही हकीगत सांगितली होती. तसेच आवडाक्का जोशी या अतिवृद्ध होत्या त्यांनी क्षेत्र मजकुरी रावजी फडके यांचे घरी ही बखर लिहिणाऱ्या दामोदर गोविंदांना भोजनास बोलावून जुन्या जुन्या आठवणी काढल्या त्यावेळी सांगितली. नारो दामोदर यांचे कुटुंब गोदावरीबाई यांचे या आवडाक्का जोशाशी काही फार जवळचे नाते होते. आवडाक्कानीही वर सांगितलेली हकीगत मी स्वतः प्रत्यक्ष पाहिलेली आहे म्हणूनही सांगितले.

नारो दामोदर आणि त्याच्या कुटुंबातील परिवाराला पेशव्यांनी नेमणूक करून दिली त्याचा तपशील असा :

खुद्द नारो दामोदर याचे नावे

१६८० किल्ले त्रिंबक येथील सबनीसीचे वेतन व पालखीचे वगैरे खर्चाबद्दल
१५८० जातींचे वेतन व पालखीबद्दल व भोई आसाम्या मिळोन नक्त.
१०० कापड आख. २५० दर रु. ॥ आख २॥ प्रो रु.
८० पोर्गे असामी २ रु.

१६८०

२०० संस्थान श्री त्रिंबकेश्वर कोठीचे कारभाराबद्दल वेतन (त्यावेळेस खर्चाचे मान संस्थान मजकूरचे होते त्या अन्वये)

या खेरीज रु. ३६० नारो दामोदरास वेतन पेशव्यांनी चालू केले; पण त्याचे कारण प्रति दिवशी श्रीमंताच्या तर्फेचा म्हणून एक नमस्कार त्रिंबकेश्वरास नारो दामोदारांनी करावा म्हणून !

हा प्रकार दिसताना हास्यास्पद वाटला तरी मूळात तो तसा नव्हता. खरा प्रकार असा होता.

एक दिवस नेहमीच्या वहिवाटीप्रमाणे नारो दामोदर श्रीमंतांच्या डेऱ्यास जात होते; त्यावेळी डेऱ्यास लांब मेखा ठोकून रशांनी उभे केलेले असते. त्यांपैकी एका रशीत पाय अडकून नारो दामोदर सपशेल कोसळला. डोके ब्रह्मगिरीकडे आणि पाय उत्तरेकडे असा तो साष्टांग नमस्कारच झाला. ही गोष्ट श्रीमंतांनी समक्षच पाहिली होती. त्यांनी जातीने लगबगीने येऊन कितपत लागले याची चौकशी केली तेव्हां नारो दामोदराने चतुरपणे विनोदी उत्तर दिले की, ' दररोज स्वामीकडे येते समयी श्री त्रिंबकेश्वर महाराज यांस नमस्कार घालून येत असतो. आज जलदीने घालून येताना नमस्कार घालणे राहिला होता तो डेऱ्यापाशी येताच घालून प्रभूकडे हजर झालो !' हे विनोदी भाषण श्रीमंतांना फारच मौजेचे वाटले पण नारो दामोदरांस काही इजाही झालीच होती, म्हणून तेथेच त्यांनी आज्ञा केली की, ' तुम्ही आपला नमस्कार त्रिंबकेश्वरास दररोज करताच त्याच वेळेस आमचाही नमस्कार होत असावा ' म्हणून श्रीमंतांनी नारो दामोदराला ही सालीना ३६० रुपयांची नक्त नेमणूक करून दिली.

नारो दामोदराखेरीज त्याच्या परिवारातील लोकांना नेमणुका पेशव्यांनी करून दिल्या त्या अशा :

३६० हरी निळकंठ याचे नावे पेटा-त्रिंबक येथील महाल मजकूरचे नेमणुकेत आसानीबद्दल सालीना रुपये
४५० बाळाजी हरी याचे नावे
२५० पेटानाशिक या महाली मोघम नेमणूक.

२०० परगणे कोतूल येथील फडणिसी.

२०० माधवराव हरी याचे नावे हशमनिसी किल्ले त्रिंबक येथील. देखील तालुके मजकूर.

१०० बापूजी हरी याचे नावे जहागिर किल्ले मजकुरचे फडणीशीचे कामाबद्दल सालीना.

त्रिंबक किल्ला आणि क्षेत्र पेशव्यांनी जिंकल्यावर आसपासचे कोळवणातील किल्ले व मुलूखही जिंकण्याचा उद्योग त्यांनी आरंभला. त्या वेळी जव्हारचे संस्थानही जप्त होण्याचा प्रसंग आला होता. तेव्हा नारो दामोदर हा पूर्वी जव्हार संस्थानचा कारभारी होता, म्हणून त्याच्यामार्फत अजीजी व खटपट करून जव्हारकर संस्थानिक पेशव्यांना भेटावयास येण्यास तयार झाला. त्यावेळी नारो दामोदराने हे अतिप्राचीन संस्थान अगदीच बुडवू नये. फक्त आपल्या आहारी आणून राखावे अशी सल्ला पेशव्यांना दिली होती. पेशव्यांनीही ते मान्य केले. मग जव्हारकर भेटीस आले तेव्हा भाऊसाहेब पेशवे नारो दामोदरास बरोबर घेऊन गोवर्धनी पावेतो सामोरे गेले. मग भेटी, बहुमान व पोषाख इत्यादी व्हावयाचे तसे झाले.

नारो दामोदराने संस्थानाला केलेल्या मदतीबद्दल जव्हारकरांनी एक गाव त्याला इनाम दिला. यासंबंधी यजु:शाखीय ब्राह्मणाजवळ तेव्हा केलेले काही संस्कृत श्लोकही आहेत–यापैकी २।३ श्लोक त्रिंबकपंत अण्णा देशमुख पेटा त्रिंबक या वृद्ध गृहस्थांनी प्रस्तुत बखरीच्या लेखकास म्हणूनही दाखविले होते. त्याबद्दल हा साक्षेपी बखरकार उद्वेगाने म्हणतो, 'दोनतीन श्लोक म्हणून दाखविले. त्यास बहुत वर्षे झाली व त्यावेळी माहिती लिहून ठेवण्यास मिळवावी असे मनातदेखील येत नव्हते. कारण तेव्हा वडील, चुलते, चुलतबंधु होते व अखेरीस आपणच एकटे वडील असे राहू असे बुद्धीस न आलेवरून लिहून ठेवले नाही. बाकी अशी माहिती लिहून ठेवण्याची बुद्धीही झाली नाही. कारण तसा संप्रदायही घरात नव्हता–नाहीतर याहीखेरीज कितीतरी माहित्या मिळण्यासारख्या होत्या.

मौजे गणेशगाव पेटा त्रिंबक या गावचे पाटीलकीचे वतन मोगलाई अमलात पेटामजकुरचे देशमुख देशपांडे पीनाजी दादो याच्याकडे होते. त्याकडून वरील गावची निम्मे मोकदमी म्हणजे निम्मी पाटिलकी जोगळेकरांनी मिळविली.

मौजे खंबाळे हा गाव पेटा त्रिंबक येथील. तेथील पाटिलकी जोगळेकरांनी मिळवून (नारो दामोदराने ?) नंतर ती घरचा लेकवळा छबिलाराम म्हणून होता त्याच्या नावे बक्षीस करून दिली.

नारो दामोदर यानी आपले कारकीर्दीत पुष्कळ धर्मकार्ये केली. निरनिराळ्या

..२

पाटणकर, खरे आदि पाच ब्राह्मणांना दरसाल दर आसामीस ७५ रु. नेमणूक पेशवे सरकारातून करून दिली.

पेशव्यांनी एक नर्मद्या बाण नारो दामोदरास दिला. तेव्हा नारो दामोदरानी पेशव्यास विनंती केली की, सरकार मी गृहस्थ आहे; भिक्षुक नाही. या इतक्या अगत्याने दिलेल्या देवाची पूजा यथासांग नियमित झाली पाहिजे तेव्हा आता मला याकरिता एक भिक्षुक नेमणे आले.' त्यावर पेशव्यानी नारोबा नानांचा हेतू ओळखून हसत सांगितले, 'येवढेच ना ? तुम्हीच एखाद्या ब्राह्मण भिक्षुकाची योजना करा. त्याला सरकारातून सालीना पाऊणशे मिळतील ! ' हे आश्वासन मिळताच नारोपंतांनी त्यांच्या घराच्या पूर्वेस दशपुत्र यांच्या घरात कोणी अकोलकर नावाचा एक ब्राह्मण भिक्षुक राहात होता, त्याला त्या पूजेचे काम सांगितले. ते त्या ब्राह्मणाचे वर्षासन अकोलकराचा निर्वंश होईपर्यंत चालू होते.

स्वतःच्या घराच्या पश्चिमेस एक विहीर व शेजारी 'श्री माउल्या' देवीचे एक प्राचीन देवालय होते. ते पडीक होते. त्याचा जीर्णोद्धार करून नारोपंतांनी त्यात एक शिवलिंग स्थापन करून त्याचे श्रीवीरेश्वर म्हणून नाव ठेवले व त्या देवाचा पूजा नैवेद्य नंदादीपाबद्दल श्रीत्रिंबकेश्वरचे कोठीकडून नेमणूक सरकारातून करून घेतली व त्या देवाच्या पूजेचे काम खऱ्यांच्या गळ्यात घातले. कालांतराने त्या देवळात रघुनाथ मल्हार ऊर्फ दाजीबापंतोजी वावीकर यांनी लिहिणे शिकविण्याची शाळा घातली होती. पुढे शके १७२९ च्या पुढे पुन्हा त्या देवळाचा जीर्णोद्धार कासीपंत बाबा यांनी केला.

श्रीगंगाकुशावर्ताचे उत्तरेस श्रीरामजीचे ओवरीत श्रीकर्पूरेश्वर महादेव पंचमुखी संगमरवर सफेत वर्णाची शाळुंखा व मुख आणि नंदी या देवांची स्थापना करून त्या देवास प्रतिनित्य पूजा व महानैवेद्य आणि श्रावणमासी एकमासी प्रतिनित्य एकादष्णी करण्यासाठी त्रिंबककर आपटे याची नेमणूक केली व महाशिवरात्रीस लघुरुद्र अभिषेक होण्यासाठी सरकारातून नेमणूक करून घेतली.

श्रीत्र्यंबकेश्वराची प्रतिनित्य पूजा-नैवेद्यादिकासाठी शामराव नामक आचाऱ्याकडे सैंपाकाचे काम नेमले व दुधाकरता एक गाय फार उत्तम 'गंगासागर' नावाची देवास अर्पण केली व तिच्या गोग्रासाची नेमणूक केली. तिच्या पाचव्या सहाव्या पिढ्यांपर्यंत देवास त्या गाईंच्या दुधाचा नैवेद्य चालला !

त्रिंबक नजीक वाघेरा किल्ल्याच्या हद्दीत धुमोडीपेट्यात डोंगरावर एक महादेवाचे लिंग होते. पूर्वी जोगळेकरांनी संकटप्रसंगी आपली मुलेमाणसे या जंगलात ठेवली होती, त्याचे स्मरणार्थ त्या महादेवासाठी त्रिंबकेश्वर कोठीतून नैवद्याबद्दल जिनसांची नेमणूक करून दिली.

त्रिंबक येथील जोगळेकरांचे घराचे दक्षिणेस दादंभट भिडे यास एक घर दिले व त्याच दिशेस रस्त्यापलीकडे पाच ब्राह्मणांस पाच घरे व त्यासाठी जागा दिल्या.

याखेरीज नारो दामोदराने व्यापारी लोक क्षेत्र मजकुरी आणले. तसेच उत्तम दर्जी, हजाम, भंगी वगैरे कसबी आणून त्यास राहण्यास जागा दिल्या.

नारो दामोदर पुण्यास आले असता तेथेच वारले. त्यांच्या मृत्यूचे साल नक्की लागलेले नाही.

त्यांना संतती झाली ती फक्त एक कन्या. तिला ताई म्हणत. तिला नाशिकच्या पेठ्यांच्याकडे दिली होती. तिचे सासरचे नाव रमा असे होते.

नारो दामोदरांच्या पत्नीचे नाव गोदावरीबाई असे होते. तिचे माहेर कठोरकर जोशी याकडील. नारो दामोदराच्या मृत्यूनंतर गोदावरीबाईने नारो दामोदरांचे सख्खे चुलत बंधु हरी नीळकंठ यांचा कनिष्ठ पुत्र गोविंदराव यास दत्तक घेतले. हे आकृतीने सर्व अवयवी शुद्ध, उंच, वर्ण गौर, उत्तम स्वरूपवान देखण्यात फारच चांगले अत्यंत रूपसुंदर अशी त्यांची कीर्ती होती. म्हणून एकदा नाना फडणिसांनी त्यास मुद्दाम काही कामाच्या मिषाने पुण्यास बोलावून घेतले होते अशी या घराण्यात आख्यायिका आहे ! याच गोविंद दामोदरांच्या कारकीर्दीत रावसाहेब पेशव्यांची स्वारी एकदा त्रिंबकास आली होती. दर सोमवारी श्री त्रिंबकेश्वर महाराजांची पालखी किंवा छबिना निघण्याची वहिवाट असे. या वेळी पेशव्यांनी आपले लष्कर व सरंजाम देऊन हा छबिना काढला. यावेळी श्रीमंत पेशवे स्वतः हत्तीवर बसले होते व त्यांनी श्रीचा रत्नाचा मुकुट हाती धरला होता. त्या दिवशीचा स्वारीचा तो थाट अगदी अपूर्वच होता.

त्या स्वारीचे चित्र त्रिंबकास हरी नावाचा चितारी होता, त्याजकडून तेल्या रंगात कोठीतील दिवाणखान्याच्या भिंतीवर चितारून घेण्यात आले होते. चित्र त्यावेळच्या स्वारीसारखे अगदी हुबेहुब होते. त्या स्वारीची चित्रे फार दिवसपर्यंत चांगली शाबूत होती. पुढे दुसरे बाजीरावांच्या कारकीर्दीत ती नष्ट झाली ! पेशवे त्रिंबकास आल्यावर त्याच कोठीत उतरण्याची वहिवाट होती. बाजीरावसाहेबांना काय वाटले कुणास ठाऊक ? त्यांनी ती चित्रे सफेत रंग देववून पुसून टाकविली व भिंतीवर फक्त हिरव्या रंगाच्या वेलबुट्टया काढविल्या !!

गोविंद दामोदर हे स्वरूपसुंदर होते तसे स्वभावानेही उमदे होते. ' नेत्र मोठाले, चेहरा चांगला, आंगलट सडपातळ, स्वभाव सरळ होता. वेदांपैकी संहिता शिकलेले होते. अक्षर मात्र साधारण कारकुनासारखे म्हणजे चांगले नव्हते. त्यांनी

कोणाची ताबेदारी केली नाही. शौर्याकडे विशेष लक्ष होते. जवळ परिवार पाळावा, उंची वस्त्रे व वस्तू वापराव्या, अशा ऐश्वर्याची त्यांना आवड. तळेगाव या त्यांचा इनाम गावी त्यांनी एक बंगला बांधला होता. तेथे नेहमी २०।२५ हत्यारबंद माणूस, महार, रणशिंग असे जय्यत ठेवलेले असे. ते शके १७२५ मध्ये शीतज्वराची अकस्मात व्यथा होऊन वारले.

गोविंद दामोदरांना दोन पुत्र होते. ज्येष्ठ शिवराम गोविंद व कनिष्ठ दामोदर गोविंद ऊर्फ रावसाहेब, हे विशेष कर्ते नव्हते व काहीसे आळशीच होते. पेशवे राजवटीत त्यांनी त्रिंबकच्या सबनिशीचे व इंग्रजी अमलात संस्थान त्रिंबकेश्वरच्या कारभाऱ्याचे काम पाहिले. ते वयाच्या ७३ व्या वर्षी त्रिंबकेश्वरास माघ, कृष्ण ३ शके १७९० म्हणजे सन १८६८ साली वारले.

गोविंद दामोदरांचे कनिष्ठ चिरंजीव दामोदर गोविंद ऊर्फ रावसाहेब. हे वडील भावापेक्षाही दीर्घायुष्य लाभून वयाचे ९१–९२ व्या वर्षी मृत्यू पावले. घरासंनिध मठातील विश्वेश्वराची स्थापना यांनी केली व घरातील लोकांकडून पूजा करण्याचा व स्वतंत्र नैवैद्य तुंगारास देण्याचा जाबता बांधून दिला. हे काशीयात्राही करून आले होते, बरोबर मुलगा भास्करराव ऊर्फ बाबासाहेब व दत्तक दिलेला मुलगा नारायणराव ऊर्फ तात्यासाहेब यांना कुटुंबासह घेऊन गेले होते. शिपाई, प्यादे वगैरेही जमाव पुष्कळ नेला होता. काशीयात्रा करून सुखरूप घरी परत आल्यावर यांनी सत्पुरुष देव मामलेदार यांना इंदुराहून स्वतःचे घरी राहण्याकरिता आणले. त्यांचा मुक्काम महिना दीड महिना यांचे घरी होता, त्या अवधीत आल्यागेल्याचा भोजन खर्च बहुतच केला. नंतर मोठे मावंदे करून गावातील ब्राह्मणास दक्षणा दिली.


जोगळेकर हे त्रिंबकेश्वर ज्योतिर्लिंगांचे पुजारी आणि उज्जन अवंतिकेचे महांकाळेश्वर हेही ' ज्योतिर्लिंगा ' पैकीच एक. ते शिंद्यांच्या ताब्यात. श्रीमंत बायजाबाई शिंदे यांनी महांकाळेश्वर देवस्थानचे काम या रावसाहेबांच्या गळ्यात घातले. त्यासाठी ते बरीच वर्षे उज्जनीत होते. 'संस्थानाचे काम व इतर संनिध देवाची कामे बायजाबाई शिंदे यांचे मनोदयानुरूप केली. त्यांची कृपा संपादून अर्थही मिळविला. उज्जनीत होते तोपर्यंत यांच्याकडे हत्ती व मशाल असा मान व शिबंदी लवाजमा होता. पुढे बायजाबाई वारल्यावर श्रीचा कारभार यांचेकडून निघाला व हे त्रिंबकास घरी आले.

यांनी पुढे आग्रारोड रस्त्यावर विंचूरकरांचे बंगल्यानजीक जमीन खरेदी करून ५–६ हजार रुपये खर्चून एक बंगलाही बांधला होता. ९० व्या वर्षीही शरीर–

टीप : तुंगार– ही कोळ्यातील गुरवासारखी एक जात.

प्रकृती उत्तम होती. रोज देवदर्शन व भोवनेश्वरीस जाणे-येणे कधी चुकले नाही. पुढे मात्र अशक्तता येऊन डोळ्यांने दिसेनासे झाले होते.

जोगळेकरांचा वंशवेल असा. 'वंशवेल,' उपनाव जोगळेकर, गोत्र अत्री, सूत्र अश्वलाय, ज्ञाति चित्तपावन, वतन माहाजन, मौजे हेदवी नजीक नरवण तर्फ गुहागर तालुके अंजनवेल प्रांत कोकण.



पें. द. ४५ पृ. ८१ प. नं. १२

१७।१।१७४३

१ नारो दामोदर यासी प्रां. उदपूर येथील मजमू सालगुदस्तो सालमजकुरी करार करून वेतन सालीना रु. ७०० प्रांत मजकुरचे यैवजी मल्हार कृष्ण यांजकडून देविले.

४।८।१७५५ सीतखमसेन

क॥ त्रिंबक नि॥ नीळकंठ हरी क॥ जमा.

ब॥ घरे महजद

७४॥ श्री त्रिंबकेश्वरचे देवालयाचे उत्तरभागी दीपमाळेसंनिध **आल्फादा** जमीन होती ते ब्राह्मणास दिली दर हाती रु. ।॥ प्रा सरकारात घेऊन महजर करून दिली उत्तर दक्षणहात.

एकूण		रुपये
१२॥	धोंडभट खरे	२६
१२॥	धोंडभट शुल्क	२५
१२॥	आबाभट देवळालकर	२५
१६	त्रिंबकभट पेठे	३२
१०॥	मोरेश्वर दीक्षित	२१
१०॥	रघुनाथभट भार्गव वोझरकर	२१
७४॥		१४९

१२।२।१७६३ स्वारी पंतप्रधान सलास सितैन

जमा सालमजकूर क॥ त्रिंबक नि॥ हरी नीळकंठ कमाविसदार

दफाते पत्रे (१२।२।१७६३)

छ३० रजब मु॥ पुणे वि॥ नारो आपाजी हरी दामोदर याणी हुजूर पुणियाचे मुकामी विनंति केली की क॥ त्रिंबक येथे गौतम तळ्याचे काम श्रीमंत रा. भाऊसाहेब यांचे आज्ञेवरून केले त्यास तळ्याचे दक्षणभागी पुष्पवाटिकेस व घर बांधावयास जागा पाळीवर व पाळीखाले करून पुष्पांची झाडे लावली व घरहि बांधले आहे त्यास येविसीचा महजर करून दिल्हा पाहिजे म्हणून त्यावरून हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी मशारनिल्हे याचे जागियाची हदमहद चतुःसीमा याजखाले असेल ती मनास आणून याचे जागीयाची महजद करून देणे म्हणून मशारनिल्हे क॥ मजकूर यास सनद छ २८. रजबू पत्र १.

पा। रुबरू.

आल्फाद–बेमशागत, पडीक.

संभाजीकालीन दक्षिणच्या राजकारणातील मुत्सद्देगिरीवर काही नवा प्रकाश

मा. रा. कंटक

प्रस्तुत लेख पुण्यातील डेक्कन कॉलेजच्या ऐतिहासिक कागदपत्रसंग्रहात नुकत्याच समाविष्ट केलेल्या एका अप्रकाशित फारसी कागदावर आधारलेला आहे. दुर्दैवाने या कागदाचा मूळ ठावठिकाणा लागत नाही. त्याचा सुरुवातीचा, अखेरचा व मधला काही भाग फाटलेला असल्याने, तो कोणी कोणाला लिहिला, कोणत्या तारखेला लिहिला, इत्यादि महत्त्वाच्या गोष्टी कळत नाहीत. खेरीज, त्यात आलेल्या काही नवीन घटनांचे दुवे एकंदर संदर्भ लक्षात घेऊन तर्काच्या साहाय्याने जुळवावे लागतात.

इतक्या उणीवा असूनही सदरहू कागद अस्सल, विश्वसनीय आणि अतिशय महत्त्वाचा आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. याचे कारण त्याचे स्वरूप हे होय. निव्वळ ऐतिहासिक घटनांची जंत्री वा वर्णन देणारा हा कागद नसून, त्याचे स्वरूप एखाद्या वकिलाने अथवा गुप्त हेराने लिहून पाठविलेल्या वृत्तान्तासारखे (Secret Report) आहे. हा वृत्तान्त, सन १६८३ मध्ये अवरंगजेब बादशहाने दाम आणि भेद या दोन राजनीतींचा प्रयोग करून विजापूरचा किल्ला विनासायास घशात घालण्याचा कसा व्यूह रचला, तसेच अवरंगजेबाच्या शहाला छत्रपती संभाजीने काटशह देण्याचा कसा प्रयत्न केला, यासंबंधीचा आहे. त्याप्रसंगी विजापूरकरांतर्फे सिद्दी मसऊद आणि मुघलांतर्फे मुस्तफा काशी यांच्यामध्ये विजापूरच्या किल्ल्यात तहासंबंधीच्या गुप्त वाटाघाटी झाल्या. त्या वाटाघाटींच्या अनुषंगाने प्रस्तुत वृत्तान्त लेखकाने मुघल, विजापुरकर व मराठे या तीन दक्षिणी सत्तांच्या प्रमुख राजकारणांच्या मुत्सद्देगिरीचे (Statesmanship) व राजनैतिक डावपेचांचे यथार्थ चित्र रेखाटलेले असून, त्या तिन्ही सत्तांच्या आपसातील राजकीय संबंधांची कुशलतेने उकल केलेली आहे. पण एवढेच करून तो थांबलेला नाही, तर राजकारणाच्या पटावर प्यादी व सोंगट्या हलविणाऱ्या या तिन्ही पक्षातील सूत्रधारांच्या मनाचा वेध घेऊन, त्यांची राजकारणी दुटप्पी चाल त्याने उघड करून दाखविली आहे. ही गोष्ट तो प्रभावीपणे करू शकलेला आहे याचे कारण, सिद्दी मसऊद, मुस्तफा काशी व संभाजी यांच्या राजकीय कृतीचे वर्णन करीत बसण्याऐवजी (Narration) मसऊद व मुस्तफा यांच्यात झालेले प्रत्यक्ष संभाषणच (Conversation) देऊन त्याद्वारे तिघांचीही मनसि अन्यद् वचसि अन्यद् वृत्ती त्याने साकार केलेली आहे.

थोडक्यात म्हणजे हा Televised Report आहे आणि हेच प्रस्तुत कागदाचे खास वैशिष्टय आहे.

सर्व कागद काळजीपूर्वक वाचल्यावर, सदरहू वृत्तान्तलेखक एखाद्या हेरखात्याचा प्रमुख असावा; दक्षिणच्या राजकीय घडामोडींबाबत चोहोकडील गुप्त व प्रगट बातम्या त्याच्याकडे येत असाव्यात; आणि त्या बातम्यांची निवडानिवड (Sorting) करून त्याने आपला हा प्रस्तुत वृत्तान्त (Report) तयार केला असावा (Compilation), असे वाटते. हे म्हणण्याचे कारण असे की संभाजीकालीन राजकारणाशी संबंध असलेल्या मराठे, मुघल व विजापुरकर या तीन पक्षातील अंतःस्थ संबंधांचा, इतकेच नव्हे तर संभाजीच्या राज्यात अत्यंत सावधपणे वावरणाऱ्या अवरंगजेबपुत्र अकबराविषयी तसेच संभाजीशी झालेल्या त्याच्या व्यवहारासंबंधीही अत्यंत बारीकसारीक तपशील प्रस्तुत कागदात दिलेला आहे. दक्षिणच्या राजकारणाचे इतके चौफेर ज्ञान, विविध व्यक्ती आणि त्यांचे किताब यांच्याविषयी अचूक माहिती आणि कोणती व्यक्ती केव्हा काय बोलली याबद्दलची तंतोतंत बातमी एखाद्या हेरखात्याच्या प्रमुखालाच मिळणे शक्य होते.

वृत्तान्त-लेखक बहुधा मुघलांच्या बाजूचा असावा, असाही तर्क करावासा वाटतो. संभाजी व अकबर यांच्या हालचालीत व व्यवहारात विशेष रस घेऊन, प्रस्तुत कागदात लिहिल्याप्रमाणे, त्याच्याविषयी बारीकसारीक माहिती लिहिण्याचे विजापुरकरांकडील माणसास कारण नव्हते. याउलट अवरंगजेबाविरुद्ध बंड करून पळालेल्या अकबराविषयी व त्याच्या आश्रयदात्या संभाजीसंबंधी मुघलांच्या माणसाला विशेष रस असणे साहजिक, होते. खेरीज, प्रस्तुत कागदात आढळणारी 'संभा मकहूर' 'अकबर बागी' यासारखी विशेषणे, सिद्दी मसऊद आणि शर्जाखान याना अनुक्रमे 'मदार-उल्-महाम' व 'अमारतपन्हा' या आदरार्थी विशेषणांनी संबोधण्याची पद्धती, तसेच भाषेचा एकंदर झोक व शैली पाहता, कागद मुघल कागदपत्रांच्या वळणाचा वाटतो.

प्रस्तुत कागदामुळे, सन १६८३ च्या पूर्वार्धात दक्षिणच्या राजकारणात भाग घेणाऱ्या राजकारण्यांच्या मुत्सद्देगिरीसंबधी जी नवीन माहिती इतिहाससंशोधकांसमोर प्रथमच येत आहे, तिचे तीन भाग पडतात. पहिल्या भागात, मुघल व विजापुरकर यात तह घडवून आणण्याच्या दृष्टीने विजापूरचा मुख्य कारभारी सिद्दी मसऊद आणि मुघलांचा प्रतिनिधी मुस्तफा काशी यांच्यात विजापूरच्या किल्ल्यामध्ये ज्या गुप्त वाटाघाटी झाल्या, त्या दोघांतील संवादरूपाने दिलेल्या आहेत. दुसऱ्या भागात, छत्रपती संभाजीने विजापुरकरांचा एक किल्ला त्याच्या पक्षात फितुरी करून घेण्याचा अयशस्वी कट कसा केला ते मसऊद-मुस्तफा यांच्या संभा-

षणातून प्रगट केलेले आहे. तिसऱ्या भागात, शाहजादा अकबर याच्या हालचाली-संबंधी तसेच त्याच्या संभाजीशी झालेल्या व्यवहारासंबंधी काही नवीन माहिती देण्यात आलेली आहे. या कागदात आलेल्या काही व्यक्ती इतिहासाला परिचित आहेत. पण विजापुरकरांकडील यशवंतराव, मियानजी, मलिक मूशक, मुघला-कडील मुस्तफा काशी, यादगारअली, अकबराचा चाकर सुंदरसिंग या व्यक्ती व त्यांची कामगिरी नव्यानेच उजेडात येत आहे.

कागदाची तारीख फाटलेली आहे. त्याचे १६८३ हे साल अंतःप्रमाणावरून, म्हणजे त्यात उल्लेखिलेल्या काही घटनांवरून अनुमानलेले आहे. शाहजादा अकबर याचा मुक्काम सांप्रत डिचोली परगण्यात आहे, असा कागदात उल्लेख आहे. अकबर हा संभाजीच्या राज्यात असताना फक्त १६८३ या सालातच गोव्याजवळील डिचोलीला, वास्तव्य करून होता, ही गोष्ट पोर्तुगेज आणि इंग्रजी कागदपत्रां-वरून[1] सिद्ध झालेली आहे. डिचोलीला जाण्यापूर्वी अकबर गोव्याच्या उत्तरेस २५ मैलांवर असलेल्या बांदे येथे रहात होता. अवरंगजेबाच्या आरमाराचा यावेळचा प्रमुख जंजिऱ्याचा सिद्दी याकूतखान याने १६ एप्रिल १६८३ रोजी गोव्याचा व्हाइसरॉय कोंदि-द-आल्व्होर याला लिहिलेले एक पत्र उपलब्ध आहे. या पत्रात, अकबराचा मुक्काम सध्या बांद्याला असून, तो लवकरच डिचोलीला जाण्याचा विचारात आहे, असे लिहिलेले आहे.[2] त्यानंतर अकबर नक्की कोणत्या दिवशी डिचोलीला गेला हे सांगणारा पुरावा उपलब्ध नाही. मात्र १६ एप्रिल १६८३ पर्यंत तो निश्चितपणे बांद्याला असल्याने प्रस्तुत कागदाची तारीख १६ एप्रिल १६८३ च्या अलीकडे ओढता येणार नाही. कागदात, सिद्दी मसऊद हा मुघलाशी तहाच्या वाटाघाटी करीत असल्याचा, तसेच दिलेरखान अवरंगजेबाच्या दरबारी असल्याचा, असे दोन उल्लेख आहेत. सिद्दी मसऊद हा ३० ऑगस्ट १६८३ रोजी राजकारणातून निवृत्त झाला, अशी नोंद विजापूरच्या इतिहासग्रंथात बुसाती-नुस्सलातीनमध्ये[3] आणि दिलेरखान हा १५ सप्टेंबर १६८३ च्या सुमारास भयंकर आजाराने मृत्यु पावला, अशी नोंद मआसिर-इ-आलमगिरीत[4] आहे. हा दिलेरखान जयसिंगाबरोबर शिवाजीविरुद्ध दक्षिणच्या स्वारीवर आलेला दिलेरखान पठाण होय. तो सप्टेम्बरच्या पहिल्या पंधरवडचात आजारी होता असे गृहीत धरल्यास, ३० ऑगस्टनंतर, दिलेरखान आजारीपणामुळे व सिद्दी मसऊद सेवानिवृत्तीमुळे दक्षिणच्या राजकारणातून बाद झाले असे ठरते. या सर्वांचा अर्थ असा की प्रस्तुत फारशी कागद १६ एप्रिल १६८३ ते ३० ऑगस्ट १६८३ या काळात केव्हा तरी लिहिला गेला. कागदात, संभाजी लवकरच पन्हाळ्यास जाणार असून, तेथे तो पोहोचल्यावर अकबर खुदावंतपूर येथे त्याला भेटण्याच्या उद्देशाने जाणार आहे, असा आणखी एक महत्त्वाचा उल्लेख आहे. आता संभाजीच्या १६८३ मधील हालचाली पाहिल्या तर जानेवारी ते एप्रिल या

काळात मुघलांच्या कोकणावरील स्वारीला तोंड देण्यात[५] आणि १० जून ते डिसेंबर अखेरपर्यंत पोर्तुगेजांवरील मोहिमेत[६] तो स्वतः गुंतून पडल्याचे दिसून येते. या काळात पन्हाळ्याला जाऊन अकबराची भेट घेण्यास त्याला फुरसत मिळणे अशक्य होते, फक्त मे महिन्यात आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात त्याला थोडीशी उसंत मिळाली. या उसंतीच्या काळात किंवा १० जूनला तो रेवदंड्याच्या मोहिमेवर निघाला त्यावेळी वाटेत अकबराला भेटण्याच्या उद्देशाने तो पन्हाळ्याला गेला असण्याची शक्यता आहे. म्हणजे प्रस्तुत कागदाची तारीख मे किंवा जून १६८३ ही ठरते. मसऊद-मुस्तफा मुलाखतीवरून, विजापुरकर-मुघल वाटाघाटी तिच्याआधी दीर्घकाळ चालू होत्या, असे दिसून येते. बहुधा १६८३ सालच्या आरंभास अवरंगजेबाने विजापुरकरांशी समेटाची बोलणी सुरू केली असावीत. ती दोनतीन महिने रेंगाळल्यामुळे, मे–जून १६८३ च्या सुमारास मसऊद–मुस्तफा मुलाखत घडून आली असावी आणि त्यानंतर लगेच तिचा वृत्तान्त बहुधा अवरंगजेबाच्या हेर–प्रमुखाने त्याला प्रस्तुत कागदात लिहून कळविला असावा.

या कागदाची निश्चित तारीख जरी काढता आली नाही तरी त्याच्यावरून एक गोष्ट नक्की ठरते. ती म्हणजे, शाहजादा अकबर हा, कै. जदुनाथ सरकार आणि कै. पिसुर्लेकर समजतात[७] त्याप्रमाणे सप्टेम्बर १६८३ त बांद्याहून डिचोलीला गेलेला नसून. दोनतीन महिने तरी आधी गेलेला आहे.

कागदात आलेले सन १६८३ च्या पूर्वार्धातील दक्षिणचे राजकारण नीट समजण्यासाठी मुघल, विजापुरकर व मराठे या तीन सत्तांचा त्या राजकारणांकडे पाहण्याचा दृष्टिकोन व त्यातून निर्माण झालेले तिघांचे परस्परसंबंध लक्षात घेणे जरूर आहे. मुघलांचे एकछत्री साम्राज्य सर्व हिंदुस्थानभर स्थापन करणे हे अकबरापासूनच्या पुढील मुघल बादशहांचे ध्येय होते. अकबरापासून शहाजहानपर्यंतच्या काळात उत्तर व मध्य हिंदुस्थानचा बराचसा भाग विशेष प्रतिकाराशिवाय मुघलांच्या कबजात आला. पण त्या साम्राज्याला खरा अडथळा होता नर्मदेच्या दक्षिणेकडील निजामशाही, आदिलशाही व कुत्बशाही या प्रबळ तीन सत्तांचा. त्याना नष्ट केल्याशिवाय मुघल साम्राज्याचे स्वप्न साकार होणे शक्य नव्हते. त्यामूळे अकबराच्या काळापासून दक्षिणच्या राजकारणाला हळूहळू महत्त्व येऊ लागले. तीन दक्षिणी शाह्यांपैकी निजामशाही नष्ट करून शाहाजहानने एक अडसर दूर केला. तथापि अवरंगजेबाच्या कारकिर्दीत निजामशाहीच्या जागी शिवाजी ही नवीन शक्ती दक्षिणच्या राजकीय क्षितिजावर उदय पावल्याने, दक्षिणच्या राजकारणास मुघल साम्राज्यशाही विरुद्ध आदिलशाही, कुत्बशाही व मराठे यांच्यातील सामन्याचे स्वरूप आले. अवरंगजेबाने या तिन्ही दक्षिणी सत्तांचे उच्चाटन

करण्याचा प्रयत्न सुरू केला. पण त्याचा परिणाम मात्र उलटा झाला. शिवाजीची सत्ता दक्षिणेत सर्वांत सामर्थ्यवान होऊन, तो मुघलांनाही दंड थोपटून आव्हान देऊ लागला. अवरंगजेबाच्या सततच्या दडपणामुळे आदिलशाही व कुत्बशाही यांच्या अनुक्रमे दक्षिण व पूर्व हिंदुस्थानातील विस्ताराला आळा बसला खरा, पण त्यांना नष्ट करणे त्याला जमले नाही.शिवाजीच्या **कारकिर्दीच्या अखेरीस मराठे शेर झाल्याने अवरंगजेबाने आदिलशाहीचे निर्मूलन करण्यासाठी दिलेरखानाला विजापुरच्या मोहिमेवर पाठविले.** कुत्बशाही आर्थिकदृष्टचा संपन्न असली तरी ती लष्करीदृष्टचा दुर्बळ होती. केवळ विजापूरच्या आधाराने ती आतापर्यंत जीव धरून होती. त्यामुळे शिवाजीने खिळखिळी केलेली आदिलशाही नाश पावली की तिचा उपग्रह असलेली कुत्बशाही पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळेल आणि मग सर्व शक्ती एकवटून शिवाजीचा समाचार घेऊ, हा अवरंगजेबाचा बेत होता. शिवाजीने हा डाव बरोबर ओळखला. उत्तर—दक्षिण संघर्षात त्याने विजापुरकरांचे शत्रुत्व तात्पुरते बाजूला ठेवले. दक्षिण ही दक्षिणी सत्तांच्या हाती राहिली पाहिजे या सूत्राचा अवलंब करून मराठे–विजापुरकर–गोवळकोंडेकर यांची आघाडी मुघलांविरुद्ध बनविण्यात त्याने पुढाकार घेतला. त्यामुळे यापुढे मराठ्यांना दक्षिणच्या राजकारणात महत्त्व प्राप्त होऊ लागले. विजापुरकरास झालेल्या शिवाजीच्या उघड व कुत्बशहाच्या अंत:स्थ मदतीमुळे दिलेरखानाला विजापूरच्या मोहिमेत अपयश घेऊन परतावे लागले.

शिवाजीच्या पश्चात संभाजी छत्रपती झाला. त्याच्या कारकिर्दीत अवरंगजेब बादशहाचा मुलगा शाहजादा अकबर हा बापाविरुद्ध बंड करून जून १६८१ मध्ये संभाजीच्या आश्रयाला आला.[८] या घटनेने दक्षिणच्या राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळाली. इतके दिवस विजापूरचे राज्य प्रथम बुडविण्याच्या मागे अवरंगजेब होता. पण अकबराचे संभाजीला जाऊन मिळण्याच्या समस्येचे गांभीर्य ओळखून त्याने आपले धोरण बदलले. आता त्याने विजापुरकर व गोवळकोंडेकर या दोन इस्लामी सत्तांना धर्माच्या नावाने आवाहन करून आपल्या बाजूला वळवून दक्षिणी सत्तांची जूट फोडण्याचे ठरविले. त्याच वेळी सर्व शक्ती संभाजीवर एकवटून मराठ्यांचे राज्य बुडविण्याची नवी योजना त्याने आखली. म्हणजे संभाजी हा आता त्याचा पहिल्या क्रमांकाचा शत्रू बनला. शिवाजीच्या कारकिर्दीत मराठे व विजापुरकर यांच्याकडून मार खाल्लेल्या आपल्या नालायक सरदारांना आपली नवी योजना यशस्वी करता येणार नाही या विचाराने स्वत:च दक्षिणेत जाण्याचे त्याने ठरविले. त्यानुसार अकबराला मदत करणाऱ्या उदेपूरच्या महाराण्याशी तह उरकून घेऊन उत्तरेतील कटकटीतून त्याने स्वत:ला मोकळे केले. मग ८ सप्टेम्बर १६८१ रोजी अजमेरहून तो दक्षिणेकडे निघाला व २२ मार्च १६८२ रोजी अवरंगाबादेला पोहोचला.[९] स्वतः अवरंगजेब आपले दोन मुलगे, अनेक

चांगले अधिकारी व प्रचंड सैन्य घेऊन दक्षिणेत उतरल्याने, हिंदुस्थानच्या राजकारणाचा केंद्रबिंदू पूर्वी उत्तरेत व दक्षिणेत असा दोन ठिकाणी विभागला होता. तो आता पूर्णपणे दक्षिणेकडे सरकला. १६८१ ते १७०७ या काळात दक्षिणचे राजकारण म्हणजे हिंदुस्थानचे राजकारण बनले.

आपल्या बदलत्या धोरणास अनुसरून अवरंगजेबाने अवरंगाबादेहून सूत्रे हाऊवायला सुरुवात केली. १६८१ व १६८२ या दोन वर्षांत त्यांने संभाजीविरुद्ध आक्रमक तर विजापुरकरांबरोबर सलोख्याचे धोरण स्वीकारले. त्याच्या हुकमावरून जंजिऱ्याचा सिद्दी याकूतखान याने पश्चिम किनाऱ्यावरील संभाजीच्या मुलखात लूटमार, जाळपोळ चालविली, हसनअलीखान याने कोकणात धामधूम सुरू केली. शहाबुद्दिन याने रामसेजच्या किल्ल्याला वेढा घातला तर अवरंगजेबपुत्र शाहजादा अअझम याने विजापुरकर–मराठे यांच्या सरहद्दीवर कारवाया सुरू केल्या. एका बाजूने संभाजीविरुद्ध ही चौफेर चढाई सुरू असता विजापुरकरांशी सूत जमविण्यासाठी अवरंगजेबाने विजापूरचा प्रमुख सरदार सय्यद मख्दूम शर्जाखान याला स्वतः मैत्रीचे पत्र लिहिले, इतक्यावरच तो थांबला नाही. विजापूरचा त्या वेळचा बादशाह सिकंदर आदिलशाह याची बहीण शहरबानू बेगम हिचा विवाह शाहजादा अअझम याच्याशी झालेला होता, अवरंगजेबाने तिलाही शर्जाखानाच्या नावाने एक पत्र लिहावयास लावले. अवरंगजेबाने काफरांविरुद्ध मुघलाशी सहकार्य करण्याचे तर विजापुरच्या राजकन्येने विजापूरच्या हितासाठी मुघलांना मदत करण्याचे आपापल्या पत्रात शर्जाखानाला आवाहन केले.[१०]

धूर्त अवरंगजेबाचा कावा संभाजी व विजापुरकर दोघांनीही ओळखला. संभाजीने मुघलांच्या चढाईला प्रतिचढाईने उत्तर दिले, त्याने त्यांच्या कोकणातील दोन स्वाऱ्या मारून काढल्या, रामसेज वगैरे किल्ल्यांचे वेढे त्यांना उठवावयास भाग पाडले, दंडा राजपुरीला वेढा राजपुरीला वेढा घालून जंजिरा किल्ला जिंकून घेण्याइतकी वेळ आणली आणि कोल्हापूर–पन्हाळा भागातून शाहजादा अअझम याला हुसकावून लावले. शिवाय गनिमी हल्ल्यानी मुघलांच्या दक्षिणेकडील प्रदेशात एकच गदारोळ उडवून दिला. याप्रमाणे संभाजी रणमैदानावर मुघलांना चाख उत्तर देत असताना, तिकडे विजापुरकरांनी अवरंगजेबाचा राजकारणी डाव उधळून लावला. त्यांनी एकीकडे मैत्रीचे सोंग आणून तह करण्याच्या मिषाने यादगारअली नावाच्या वकिलास अवरंगजेबाकडे पाठविले,[११] तर दुसरीकडे संभाजीशी मदतीबद्दल संधान लावले. थोडक्यात म्हणजे, स्वतःच्या अस्तित्वासाठी संभाजी व विजापुरकर यांनी दक्षिणी सत्तांच्या एकीचे शिवाजीचे धोरण पुढे चालू ठेवले. विजापुरकरांची दुटप्पी चाल चाणाक्ष अवरंगजेबाच्या लक्षात आली व त्याने

विजापुरकरांच्या वकिलाला आपली भेट नाकारून त्याची रवानगी केली. या सर्व घटना १६८२ च्या अखेरपर्यंत घडून आल्या.

आपले दक्षिणचे धोरण दुसऱ्यांदा फसले हे पाहून कावेबाज अवरंगजेबाने लगेच नवीन पवित्रा घेतला. साम आणि दंड या दोन उपायांना विजापुरकर दाद देत नाहीत हे पाहून त्याने दाम आणि भेद यांचा प्रयोग त्यांच्यावर करण्याचे ठरविले. यावेळी विजापूरचा बादशाह सिकंदर आदिलशाह नुकताच वयात येऊ लागला असून, तेथील सर्व सत्ता, सिद्दी जौहर याचा जावई व मुख्य वजीर सिद्दी मसऊद आणि मुख्य सरदार सय्यद मख्दुम शर्जाखान यांच्या हातात एकवटली होती. अवरंगजेबाने आता धूर्तपणाचा राजकीय डाव खेळून सिद्दी मसऊद व शर्जाखान याना आपल्या जाळचात पकडण्याचे ठरविले. कोणत्याही तऱ्हेचा संघर्ष न करता विजापूरचा किल्ला, म्हणजे पर्यायाने आदिलशाही घशात टाकण्याची नवीन शक्कल त्याने काढली. मुघल–विजापूरकर यांच्यांतील संबंधांचा आजपर्यंत जो इतिहास लिहिला गेला आहे त्यावरून, अवरंगजेब १६८३ मध्ये विजापुरकरां-विरुद्ध कोणतीही कृती न करता स्वस्थ होता, असा समज निर्माण होतो. अवरंगजेब या साली रणक्षेत्रावर विजापुरकरांविरुद्ध स्वस्थ होता हे खरे असले तरी पोलादी पडद्याआड विजापुरकरांविरुद्ध राजकारणी डाव खेळून त्यांच्यावर बाजी मारण्यात तो गुंग झालेला होता. केवळ राजकीय सूत्रे हलवून आदिलशाही बुडविण्याचा मुत्सद्दीपणाचा डाव तो कसा खेळला, हा प्रस्तुत फारशी कागदाचा मुख्य विषय आहे.

या काळात शाहजादा अअझम याची अवरंगजेबाने विजापूरच्या कामगिरीवर नेमणूक केलेली होती. [१२] शाहजाद्याने अवरंगजेबाच्या नव्या योजनेनुसार सिद्दी मसऊद व शर्जाखान यांच्याशी तह घडवून आणण्याच्या दृष्टीने १६८३ च्या आरंभी वाटाघाटी सुरू केल्या. अवरंगजेबाचा शाहजाद्याला असा आदेश होता की, कोणताही वादाचा वा संघर्षाचा प्रसंग न आणता, मसऊद व शर्जाखान याना सर्व कौशल्य पणाला लावून मुघलांच्या चाकरीत आणावे. म्हणून शाहजाद्याने वाटा-घाटींच्या सुरुवातीला, शर्जाखानाने मुघलांची चाकरी पत्करली पाहिजे, अशी विजापूरकरांना अट घातली. त्यावर मसऊद व शर्जाखान यानी आपल्या अटी अअझमला कळविल्या. त्या सर्व अटी फारसी कागदात आलेल्या नाहीत. फक्त एकच दिलेली आहे. ती म्हणजे, विजापूरकरांना खर्चाबद्दल मुघलांनी मदत करण्याची.

मसऊद व शर्जाखान हेही काही कच्च्या गुरुचे चेले नव्हते. त्यांनीही अवरंग-जेबाच्या नवीन डावाला तोंड देण्यासाठी आपले तंत्र बदलले. यापूर्वी त्यांनी अवरंग-जेबाच्या युद्धनीतीला खड्गाने तसेच साखरपेरेपणाला साखर पेरूनच उत्तर दिले होते. आता अवरंगजेबाच्या भेदनीतीला, वाटाघाटींचा घोळ घालून काळकाढू-पणाच्या तंत्राने उत्तर द्यायचे त्यांनी ठरविले. शाहजादा अअझम याने शर्जाखानाला

मुघलांच्या चाकरीत पाठविण्याची जी अट घातली होती तिला त्यांनी, आज उत्तर देतो, उद्या उत्तर देतो, अशी टोलवाटोलवी करीत जानेवारी ते एप्रिल १६८३ पर्यंतचा काळ साधारणपणे घालवला. दरम्यानच्या काळात त्यांनी अंतःस्थपणे संभाजीशी मित्रत्वाच्या वाटाघाटी सुरू केल्या. या वाटाघाटी विजापूर दरबारातील यशवंतराव नावाच्या सरदारामार्फत सुरू झाल्या. हा यशवंतराव कोण ते उपलब्ध ऐतिहासिक साधनांवरून समजत नाही. बहुधा विजापूर दरबारी जी जुनी मराठे घराणी होती त्यांपैकी एकातील तो असावा. मराठा असूनही सिद्दी मसऊद याचा तो विश्वासू होता, हे विशेष. संभाजीवरही त्याचे बऱ्यापैकी वजन दिसते. या यशवंतरावाने मियानजी [13] नावाच्या आपल्या नोकराला मध्यस्थ नेमून मदतीसाठी संभाजीशी बोलणी सुरू केली. संभाजीनेही आपला एक माणूस विजापूरला पाठवून दिला. त्याच्याशी मियानजीची बोलणी चालू असता यशवंतरावाने मियानजीला मध्येच बोलावून घेतले आणि त्याच्यामार्फत संभाजीच्या माणसांकडे संभाजीसाठी निरोप पाठविला की, ‘ तुम्ही (स्वतः) लक्ष घातल्याशिवाय विजापूरचा कार्यभाग घडून यणार नाही. ’

यशवंतरावाने संभाजीला पाठविलेले हे निरोपाचे वाक्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यावरून, १६८० ते १६८३ या काळात संभाजीला दक्षिणच्या राजकारणात केंद्रस्थान कसे प्राप्त झाले होते, ते कळून येते. हे मानाचे स्थान त्याला प्राप्त व्हायला त्याची धडाडी व पराक्रम या दोन गोष्टी कारणीभूत होत्या. शाहजादा अकबर याला आश्रय देण्याचे धाडस दाखवून अवरंगजेबाच्या दृष्टीने त्याने पहिल्या क्रमांकाच्या शत्रूचे स्थान पटकावले होते. शिवाय, १६८१ व १६८२ या दोन वर्षांत आपला फारसा मुलूख न गमावता खुद्द अवरंगजेबाला व त्याच्या प्रचंड सैन्याला टक्कर देऊन, स्वराज्य नष्ट करण्याचे त्याचे प्रयत्न संभाजीने विफल केले होते. साहजिकच त्याच्या या कर्तृत्वामुळे, हाच काय तो आपला संकटकाळाचा आधार असे बुडण्याच्या पंथावर असलेल्या विजापूरकरांना वाटले असावे. दिलेरखानाविरुद्ध शिवाजी जसा आपल्या साहाय्याला धावून आला तसाच संभाजी अवरंगजेबाविरुद्ध आपल्या मदतीला धावून येईल असा विश्वास संभाजीने सिद्दी मसऊद व शर्जाखान यांच्या मनात निर्माण केला असला पाहिजे.

वाटाघाटींचा घोळ घालून काळकाढूपणा करण्याचे मसऊद व शर्जाखान यांचे धोरण शाहजादा अअझम याला आवडले नाही. तशात त्यांच्या संभाजीशी चाललेल्या गुप्त बोलण्याची त्याला कुणकुण लागली. त्यामुळे त्याने विजापुरकरांशी दीर्घकाल चाललेल्या वाटाघाटींचा एकदाचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरविले. ते काम त्याने आपल्या खास मर्जीतल्या मुस्तफा काशी नावाच्या एका अफगाण सरदारावर सोपविले. मुस्तफा काशी हा विजापूरला आला. त्याने अअझमचा निरोप सिद्दी

मसऊद याजकडे पाठविला की, 'अमारतपन्हा शर्जाखान याच्या चाकरीबद्दल निश्चित कळवितो, असे तुम्ही (आम्हाला) वचन दिले होते. जर तुम्ही उत्तर देत असाल तर ठीक, नाही तर मला निरोप द्यावा.' हा निरोप ऐकल्यावर सिद्दी मसऊद याने सय्यद आलम [१५] नावाच्या आपल्या एका नोकराला मुस्तफा काशी-कडे पाठवून त्याला विजापूरच्या किल्ल्यात बोलावून घेतले. मग दोघांनी किल्ल्यात एकांतात बसून गुप्त खलबत केले. ही भेट घडवून आणण्यात वर उल्लेखिलेला मियानजी हा मध्यस्थ होता. हाच मियानजी संभाजी-विजापुरकर वाटाघाटीतही मध्यस्थ होता. याचा अर्थ असा की तो मुघल, विजापुरकर व मराठे या तिघांवरही आपले वजन ठेवून असलेला गृहस्थ होता. दुर्दैवाने त्याची माहिती इतरत्र कोणत्याही ऐतिहासिक साधनांत आढळत नाही.

विजापुरच्या किल्ल्यात सिद्दी मसऊद आणि मुस्तफा काशी यांच्यात झालेले संभाषण म्हणजे राजकीय आखाड्यात शाब्दिक पेच टाकून एकमेकावर मात करू पाहणाऱ्या दोन राजकारणी मल्लांची कुस्तीच होय. मुत्सद्दी लोक राजकीय वाटाघाटी करीत असताना त्यांचे अंतरंग आणि प्रत्यक्ष शब्दांची फेक यात किती तफावत असते याचे चित्र मसऊद-मुस्तफा संवाद वाचून उभे राहते. संभाषण सुरू होताच मुस्तफाने स्वतःच्या नावे सादर झालेले बादशाही आज्ञापत्र मसऊद याला दाखवून म्हटले, 'बादशहाकडून मला ताकीद आलेली आहे की जोपर्यंत तुम्ही शर्जाखानाला (आमच्या) भटीला पाठविणार नाही तोपर्यंत तुमचे भले होणार नाही.' या गर्भित धमकीला मसऊद याने उत्तर दिले की, '(अजूनपर्यंत) आमच्या मागण्या (तुमच्याकडून) पूर्ण होत नाहीत. तेव्हा आम्ही शर्जाखानाला (तुमच्या) भेटीस पाठविण्याची अपेक्षा कशी धरता?' यावर मुस्तफा काशी बोलला की, 'शर्जा-खानाने जाऊन प्रथम भेट घ्यावी, म्हणजे लगेच तुमच्या मागण्या पूर्ण होतील.' या संभाषणावरून दोघांच्या ओठात एक व पोटात दुसरेच कसे होते ते दिसून येते. दोघेही एकमेकांचा हेतू जाणून होते. पण स्वतःच्या अंतरंगाचा दुसऱ्याला पत्ता लागू न देता त्याला चकवून त्याच्यावर कुरघोडी करण्याची प्रत्येकजण शर्थ करीत होता. मसउदखानाचे म्हणणे असे की, मुघलांनी प्रथम आमच्या अटी मान्य केल्या म्हणजे आम्ही शर्जाखानाला त्यांच्याकडे पाठवू. या उलट, शर्जाखानाने प्रथम आमच्याकडे आले पाहिजे, म्हणजे विजापूरकरांच्या मागण्या मान्य करू, हा मुस्तफाचा आग्रह होता. दोघेही एकमेकाशी प्रामाणिक नव्हते. शर्जाखानाला नंतर पाठवू असे म्हणण्यात मसऊदाचा हेतु संभाजीची मदत येऊन पोहोचेपर्यंत कालापहरण करण्याचा होता. तर मुस्ताफाचा उद्देश हा की, प्रथम शर्जाखान आपल्याकडे आला की, त्याच्यावर हरतऱ्हेचे दडपण आणून आपण म्हणू त्या अटी त्याच्याकडून मान्य करून घेणे सोपे जाईल. आणि हे न जमल्यास शर्जाखानाला ओलीस ठेवून घेऊन

त्याच्या बदलात विजापूरच्या किल्ल्याचा म्हणजे पर्यायाने आदिलशाहीचा सौदा पदरात पाडून घेता येईल. यावरून, उभयपक्षांचे खायचे दात व दाखवायचे दात कसे वेगळे होते ते दिसून येते. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. विजापुरकर लष्करीदृष्टच्या मुघलांपेक्षा दुर्बल असले तरी वाटाघाटींच्या बैठकीत ते पडती बाजू घ्यायला सहजासहजी तयार नव्हते. याचे कारण त्यांना असलेला संभाजी व गोवळकोंडेकर यांचा सक्रिय पाठिंबा.

आपल्या गर्भित धमकीला मसऊदखान बधत नाही हे पाहून मुस्तफाने आपल्या भात्यातील शेवटचे अस्त्र काढले. तो निर्वाणीच्या स्वरात म्हणाला, 'शर्जाखानाची भेट स्थगित करण्याविषयी तसेच खर्चाबद्दल मदत करण्याच्या (तुमच्या) विनंतीसंबंधी आमच्या नावे बादशाही हुकूम सादर झालेला आहे. तसेच (शर्जाखानाच्या) भेटीबाबत अत्यंत कडक ताकीद देणारा बादशाही हुकूमही येऊन पोहोचत आहे. तेव्हा शर्जाखान आमच्या भेटीस आला तर उत्तम, नाही तर त्याच्यासह (शर्जाखानासह) विजापूरच्या सर्व रहिवाश्यांवर बादशाही रोष ओढवेल. काही झाले तरी कोणालाही (आम्ही) खर्चाच्या बाबतीत अजिबात मदत करणार नाही.' या वाक्यावरून मुघलांची दडपशाही वृत्ती तर प्रगट होतेच, शिवाय लाच देऊन मसऊद व शर्जाखान यांना विकत घेण्याचा प्रयत्न ते कसा करीत होते यावरही चांगला प्रकाश पडतो.

मुस्तफाने याप्रमाणे उघड धमकावण्या द्यावयास सुरुवात केल्यावर, आता जास्त ताणून धरण्यात अर्थ नाही, हे सिद्दी मसऊद याने ओळखले. मुस्तफाने त्याला सुचविले की, आशिक मुहम्मद नावाचा दिलेरखानाचा सेवक हा स्वतः मसऊद व शर्जाखान या दोघांच्या विश्वासातला आहे, त्याच्या मध्यस्थीने शर्जाखानाने दिलेरखानाची भेट घ्यावी. आशिक मुहम्मदाच्या नावाचे पिल्लू मुस्तफाने मुद्दाम सोडलेले होते. या आशिक मुहम्मदाने सन १६७९–८० च्या दिलेरखानाच्या विजापूरच्या मोहिमेच्या वेळी भूलथापा मारून शर्जाखानाला दिलेरखानाच्या बाजूला वळविले होते.[१६] त्यामुळे मसऊद त्याच्यावर मनातून रागावून होता. उलट मुस्तफा काशीला मात्र, आशिक मुहम्मद पूर्वीप्रमाणे शर्जाखानाचा मासा अचूक गळाला लावील, ही खात्री होती. आशिक मुहम्मदाचे नाव सुचविण्यात मुस्तफाच्या मनातील कावा मसऊदाच्या ध्यानात आला नाही असे नाही. पण मुस्तफाच्या निर्वाणीच्या धमकीमुळे त्याचा निरूपाय होऊन त्याने मुस्तफाची सूचना बाह्यतः मान्य केली.

मुस्तफाने दिलेरखानाच्या भेटीची सूचना केली खरी, पण नंतर त्याच्या लक्षात आले की आपली गफलत झाली. कारण दिलेरखान हा त्यावेळी अवरंगाबादेला बादशहाकडे होता. म्हणून तो उद्गारला, 'सध्या दिलेरखान हा बादशाही

कामासाठी त्याच्याजवळ (बादशहाजवळ) आहे. तेव्हा ही भेट घडवून आणण्यासाठी तो आता येथे कसा येऊ शकणार? खेरीज, दिलेरखान हा बादशहाच्या अत्यंत उमद्या सरदारांसमवेत असतो. ते (सरदार) त्याला त्याची (शर्जाखानाची) भेट घेऊ देणार नाहीत. (इतकेच नव्हे) त्याचे नाव देखील घेऊ देणार नाहीत.' या वाक्यात, मुस्तफा एकीकडे आपली चूक कबूल करत आहे तर दुसरीकडे मुघलांच्या जन्मजात श्रेष्ठत्वाची भावना त्याला गप्प बसू देत नाही. तो मसऊदखानाला असे सुचवीत आहे की शर्जाखानाची आज मुघलांना राजकीय गरज आहे म्हणून तुमच्या दारी मी आलेलो आहे. वास्तविक दिलेरखानासारख्या श्रेष्ठ दर्जाच्या जातिवंत मुघल सरदाराला .इतरही त्याच दर्जाचे मुघल सरदार शर्जाखानासारख्या कनिष्ठ सरदाराची भेट घेऊ देणार नाहीत, मग शर्जाखान विजापूरदरबारी किती का मोठा असेना. शर्जाखानाला मुघल चाकरीसाठी बोलावतात ही त्यांची त्याच्यावर मेहरबानी होय. वंशश्रेष्ठत्वाचा पगडा माणसाच्या मनावर किती जबरदस्त असतो आणि त्यामुळे मी मी म्हणणारे राजकारणी पुरुषही प्रसंगी कसे वाहवत जातात त्याचे हे उत्कृष्ट उदाहरण! सन १६८० मध्ये दिलेरखानाने शर्जाखानाला सिद्दी मसउदापासून फोडून आपल्या बाजूला वळविले होते.[१६] पण लवकरच मसउदाच्या खटपटीमुळे शर्जाखान परत विजापूरच्या बाजूला आला. तो राग दिलेरखानादि मुघल सरदारांच्या मनात सतत धुमसत असल्याने, त्याचा उद्रेक होऊन मुस्तफाचा शर्जाखानाला हा वरील अहेर! प्रस्तुत फारसी कागदाच्या लेखकाने मुस्तफा–मसऊद संभाषणाद्वारे मानवी स्वभावातील विविध छटांचेही केलेले हे चित्रण पाहण्यासारखे आहे.

मसउदाने मुस्तफाच्या टोमण्याकडे दुर्लक्ष करून स्वतःची एक सूचना त्याच्यापुढे मांडली. तो म्हणाला, ' (दिलेरखानाला येणे शक्य नसेल तर) तुम्ही प्रथम बादशाहजाद्याकडे (अअझमकडे) अर्ज करून यादगारअलीची[१७] (शर्जाखानाशी) भेट घडवून आणावी. नंतर त्याने (यादगारअलीने) आमच्याकडे यावे म्हणजे आम्ही तिकडील (मुघलांकडील) हकीगत त्याला विचारून घेऊ आणि त्याला आमच्या माणसाबरोबर परत पाठवू.'

या ठिकाणी मसऊद–मुस्तफा संवादातील तहासंबंधीचा भाग संपला. मग एकदम संभाषणाच्या ओघात, ज्याच्या मध्यस्थीने दोघांची भेट घडून आली, त्या मियानजीचा विषय निघाला. दुर्दैवाने, मियानजीसंबंधी दोघांचे जे बोलणे झाले त्यातील काही महत्त्वाचा भाग फाटलेला असल्याने, मियानजीच्या कथेतील त्या भागापुरते धागेदोरे एकदर संदर्भ लक्षात घेऊन कल्पनेने जुळवावे लागतात. हे धागेदोरे जुळवल्यावर मियानजीच्या कथेची रचना खालीलप्रमाणे होते :

मुघल–विजापुरकर वाटाघाटी रेंगाळण्याला तसेच विजापुरकरांचे संभाजीशी सूत जमण्यास मियानजी जबाबदार आहे, असा मुस्तफा काशीला संशय वाटत होता. त्याने मसउदाला सुचविले की, मियानजीने संभाजीच्या कारस्थानात सामील होऊन विजापुरकरांचा एक किल्ला दग्याने घेण्याचा प्रयत्न केलेला आहे; म्हणून आपणही त्याला कपटप्रयोग करून पकडले पाहिजे. पुढे मुस्तफा म्हणतो, ' उपर्युक्त किल्लेदारास जिवे मारण्याचा त्याच्या (मियानजीच्या) नोकरांचा विचार होता. म्हणून त्यानी (नोकरानी) किल्लेदाराचा एक उत्तम नोकर असलेल्या मलिक मूशक नावाच्या ख्वाजा सराईस[१८] आपल्या विश्वासात घेऊन, उपर्युक्त किल्लेदारास वाडी देऊ, अशी इच्छा ख्वाजा सराईजवळ प्रदर्शित केली. मुस्तफाच्या म्हणण्याचा आशय असा की, किल्ल्याच्या बदल्यात आम्ही किल्लेदाराला एक गाव देतो, असे सांगून मियानजीच्या नोकरांनी किल्लेदाराच्या ख्वाजा सराईला म्हणजे जनानखान्यावरील प्रमुखाला वश करून घेतले. त्यानंतर किल्लेदाराशी बोलणी करण्याच्या मिषाने जाऊन त्याला ठार मारून त्याचा किल्ला बळकावण्याचा व्यूह त्यांनी रचला. हा किल्ला ते संभाजीच्या हवाली करणार होते. हे कारस्थान पार पाडण्यासाठी संभाजीचे साठ मावळे प्यादे किल्ल्यात दडून बसलेले होते. पण किल्लेदारास या कारस्थानाचा सुगावा लागल्यामुळे त्याने किल्ल्यातील साठ मावळे प्याद्यांची कत्तल केली. तसेच ख्वाजा सराईच्या लोकांना त्याने किल्ल्याच्या दरवाजाबाहेर काढले. संभाजीला जेव्हा ही बातमी समजली तेव्हा त्याला आपला कट फसल्याबद्दल फार वाईट वाटले.

संभाजीच्या या अयशस्वी कटाच्या माहितीवरून त्याच्या कर्तृत्वाच्या एका नव्या पैलूवर प्रकाश पडत आहे. दुर्दैवाने त्याने विजापुरकरांचा जो किल्ला घेण्याचा अयशस्वी कट केला, त्याचे व त्याच्या किल्लेदाराचे नाव असलेला प्रस्तुत कागदाचा भाग फाटलेला आहे. एकंदर संदर्भ लक्षात घेता, सदरहू किल्ला विजापूरचा किल्ला असावा, असे वाटते. सिद्दी मसउदाने ज्या वेळी यशवंतराव या मराठा सरदारामार्फत संभाजीकडे मदतीबद्दल संधान लावले त्या वेळी संभाजीने मदतीच्या मिषाने म्हणा किंवा विजापूरची परिस्थिती जाणण्याच्या उद्देशाने म्हणा, आपल्या साठ मावळे प्याद्यांना विजापुरकरांशी मैत्रीची बोलणी करण्यासाठी नेमलेल्या इसमाबरोबर पाठविले असावे. केवळ साठ लोकच असल्याने सिद्दी मसउदाने त्यांच्या किल्ल्यातील प्रवेशाला हरकत घेतली नसावी. या वेळी चाललेल्या मुघल–विजापुरकर वाटाघाटींचा सुगावा संभाजीला लागला असावा. त्यामुळे विजापुरकर वरून आपल्याशी मैत्री दाखवीत असताना, परस्पर मुघलांना शरण जाऊन विजापुरचा किल्ला त्यांच्या हवाली तर करणार नाहीत ना, अशी शंका त्याला असावी. तसे आपल्यास तो किल्ला मुघलांकडे जाण्यापूर्वी विनासायास स्वतःच्या पदरात पाडून घ्यावा या

उद्देशाने मियानजीला व त्याच्या लोकांना फितवून त्याने आपला कट शिजविला असावा.

अर्थात हा सर्व तर्क झाला. संभाजीचा कट विजापुरकरांच्या दुसऱ्या एखाद्या किल्ल्यासंबंधी असण्याचीही शक्यता आहे. त्याचा कट विजापूरच्या किल्ल्यासंबंधी असो वा विजापुरकरांच्या दुसऱ्या एखाद्या किल्ल्यासंबंधी असो, त्यावरून एक गोष्ट निश्चितपणे सिद्ध होते. ती म्हणजे, सिद्दी मसऊद व अवरंगजेब या दोघांच्या शहाला काटशह देऊन संभाजीने आपल्या अंगचे मुत्सद्दीपणा व राजकीय संधिसाधुपणा हे दोन गुण १६८३ मध्ये दाखवून दिले. अवरंगजेब हा संभाजीचा उघड शत्रू होता. पण सिद्दी मसऊद व शर्जाखान हे दोघेजण मराठे व मुघल या दोन डगरीवर हात ठेवून आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करीत होते. विजापुरकरांच्या मैत्रीचे महत्त्व स्वराज्य रक्षणाच्या दृष्टीने ओळखूनही, त्यांच्या धूर्तपणाच्या डावपेचाला चपखल उत्तर देण्याची वास्तव दृष्टी संभाजीने दाखविली, हे विशेष. त्याचा कट अयशस्वी झाला हे त्याचे दुर्दैव. १६७९ मध्ये शिवाजीचा विजापूरचा किल्ला दग्याने घेण्याचा कट अयशस्वी झाला होता त्याची येथे आठवण येते. विजापुरकरांच्या किल्ल्याविरुद्ध कट घडवून आणण्यात व्यक्त झालेले संभाजीचे राजकारणचातुर्य व १६८१–८२ मध्ये मुघलांचा रणांगणावर प्रतिकार करण्यात त्याने दाखविलेली धडाडी विचारात घेता, स्वराज्यावरील परचक्रनिवारण्याच्या बाबतीत आपल्या कारकिर्दीच्या आरंभीच्या दोनतीन वर्षांत तरी त्याने छत्रपतिपदाला साजेसे कर्तृत्व दाखविले, असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

१६८३ च्या पूर्वार्धात या सर्व घडामोडी चालू असता शाहजादा अकबर याच्या हालचाली काय होत्या, हे प्रस्तुत कागदाच्या अखेरीस दिलेले आहे. वर दिलेल्या संभाजीच्या कटाशी किंवा दक्षिणच्या राजकारणाशी त्याचा काहीही संबंध नव्हता. तो या वेळी गोवे प्रदेशातील परगणे डिचोली येथे रहात होता. त्याने दुर्गादास वगैरे आपल्या नोकरांस बहुतेक सर्व लष्कराबरोबर छावणीसाठी घाटावर[१९] खुदावंदपूर[२०] तर्फेतील मौजे चिकीहळ्ळी येथे पाठविले. या सुमारास संभाजी पन्हाळ्याला जाणार होता आणि तो तेथे पोहोचल्यावर अकबर स्वतः छावणीसाठी डिचोलीहून खुदावंदपूर येथे जाणार होता. खुदावंदपुरला जाण्याचा त्याचा हेतु पन्हाळ्याला येणाऱ्या संभाजीची भेट घेण्याचा होता असे दिसते. खुदावंदपूर व चिकीहळ्ळी ही गावे नकाशात सापडत नाहीत. अकबराचा संभाजीला भेटण्याचा उद्देश लक्षात घेता, ही गावे पन्हाळ्यापासून जवळ, डिचोली–बेळगाव–कोल्हापूर मार्गाच्या आसपास, कोल्हापूर किंवा बेळगाव जिल्ह्यात असावीत. अकबराने आपला चाकर सुंदरसिंग याच्यामार्फत संभाजीला एक रत्नजडित अंगठी, एक कर्णफूल, एक पक्क्या काचेचा आरसा, कस्तुरी, अरबी घोडा, वगैरे वस्तू भेट

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था
११९९ सदाशिव पेठ, ...
... पुणे–४११ ०३०

म्हणून पाठविल्या. उलट संभाजीने बिदनूर किल्ल्याच्या जमीनदाराकडून आलेल्या नजराण्यापैकी पाच हजार होन अकबराच्या खर्चासाठी देवविले व सुंदरसिंगास एक शाल, कानातील कडे व कापडाचे ठाण देऊन त्याची रवानगी केली.

अकबर-संभाजी संबंधाविषयी इतकी बारकाव्याने माहिती देऊन हा एक आगळा व वैशिष्टयपूर्ण कागद संपलेला आहे. असे कागद अधिकाधिक प्रमाणात सापडत गेले तर इतिहाससंशोधनाला ते एक वरदानच ठरेल.

टीपा

□ सन १६६० त शिवाजीमहाराज पन्हाळचाहून निसटून विशाळगडाला चालले त्या वेळी त्यांचा पाठलाग करणारा सिद्दी मसऊद हाच होय. त्याला प्रस्तुत फारशी कागदात मदार–उल्–महाम असे संबोधिलेले आहे.

१. छत्रपती संभाजी महाराज, पृ. २०१–२०२; History of Aurangzeb vol. IV, pp. 340–41; Pissurlencar, **Prince Akbar and the Portuguese, I. H. R. C.** Proceedings, vol. X, pp. 103–104.

२. कित्ता.

३. विजापूरची आदिलशाही, पृ. ५८६.

४. Maasir–e– Alamgiri, p. 145.

५. छत्रपती संभाजी महाराज, पृ. २४१; हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ.४०

६. शिवचरित्रप्रदीप (जेधे शकावली), पृ. ३२; पोर्तुगेज–मराठे संबंध, पृ. ९४–११०; History of Aurangzeb, vol IV, pp. 317–330.

७. History of Aurangzeb, vol, IV, p. 340; **I. H. R. C.** Proceedings, vol X, pp. 103–104.

८. शिवचरित्रप्रदीप, पृ. ३१.

९. Maasir–e– Alamgiri, p. 131, 134.

१० विजापूरची आदिलशाही, पृ. ५८२–५८५.

११. Maasir–e–Alamgiri, p. 134,

१२. कित्ता, पृ. १३५.

१३. नावावरून हा मियानजी बहुधा मुसलमान असावा, असे वाटते.

१४. हा शाहजादा अअझम याच्या पदरी असून, त्याचा आवडता होता. तो शिया पंथाचा असल्याने अवरंगजेबाची त्याच्यावर गैरमर्जी होती. त्याचे जीवन-चरित्र ' मआसिर–उल्–उमरा ' या फारसी ग्रंथात दिलेले आहे [पहा, मुगल दरबार भाग ४, पृ. ५०३–५०४ (' मआसिर–उल्–उमरा ' च्या हिंदी भाषांतराचा ग्रंथ]

१५. सन १६७९ मध्ये दिलेरखान पठाणाने विजापूरच्या किल्ल्यावर हल्ला केला त्या वेळी विजापुरचा मुख्य वजीर सिद्दी मसऊद याच्या तर्फे या सय्यद आलमने वकील म्हणून दिलेरखानाशी बोलणी केली होती. पहा, विजापूरची आदिलशाही, पृ. ५५५–५६.

१६. विजापूरची आदिलशाही, पृ. ५३७–३८.

१७. हा यादगारअली मुघलांकडील वजनदार सरदार दिसतो. पण त्याचा उल्लेख कोणत्याही ऐतिहासिक साधनांत नसल्याने त्याच्याबद्दलची काहीही माहिती उपलब्ध नाही.

१८. जनानखान्यावरील प्रमुख.

१९. घाटावर या अर्थी प्रस्तुत कागदात 'बालाघाट' हा शब्द वापरलेला आहे. बालाघाट प्रदेशाशी त्याचा काहीही संबंध नाही.

२०. खुदावंदपूर या नावाची पाचसहा गावे वऱ्हाडात आहेत. तसेच धारवाडापासून सुमारे २० मैलांवर खुदावंतपूर नावाचे गाव असल्याबद्दलचा उल्लेख सेतुमाधरराव पगडी यांच्या 'मोगल दरबारची बातमीपत्रे' (भारतीय इतिहास आणि संस्कृति, त्रैमासिक, वर्ष १२, अंक ४५ वा, एप्रिल १९७५, पृ. ८०, ८ जुलै १६९४ चे बातमीपत्र) या लेखात आलेला आहे. ही सर्व गावे, संभाजीचा मुक्काम जेथे होणार होता त्या पन्हाळगडापासून खूप दूरवर तसेच मुघलांच्या प्रदेशात असल्याने, शाहजादा अकबर त्यांपैकी कोणत्याही गावी जाणे शक्य वाटत नाही.

सन १६५९ मध्ये शिवाजीमहाराजांनी अफलजलखानाचा वध केल्यावर, नेताजी पालकर याने विजापुरकरांचा मुलूख लुटून जी गावे मराठ्यांच्या ताब्यात आणली त्यात क्षुद्रवंद्यपूर नावाच्या गावाचा उल्लेख शिवभारतकार परमानंदाने अध्याय २५, श्लोक ५ मध्ये केलेला आहे. हे क्षुद्रवंद्यपूर बहुधा खुदावंतपूर असण्याची शक्यता आहे. नेताजीने लुटलेल्या गावांची शिवभारतकाराची यादी पाहता, हे क्षुद्रवंद्यपूर, कोल्हापूर, बेळगाव किंवा धारवाड जिल्हयांतील वाटते. जेधे शकावलीतही (शिवचरित्रप्रदीप, पृ. २३) खुदावंदपुराचा उल्लेख आहे.

कान्हेरी येथील अप्रकाशित ब्राह्मी लेख

शोभना गोखले

कान्हेरी मुंबईच्या बोरिवली या उपनगरापासून दक्षिणेस सुमारे १० कि. मी. अंतरावर आहे. येथील पर्वतराजीस ' कृष्णशैल ' हे नाव असून या गिरिकंदरात सुमारे १०९ बौद्धगुंफा आहेत. सातवाहन काळामध्ये या परिसराचे महत्त्व अधिकच वाढले. या गुंफांची वास्तुकला, येथील शिल्पसौंदर्य आणि ब्राह्मी लेख या सर्वांनी प्राचीन भारतीय इतिहासात मोलाची भर घातली आहे. कान्हेरीचे ब्राह्मी लेख बर्ड[१], वेस्ट[२], बर्जेस[३], आदी संशोधकांनी वाचले. त्यांनी त्या लेखांचे संशोधनपूर्ण विवेचन केले. त्यानंतर कै. डॉ. मोरेश्वर गंगाधर दीक्षित[४] यांनी आपल्या पी.एच्.डी. च्या प्रबंधात तेथील काही अप्रकाशित लेखांचे वाचन केले, परंतु तरीसुद्धा काही लेख अप्रकाशित राहिले आहेत. हे लेख त्रुटित असून तेथील अतिवृष्टीमुळे ते झिजलेले आहेत.

गेल्या वर्षी तेथील स्मशानभूमीत काही नवीन लेख सापडले आहेत.

प्रस्तुत लेख गुंफा क्र. ७५ मधील असून डाव्या बाजूस टाक्याच्या वर लिहिलेला आहे. ह्या टाक्यावर ८७ सें. मी. X ९४ सें. मी. एवढी जागा गुळगुळीत केली असून त्यावर हा दहा ओळींचा लेख कोरला आहे. अतिपावसामुळे लेख झिजला असल्यामुळे त्याचे वाचन करणे अवघड झाले आहे.

लिपी : कान्हेरीच्या इतर लेखांमध्ये दुसऱ्या शतकातील लिपी आढळून येते. प्रस्तुत लेखात तसेच लिपीवैचित्र्य असून त्याशिवाय एका वेगळ्याच धाटणीचा प्रत्यय येतो. नागार्जुनीकोंडा येथील लेखाप्रमाणे 'अ', 'क', 'र' आदी अक्षरांतील उभा दंड लांब असून त्याच्या डावीकडे अर्कुल्या झाल्या आहेत. वेलांटी ही गोलाकार पद्धतीने काढली असल्यामुळे या लेखातील लिपीचा काल दुसऱ्या शतकाचा उत्तरार्ध ते तिसऱ्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंतचा धरण्यास हरकत नाही.

भाषा : लेखाची भाषा प्राकृत असून लेखाची सुरुवात ' सिद्ध ' या शब्दाने झाली आहे. लेखाच्या शेवटी ' सुखाय ' असे लिहिले आहे.

वर्णव्यवस्था : लेखामध्ये लक्षात येण्यासारखे विशेष आढळत नाहीत. लेखाच्या शेवटी मात्र ' सुखाय ' या शब्दाच्या ऐवजी ' सुघाय ' असे लिहिले आहे, ती कोरणाऱ्याची चूक असावी.

विषय : कल्याणच्या नंदनाचा पुत्र अचल हा तेथे व्यापारी होता. त्याची पत्नी लवनिका हिने आपले माता–पिता आणि सर्वांचे हित आणि सुख यासाठी लेणे व स्नानासाठी टाके दान दिले. कल्याणच्या अंबालिका विहारासाठी तीनशे कार्षापणांची कायम ठेव दिली आणि त्या निधीतून ' चातुदीससंघाच्या ' भिक्षूंच्या वस्त्रप्रावरणांची सोय केली.

हा लेख कान्हेरी लेखांमध्ये अतिशय महत्त्वाचा आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सह्याद्रीच्या गिरिकंदरात अनेक बौद्धलेणी व विहार आहेत हे सर्वश्रुत आहे. परंतु आतापर्यंत त्यातील विहारांपैकी एकाचेही नाव ज्ञात नव्हते. गुंफा क्र. तीन या लेखात कल्याण येथील 'अंबालिका विहार' या नावाचा उल्लेख आला आहे, परंतु त्याचे निश्चित स्थान आजवर अंधारात होते. ' बॉम्बे गॅझेटियर '[५] मध्ये मुंबईजवळील अंबरनाथ येथील देवळाच्या जागीच अंबालिकाविहार असावा असे नमूद केले आहे. परंतु अंबरनाथ येथे प्राचीन विहाराच्या अस्तित्वाच्या खुणा दिसत नाहीत. उलट-पक्षी, कल्याणपासून आग्नेयेस ८ कि. मि. अंतरावर असलेल्या आंबिवले या गावी प्राचीन विहार आहे. तोच प्राचीन अंबालिकाविहार असण्याची शक्यता जास्त वाटते. कान्हेरी येथील चैत्यगृहातील लेखामध्ये अंबालिकाविहाराला ' उपोस्थ-शाला ' आणि ' ओवरक '– ओवऱ्या बांधल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. या विहाराच्या दालनामध्ये कान्हेरी येथील विहाराप्रमाणेच भिंतीच्या तिन्ही बाजूस बाके कोरली आहेत. कान्हेरी येथील उत्कीर्ण लेखातील पुरावा आणि उभय वास्तूं-मधील बांधणीचे साम्य यावरून आंबिवले येथील विहार म्हणजेच अंबालिकाविहार हे मत प्रतिपादन करण्यास आपणास सबळ पुरावा मिळतो. आंबिवले येथील विहार उल्हास नदीच्या काठी आहे. त्यामध्ये ६.५ मी. X ६ मी. X १.५ असे मोठे दालन असून तिन्ही बाजूस चार–चार याप्रमाणे बारा खोल्या आहेत.

बौद्ध विहारांना नाव देण्याची प्रथा ही फार प्राचीन आहे. ' जेतवन ' आणि ' घोषिताराम ' ही नावे भारतीय इतिहासात सुपरिचित आहेत. कोशांबी[६] येथे घोषिताराम याचा उल्लेख असलेला इ. पहिल्या शतकातील लेख सापडला आहे. घोषितारामाची नेमकी जागा जरी आज ज्ञात नसली तरी इ. पहिल्या शतकामध्ये घोषितारामाची जागा ज्या ठिकाणी लेख सापडला तीच होती असे म्हणावयास हरकत नाही. आराकान येथील चंद्रवंशातील ताम्रपटात ' जेतवना ' चा[७] उल्लेख आहे. अर्थात ' जेतवन ' हे नाव इतके लोकप्रिय होते की, नंतरच्या काळातही श्रीलंकेत असलेल्या विहाराला ' जेतवनविहार ' असे नामाभिधान असल्याचा उल्लेख आहे.

कल्याण येथील विहाराला अंबालिका हे नाव कसे प्राप्त झाले, याबद्दलचा मात्र कोठेही उल्लेख नाही. अंबालिका एखादी थोर भिक्षुणी असावी किंवा संपन्न

व्यापाऱ्याची पत्नी असावी. तिने आपल्या माता–पित्यांच्या आणि सर्व प्राणीमात्रांच्या सुखासाठी हे दान दिले असण्याची शक्यता आहे. सातवाहन राजांच्या अमदानीत कल्याण हे बंदर भरभराटीस आले होते. या बंदराचा पेरिप्लस[८] आणि टॉलेमी[९] यांनी उल्लेख केला आहे.

दुसऱ्या शतकात मान्सून वाऱ्यांचा शोध लागला आणि त्याच सुमारास भारताच्या पश्चिम किनाऱ्याशी रोमचा व्यापार सुरू झाला. सातवाहनकालात नाणेघाटातून कल्याण बंदरास येणे जास्त सुलभ असल्यामुळे हे बंदर अधिकच भरभराटीस आले. त्यामुळे तेथील व्यापाऱ्यांना अमाप पैसा मिळाला आणि या पैशांचा विनियोग त्यांनी कान्हेरीचे शिल्प उभारण्यास केला. कान्हेरीच्या लेखांतून[१०] कल्याणच्या बारा व्यापाऱ्यांचा उल्लेख आहे, ही गोष्ट येथे नमूद करणे आवश्यक आहे.

कान्हेरी येथील चैत्यगृहामध्ये असलेल्या लेखात सोपारे, अंबालिकाविहार, पैठण येथे देणगी दिल्याचा उल्लेख आहे. ही देणग्यांची यादी प्राचीन व्यापारी मार्गानुसार होती, ही गोष्ट चिंतनीय आहे.

सध्याच्या कल्याण आणि आंबिवले या गावापासून वाहणाऱ्या उल्हास नदीचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, त्या नदीतून प्राचीन काळी व्यापार चालत असावा. कल्याणहून प्राचीन काळी अंबालिकाविहारापर्यंत व्यापारी लोक येत असावेत आणि तेथून ते नाणेघाटातून प्रतिष्ठानाकडे रवाना होत असावेत असे दिसते.

या लेखात अंबालिकाविहारातील चातुदीससंघाला दान दिल्याचा उल्लेख आहे. विश्वबंधुत्वाची कल्पना ही खुद्द गौतमबुद्धाचीच. अनाथपिंडकाने जेतवन-विहार चातुदीससंघाला दान दिला होता. पश्चिम महाराष्ट्रातील नहपानपूर्वकालीन लेण्यातील लेखातून चातुदीस[११] संघाचा उल्लेख नाही. नाशिक येथील लेखात ‘ भद्रावनीय ’ आणि कार्ले येथील लेखात ‘ महासांघिक ’ यांचा उल्लेख आहे. नाशिक येथील नहपान राजाच्या लेखात[१२] चातुदीस संघाचा उल्लेख आला. परकीय राजाची सत्ता आणि परदेशाशी व्यापारी दळणवळण या दोन्हीमुळे तत्कालीन संस्कृतीची क्षितिजे आपोआप विस्तारली, याचा हा उत्तम पुरावा आहे.

या लेखाच्या दानकर्त्रीचे नाव ‘ लवनिका ’ आहे. ती बहुधा ‘ लोण ’ म्हणजे सध्याचे ‘ लोनाड ’ येथील रहाणारी असावी. लोनाडचा ‘ लोण ’ असा उल्लेख शिलाहारराजा अपराजित याच्या भादान[१३] लेखात आणि मल्लिकार्जुन राजाच्या वसई[१४] येथील शिलालेखात आला आहे. गावापासून नाव देण्याची प्रथा फार जुनी आहे. उदा. अवंती नगरीत रहाणाऱ्या स्त्रीचे नाव अवंतिका, मालव–मालविका इ. ही नावे सुप्रसिद्ध आहेत.

अशात्ऱ्हेने प्रस्तुत शिलालेखाने महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासात मोलाची भर घातली आहे यात शंका नाही.

वाचन

ओळ–१ सिधं उपासकस कलिअणकस नदणपुतस
ओळ–२ गहपतिस सेविस अचलस धरिणी
ओळ–३ लवनिकाये सपरिवाराय देयधम लेण
ओळ–४ पानियपोटि व्हाणपोढी कलिवाण अबालिकस
ओळ–५ सघनिवासण लेणस अखयनिवि काहापणमिणि
ओळ–६ सतानि तिणी अखयनिवी भिखुसंघे देयधम
ओळ–७ सवासतिणी........... तु मि या ग पा........... चि
ओळ–८ वरिके ही पानि.......... च देयधम चि
ओळ–९ रिचाक चातुदिस भिखुसघच माता पितुना
ओळ–१० पुयथ सवसतहित सुघाय.

टीपा

1) Bird J., Historical Researches on the origin and principles of the Buddha and Jaina Religions, Bombay, 1847.

2) West E., JBBRAS, vol. VI 1862, pp 1.14

3) Buhler G., Archaeological Survey of Western India Vol. V.

4) Dikshit M. G., Buddhist Settlements of W. India

5) Bombay Gazetteer, Vol. XIV, p. 7.

6) Ghosh A., Epi. Ind. XXIV p. 14.

7) Sircar D. C., Epi. Ind., Vol. XXXVII, p. 61.

8) Schoff W. H., The Periplus of the Erythraean Sea p. 197.

9) Majumdar S. N., McCrindle's Ancient India as described by Ptolemey, p. 40.

10) Luders H., Appendix to Epi. Ind., Vol. X.

11) Senart E., Epi, Ind. VII, p. 47.

12) Senart E., Epi. Ind. Vol. VIII, p. 80.

13) V. Kielhorn F., Epi. Ind. Vol. III, p. 267.

14) Sankalia H. D., Upadhyaya S. C., Epi. Ind. Vol. XXIII, p. 274.

लीलाशुक बिल्वमंगलाचे कृष्णकर्णामृत*

वसुधा गंधे

भारतातील मध्ययुगीन विचारप्रवाहांमध्ये वैष्णवपंथाला महत्त्वाचे स्थान होते. साहजिकच ह्या काळात कृष्णभक्तीपर रचना विपुल झाली. जयदेवाचे 'गीतगोविन्द' त्यातील लयबद्ध माधुर्यामुळे सर्वश्रुतच आहे. चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धातील असाच एक दुसरा कृष्णभक्तिपर संस्कृत श्लोकांचा संग्रह म्हणजे 'कृष्णकर्णामृत.' 'करारविन्देन पदारविन्दम्' किंवा 'प्रातः स्मरामि' हे आपल्याला सुपरिचित असलेले श्लोक ह्या कृष्णकर्णामृतांतलेच.

जवळजवळ सत्तर हस्तलिखितांचा अभ्यास करून पाठभेदांची चिकित्सा करून श्रीमती फ्रॅन्सिस विल्सन ह्यांनी ह्या काव्याची ही संपादित आवृत्ती प्रसिद्ध केली आहे. ह्या संपादित आवृत्तीत तीन शतके असून त्यांत ३२८ श्लोक आणि इतर १९ श्लोक समाविष्ट केले आहेत. मूळ संस्कृत श्लोक रोमन लिपीत देऊन सोबत इंग्लिश भाषांतर दिले आहे. ह्या संपादित आवृत्तीच्या निमित्ताने मूळ काव्याचाही थोडा सविस्तर परिचय येथे दिला आहे.

बहुतेक संस्कृत ग्रंथांच्या लेखकांच्या अगर कवींच्या कालाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नसते. कृष्णकर्णामृत त्याला अपवाद नाही. लीलाशुक बिल्वमंगल हा त्याचा कवी मानला जातो. ह्या काव्याच्या लोकप्रियतेमुळे काव्याच्या श्लोक-संख्येपासून सर्वत्र अनिश्चितता आहे. दक्षिण भारतात हे काव्य तीन शतकात्मक आहे असे मानले जाते– अर्थात शतक म्हणजे बरोबर शंभर नाहीत, शंभरापेक्षा जास्तच, म्हणजे ११२ पर्यंतसुद्धा श्लोक एका शतकात गणले आहेत. चैतन्यांनी त्यांच्या दक्षिण भारताच्या यात्रेच्या वेळी हे काव्य बंगालमध्ये नेले, तेथे यातील फक्त पहिलेच शतक कृष्णकर्णामृत म्हणून मानले जाते. चैतन्यांचे अनुयायी ते प्रमाणभूत मानतात. तर दक्षिणेकडे दुसरे शतक जास्त लोकप्रिय आहे.

कृष्णकर्णामृत म्हणजे सुटया श्लोकांचा संग्रह आहे. त्याची रचना खंडकाव्या-सारखी नाही. त्यामुळे श्लोकात कालानुक्रम राखलेला दिसत नाही. परंतु कृष्ण-

---

* श्रीमती फ्रॅन्सिस विल्सन संपादित 'लव्ह ऑफ कृष्ण–दि कृष्णकर्णामृत ऑफ लीलाशुक बिल्वमंगल' या ग्रंथाचे रसग्रहण. (युनिवर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हानिया प्रेस, फिलाडेल्फिया; १९७५).

चरित्रातील बहुतेक महत्त्वाच्या प्रसंगांचे उल्लेख यात आलेले आहेत– विशेषतः ह्या काव्याच्या दुसऱ्या शतकात. कालियाशासन (२.२), पूतनेचा वध (२.२९) रुक्मिणीहरण (२.३३), कंसवध (२.३६), सत्यभामेच्या दारात पारिजातकाचे झाड (२.४२), गोवर्धन पर्वत करंगळीवर उचलणे (२.२६ आणि २.५२), पांडवांच्या घोड्यांना खरारा (२.४७), अन्धकाचा वध (२.८०), पुण्यशील नंदाने स्वतःची मुलगी देऊन कृष्ण प्राप्त करून घेतला (२.९७), चाणूराचा वध (२.९९) हे सर्व उल्लेख ह्यात आहेत. दुसऱ्या शतकात कृष्णाच्या चरित्रातील ह्या निरनिराळ्या घटनांच्या उल्लेखाबरोबरच कृष्णाच्या बालपणच्या खोडकर चाळ्यांचे अत्यंत मनोज्ञ वर्णन आलेले आहे. त्यामानाने पहिल्या आणि तिसऱ्या शतकातील श्लोकांचे स्वरूप काहीसे निराळे आहे. भक्ताने देवाचे विविध रीतींनी केलेले स्मरण आणि गुणवर्णन असे त्याचे स्वरूप आहे.

कृष्णकर्णामृतामध्ये भक्तीचा आविष्कार निरनिराळ्या प्रकारांनी झालेला दिसतो. श्रीमद्भागवताला अनुसरून कृष्णचरित्रामध्ये गोपींबरोबर कृष्णाचा प्रणय सामान्यपणे दर्शविला जातो, तो येथे आहेच त्याच्या बोटांना गोपींच्या केसांचा वास येतो (३.८९), गोपींना आवडेल असा वेष त्याने धारण केला असून गोपींनी त्याला दृढालिंगन दिलेले आहे (३.७९), त्याच्याभोवती गोपींनी फेर धरला आहे (३.८१), प्रत्येक गोपीबरोबर स्वतंत्र कृष्ण होऊन अनंत रूपांनी तो नाचतो आहे (२.३५) गोपींखेरीज श्री, लक्ष्मी, राधा, रुक्मिणी, सत्यभामा ह्यांचाही उल्लेख आहेच. राधेच्या कटाक्षांमुळे त्याच्या अंगावर रोमांच उठले आहेत, तर विलासा-नंतर जाग्या झालेल्या लक्ष्मीने आलिंगन दिल्यामुळे ते रोमांच आणखी दाट झाले आहेत. (३.५७). लज्जानत झालेल्या रुक्मिणीच्या सहवासातही तो दिसतो आहे (२.१०५). तो रमावरोधन आहे (३.४४), त्याची छाती 'कमलाविलाससदन' आहे (३.८५).

ह्या प्रणयाच्या वर्णनाबरोबरच शिशुरूपातील कृष्णाविषयी वात्सल्य आहे. इतरांना जगच्चालनामागील गूढ तत्त्व काय शोधायचे असेल ते शोधू दे, आम्ही तर यशोदेच्या बाळाच्या कौतुकात दंग होऊन राहणार असे जे कवीने म्हटले आहे (२.५५), ते खरे करून दाखविले आहे. कृष्णाचे मृदु स्मित (१.२४, १.५० आणि ३.३५) आनंददायी आहे. रत्नखचित भूमीवर रांगताना हातांत आपले प्रतिबिंब येत नाही म्हणून आईच्या तोंडाकडे बघून रडणारा 'बाळ'कृष्ण इथे आहे (२.५४) अंधार झाल्यावर रात्री दूध प्यायचे असे आईने म्हटल्यावर डोळे मिटून 'बघ आता अंधार झाला. दे दूध!' असे म्हणणारा कृष्ण इथे आहे (२.६०), माठातल्या पाण्यात पडलेले चंद्राचे प्रतिबिंब म्हणजे लोण्याचा गोळा आहे असे मानून ते पकडू

पाहणारा कृष्ण इथे आहे (इतर श्लोक क्र. ६, पृ. २२७), प्रातःकाळी कृष्णाला उठवताना त्याच्याकडे वात्सल्याने पहातच बसलेली यशोदा इथे आहे (२.६८).

कवीच्या मनात कृष्णाविषयीचा एक प्रकारचा सुहृद् भावही आहे. जो कृष्ण उपनिषदांचा अभ्यास करणाऱ्यांना दिसतही नाही, तो प्रेमामुळे माझ्या डोळ्यांसमोर सतत येतो (१.९४), यमुनेच्या तीरी तमालवृक्षाखाली गायी राखणारा तो कृष्णसखा आनंदाचा सरळ मार्ग तुम्हाला दाखवील (२.४३), त्याच्या आश्रयाला आलेल्यांसाठी त्याने गोपरूप धारण केले आहे, मग आणखी आपल्याला पाहिजे तरी काय ? (३.२३).

अर्थात् ह्या सर्व भावनांच्या मुळाशी भक्तिभावनाच आहे. ' कृष्णा, तू यज्ञाच्या ठिकाणी जायला लाजतोस, पण गोपाळांच्या अंगणात चिखलात खेळतोस, त्यांच्या हाकेला ओ देतोस पण इतरांच्या स्तुतीलाही दाद देत नाहीस, ' ' गोपींचा दास होऊन राहतोस पण इंद्रियदमन करणाऱ्यांना प्रसन्न होत नाहीस. कळले कृष्णा, की, तुझे पाय भक्तीतच अडकून पडतात, इतर कशात नाहीत. ' (२.८३). भक्तिमार्गाचे हे श्रेष्ठत्व–भागवतधर्माचे हे मुख्य तत्त्व–असेच आणखी काही श्लोकांत सांगितले आहे. कृष्णचरित्राचा आस्वाद ज्या क्षणी घेता येईल, तोच क्षण मानवी आयुष्यात मोजण्याजोगा मानावा (३.३४). कृष्णावर श्रद्धा ठेवली की साक्षात् निर्वाणसुद्धा प्राप्त होईल, मग इतर ईप्सितांची काय कथा ? (३.७१). सर्वज्ञत्वाचा आणि मुग्धत्वाचा हा एकत्र अवतार डोळ्यांपुढे येताच निर्वाण प्राप्त होते. (१.८३).

भगवच्चिंतनात दंग असलेल्या भक्ताला वेगळे काही सुचतच नाही. कोणी एक गोपी दही विकायला बाहेर पडली आणि 'दही' असे म्हणण्याच्या ऐवजी 'गोविंद दामोदर माधव' असेच म्हणू लागली (२.५६). कृष्णा, तू प्रसन्न असलास तर मला आणखी वेगळे गुण काय उपयोगाचे ? आणि तू प्रसन्न नसलास तर गुण असून तरी काय उपयोगाचे ? पती अनुरक्त असला अगर नसला तरी स्त्रीचा शृंगार निष्फलच (२.१००), स्नान, संध्या, वंदन, देव-पितृ-तर्पण सर्व राहू दे, कृष्णाचे स्मरण असले की तेवढे मला पुरेसे आहे (२.१०७). कृष्णावर अनन्यभक्ती असेल तर मुक्ती हात जोडून पुढे उभी राहील (१.१०७).

अशा ह्या काव्याला अभिजात काव्यगुणांची जोड लाभलेली आहे. यमकअनुप्रासादि अलंकार, स्वभावोक्ती, अतिशयोक्ती आणि त्यांच्या जोडीला 'पुनरुक्ती' हे शैलीगत विशेष यात प्रकर्षाने आढळतात. या ग्रंथाचा कर्ता म्हणजे लीलाशुक नावाचा वैयाकरणच होय असे काही टीकाकारांचे मत आहे. कृष्णकर्णामृत वाचत

असताना अनेक ठिकाणी येणाऱ्या त्याच्या व्याकरण नैपुण्याच्या प्रत्ययावरून हे मत खरे असावे असे वाटू लागते.

कृष्णकर्णामृताचे एकूण स्वरूप हे असे आहे. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे त्याची जवळजवळ ७० हस्तलिखिते मिळवून प्रस्तुत आवृत्ती सादर केलेली दिसते. ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत चिकित्सा-आवृत्तीला अनुलक्षून असलेल्या प्रश्नांचा अभ्यासपूर्वक उहापोह केलेला आढळतो. प्रथम हे काव्य आणि त्याचे निरनिराळ्या ठिकाणी प्रचलित असलेले निरनिराळे पाठ, विद्वानांची त्यासंबंधीची मते देऊन नंतर कविविषयक प्रश्नांकडे लक्ष दिलेले आहे. कवी, त्याचा काळ, त्याच्याविषयीच्या आख्यायिका, त्याच्या इतर रचना ह्या विषयी चर्चा आहे. त्यानंतर ही आवृत्ती संपादित करताना वापरलेल्या सर्व साहित्याचा–हस्तलिखित तशाच छापील पुस्तकांचा – तपशील असून हस्तलिखितांचा परस्परांशी कसा संबंध आहे हे दाखविले आहे. साहित्यकृतीच्या लोकप्रियतेबरोबरच पाठभेदांची गुंतागुंत वाढत जाते आणि चिकित्सा-आवृत्तीचा प्रश्न बिकट होऊन बसतो. प्रस्तुत काव्याचे संपादन करताना हस्तलिखितांचे एक मुख्य प्रवाह आणि दोन उपप्रवाह कल्पिले आहेत. केवळ दक्षिण भारतात प्रचलित आणि उत्तर भारतात प्रचलित असे दोन ढोबळ प्रवाह न करता विजयनगर विभागात त्या प्रवाहाने एक कसे स्वतंत्र रूप धारण केले आहे, तेही बघितले आहे व विजयनगर प्रवाहाला त्यानुसार मूल्य दिले आहे. दक्षिण भारतातील चार निरनिराळे पाठ व चैतन्यांनी बंगालमध्ये प्रचलित केलेला पाठ ह्यांचा एक गट केला असून मूळ पाठ ठरविताना त्याला प्राधान्य दिलेले आहे. स्थळ आणि काळ ह्या दोन्हींचे अनुसंधान राखून मूळ पाठ कसा निश्चित केला आहे ह्याचे दिग्दर्शन करणारी माहिती (पृ. ८७ ते ९२) अभ्यासकाला निश्चित महत्त्वाची वाटेल. विशेषतः काही हस्तलिखितांना कृष्णकर्णामृत असे नाव नसताही अगर त्यातील निम्मे श्लोक सर्वथा वेगळे असताही त्यांचा सखोल अभ्यास करून त्यांचा इथे अंतर्भाव केला आहे. आपल्याकडे खूप वेळा हस्तलिखिते दुर्लक्षिली जातात परंतु त्यांचा संपादनासाठी उपयोग कसा करावा ह्या दृष्टीने हा भाग बघण्याजोगा आहे.

एखाद्या भाषेतील विचार दुसऱ्या भाषेत आणणे ही गोष्ट कठीण आहेच. त्यातही संस्कृत समासप्रचुर. संस्कृतच्या विशिष्ट घडणीमुळे साधले जाणारे नादमाधुर्य अगर शब्दालंकार इंग्लिशमध्ये आणणे कठीणच. कृष्णकर्णामृतातील श्लोकांबरोबर दिलेल्या भाषांतराकडे बघताना हा विचार मनात येतोच. शब्दशः नसले तरी पुष्कळ वेळा भाषांतर चांगले साधले आहे. १.२९ (उत्तरार्ध), १.४३, १.४९ हे छोटे श्लोक अगर १.१०९, ३.५७ सारखे दीर्घ आणि समासप्रचुर श्लोक या

दृष्टीने बघता येतील. मात्र एक-दोन ठिकाणी हे भाषांतर खटकते. कृष्णाच्या मुखचंद्राच्या उदयामुळे खऱ्या चंद्राची शोभा वृद्धिंगत होऊन माझ्या तृष्णेचा सागर दुप्पट उचंबळून येतो (१.८४) इथे 'द्विगुणीकरोति'चे भाषांतर divides असे केले आहे. तेथे अगर पृ. २३१ वरील तिसऱ्या श्लोकातील शेवटच्या दोन चरणांचा अगदी निराळाच अर्थ करून मुळातील सुरेख आशयाच्या अगदी विरुद्ध अर्थ दिला आहे. कृष्णाच्या ठायी ज्याचे मन लीन झाले आहे अशा कृष्णभक्ताने जप, होम, हवन, व्रताचरण, इतकेच काय देवही असे सगळे सोडून दिले आहे. असा मूळ आशय आहे. इथे जप केला, होम केला, व्रते केली आणि देवांना सोडविले असा अर्थ केला आहे! कृष्णाच्या कृपासागरातून निर्माण झालेल्या मुरली-वादनाच्या अमृतामुळे माझ्या समाधीचा भंग होवो असा आशय आहे (१.३४), त्या श्लोकाच्या भाषांतरात गोळा-बेरीज अर्थ येत असला तरी श्लोकाच्या अन्वयाशी तो जुळत नाही.

चिकित्सापाठाचे विचारपूर्वक केलेले संपादन आणि सर्वसाधारणपणे सुबोध भाषांतर ह्या दोन गोष्टींमुळे वाचकाला हे पुस्तक मननीय वाटेल. पण पदोपदी आढळणाऱ्या मुद्रणदोषांनी ह्या पुस्तकाला जणू गालबोट लावले आहे. 'अरविङ्ग'च्या जागी 'अरविंद' हवे आहे (१.३१). 'कुरुणा' ऐवजी 'करुणा' हा शब्द पाहिजे (१.१८), 'षर्व'च्या ठिकाणी 'सर्व' असा शब्द हवा (पृ. २२९, श्लोक क्र. ५), किंवा 'अपहासाद् चे अफासाद्' (२.७१) झाले आहे. असल्या बारीक सारीक चुका वाचक जाणून घेऊ शकतो आणि त्याच्या रसास्वादात व्यत्यय येत नाही. परंतु क्वचित् ह्या दोषांनी वाचकाला वाचनात अडखळवून टाकले आहे. २.६५ ह्या श्लोकात यशोदेला कृष्ण विश्वरूपदर्शन घडवतो त्या प्रसंगाचे वर्णन आहे. त्यात चौथा चरण कोठे आहे? ३.९२ मध्ये लोण्याचा गोळा पकडू पाहणाऱ्या कृष्णाचे वर्णन आहे. त्याच्या दुसऱ्या चरणात 'क्षितौ' ऐवजी 'क्षितौ क्षितौ' असा पाठ दिला आहे. ३.१०१ मध्ये 'वृंदावननिवेशितम्' ऐवजी 'वृन्दावनैवेशितम्' असे छापले आहे. ३.७२ मध्ये चौथ्या चरणात 'अयम्' हा शब्दच गळला आहे. ३.७६ मध्ये 'कमला' ऐवजी 'कमलया' पाहिजे आहे. १९० च्या चौथ्या चरणात 'वन्दे' असे क्रियापद हवे आहे. वाचताना वृत्तभंग झाल्यावर वाचक अडखळतो. मग हा पाठच असा आहे का हा मुद्रणदोष आहे हे क्वचित श्लोकांनंतर दिलेल्या पाठभेदांच्या सामग्रीवरून किंवा क्वचित् भाषांतरावरून वाचकाला जाणून घ्यावे लागते आणि कधी ह्या दोन्हीवरूनही काही कळत नाही! पृ. २३१ वरील पाचव्या श्लोकाच्या तिसऱ्या चरणात 'दुष्कर्मकुलकषणे' असा शब्द आहे. त्या श्लोकाच्या वसंततिलक वृत्तान्त हा शब्द खटकतो. तेथे 'कूल' पाहिजे आहे. वृत्ताप्रमाणेच त्या समासात वापरलेला 'कषण' हा शब्द पाहिला तरी 'कूल'

असाच पाठ उचित वाटतो. येथे भाषांतरही ‘ कुल ’ ह्या शब्दाचेच केले आहे. पाठभेदांतही उल्लेख नाही आणि इतरत्रही कोठे ह्याची नोंद दिसत नाही.

उपलब्ध माहितीवरून असे दिसते की कृष्णकर्णामृताचा कवी दक्षिण भारतातील होता. बंगालमध्ये चैतन्यांच्या अनुयायात तर ते काव्य प्रमाणभूत मानतात. दक्षिण भारतात कोणत्याही पंथात ते प्रमाण मानले जात नसले तरी ते सर्वांच्या तोंडी येणारे आहे. त्यामानाने ते महाराष्ट्रात फारसे प्रचलित नाही. तेराव्या शतकानंतर महाराष्ट्राच्या जीवनात विठ्ठलाच्या भक्तीला आणि संतांच्या मराठी रचनेला जे स्थान प्राप्त झाले, त्यापुढे पंडिती वळणाच्या संस्कृत काव्यातील भाव कमी महत्त्वाचे वाटू लागले. हे बहुधा त्याचे कारण असावे. मराठी संतवाणीइतके उत्कट नसले तरी ह्या काव्यात भक्तिरसाचे चांगले दर्शन घडते. म्हणून ह्या काव्याचा हा थोडा सविस्तर परिचय करून दिला आहे.

आकाशभैरवकल्पातील साम्राज्यलक्ष्मीपीठिका : एक तांत्रिक यातुधर्मात्मक माहितीसंग्रह

गणेश थिटे

प्रस्तावना

आकाशभैरवकल्पातील साम्राज्यलक्ष्मीपीठिका (संपादक के. वासुदेवशास्त्री आणि के. एस्. सुब्रह्मण्यशास्त्री, तंजावर, १९५२) ह्या ग्रंथात प्रामुख्याने साम्राज्यलक्ष्मीची उपासना हा विषय आहे. राजाने आपले साम्राज्य वाढावे, स्थिर व्हावे ह्यासाठी करावयाचे तांत्रिक विधी ह्या ग्रंथात वर्णिले आहेत. त्या अनुरोधाने राजाला उपयोगी असे युद्धशास्त्र, धनुर्विद्या, गजविद्या, अश्वविद्या, राजांची दिनचर्या ह्यांसारखेही विषय प्रस्तुत ग्रंथात आले आहेत. तसेच वर्षभर निरनिराळ्या दिवशी करावयाचे उत्सव व व्रते ह्यांचीही माहिती प्रस्तुत ग्रंथात आली आहे, मात्र ही माहिती जादूटोणा व धर्म ह्यांच्या घटकांनी परिपूर्ण असल्याने प्रस्तुत ग्रंथाचे एकूण स्वरूप एक **तांत्रिक, यातुधर्मात्मक** (मॅजिकोरिलिजिअस्) **माहिती संग्रह** ह्या प्रकारचे आहे.

साम्राज्यलक्ष्मीचे स्वरूप व महत्त्व

सन्मार्गवर्ती राजाने साम्राज्य मिळवून प्राप्त केलेली लक्ष्मी म्हणजे साम्राज्यलक्ष्मी. हिच्या कृपाकटाक्षास पात्र असलेल्या व नीतीने चालणाऱ्या राजांना धनधान्यांनी समृद्ध अशी राष्ट्रे आणि नगरे सहज प्राप्त होतात. साम्राज्यलक्ष्मी ज्या राजाला अनुकूल आहे अशा व धर्मानुसार वागणाऱ्या राजाकडे वैभव राहते. त्याला हत्ती, घोडे, सैनिक, स्त्रिया ह्यांची प्राप्ती होते. मांधातृ, राम, युधिष्ठिर ह्यांसारख्या अत्यंत **धार्मिक** राजांनी साम्राज्यलक्ष्मीची उपासना करूनच मोठे साम्राज्य मिळविले (पटल १). पटल दोन मध्ये साम्राज्यलक्ष्मीचे देवतास्वरूपात वर्णन केले आहे.

साम्राज्यलक्ष्मीची उपासना

'ओम् नमो भगवत्यै साम्राज्यदायै लक्ष्म्यै स्वाहा' हा साम्राज्यलक्ष्मीचा मंत्र आहे. तो मंत्र भुक्तिमुक्तिप्रद आहे. त्या मंत्राचा लक्ष जप करून ब्राह्मणभोजन घालावे (पटल ३). साम्राज्यलक्ष्मीचे सोन्याचे किंवा चांदीचे यंत्र तयार करून त्याची पूजा केल्यास पापे व संकटे नष्ट होतात. भुते-खेते पळून जातात. (पटल४)

विपुल श्री मिळवण्यासाठी ह्या यंत्राची वैदिक व तांत्रिक मंत्रांनी प्रतिष्ठापना करून पूजा करावी व मग ते यंत्र ब्राह्मणास दान करावे (पटल ७) दीर्घायुष्यप्राप्तीसाठी मध लावलेल्या तिळांचा, शारीरिक बल मिळावे म्हणून गायीच्या तुपाचा, शत्रू मरावेत ह्यासाठी बिब्ब्याच्या झाडांच्या समिधांचा होम करावा (पटल ८). ह्यांसारखे अनेक यातुधर्मात्मक साम्राज्यलक्ष्मीच्या उपासनेचा भाग म्हणून सांगितले गेले आहेत.

तसेच उत्पात घडल्यावर, किंवा मोठा लोकसंहार झाल्यावर किंवा काही चमत्कार घडल्यावर साम्राज्यलक्ष्मीची महापूजा करावी व त्यानंतर साम्राज्य-लक्ष्मीला भयनष्ट करण्याची प्रार्थना करावी (पटल १०–१४). तसेच उत्पातांचे वाईट परिणाम घडू नयेत म्हणून महाशान्ती करावी (पटल १७–२१).

वर्षभरातील उत्सव, व्रते व उपासना

राजाने वर्षभरात करावयाची व्रते, सण, इत्यादींची माहिती हे आकाश-भैरवातील साम्राज्यलक्ष्मीपीठिकेचे वैशिष्टच आहे. चैत्र शुद्ध प्रतिपदेला ब्राह्मणांची व पुत्रपौत्रांनी युक्त अशा पुरंध्रींची पूजा करावी. निंबपत्रे भक्षण करावीत, संवत्सरफलश्रवण करावे (पटल ८२). ह्या दिवशी सायंकाळी मल्लयुद्ध, मुष्टियुद्ध संगीत, इत्यादी कार्यक्रम करावेत. अशा रीतीने वर्षारंभ केल्यास आयुष्य, पुत्र ह्यांची प्राप्ती होते. (पटल ८३) चैत्र शुद्ध नवमीस श्रीरामव्रत करावे. त्यात उपोषण, रामपूजन हे विधी येतात (पटल ८४) वैशाखपौर्णिमेला तांबूल, गोपी-चंदन, कर्पूर, जल, शय्या, उसाचा रस, छत्री इत्यादी वस्तूंची दाने करावीत (पटल ८७) ज्येष्ठ अमावस्येला वृषभव्रत करावे. त्यात लाकडी बैलांची पूजा करून ते धान्याच्या कोठारात ठेवावेत. त्यामुळे पशु, धन, धान्य ह्यांची वृद्धी होते (पटल ८८) आषाढशुद्ध एकादशीला विष्णुपूजा करावी (पटल ८९). श्रावणपौर्णिमेला घरलक्ष्मीव्रत करावे. त्यात लक्ष्मी, राजचिन्हे, व कोशागार ह्यांची पूजा करावी (पटल ९०) श्रावण कृष्ण अष्टमीस कृष्णजन्माष्टमीव्रत करावे (पटल ९२). भाद्रपद शुक्ल चतुर्थीस सिद्धिविनायकव्रत करावे. त्यात सोने, रौप्य, किंवा माती ह्यापासून गणेशमूर्ती तयार करून पूजा करावी. ह्या मूर्तीत मांड्या व पोटऱ्या आखूड असाव्यात (पटल ९३). ह्याच महिन्यातील चतुर्दशीला अनंतव्रत करावे. त्यात दर्भापासून अनंत तयार करून त्याची पूजा करावी (पटल ९६). आश्विनात नवरात्रव्रत करावे व त्यात उपवास, गायत्रीपारायण, वेदपारायण करावे. ह्या काळात देवीमाहात्म्य श्रवण केल्याने मोक्ष मिळतो (पटल ९७). ह्याचवेळी दुर्गापूजा करावी. त्यावेळी पुरोहिताने राजाला राजधर्माचा उपदेश करावा (पटल ९९–१००), ह्या उपदेशात ' राजाला तू प्रजेचे हितचिंतन कर; ब्राह्मणांचे परि-पालन कर; भिषग्वर, मंत्रतंत्ररहस्यज्ञ, कवी, गायक, क्षत्रिय, शूद्र, वैश्य, योगी

...४

ह्यांचे पालन कर; संकर होऊ देऊ नको ' असे सांगितले जाते (पटल १०१). मग त्याला तत्त्वज्ञानाचा उपदेश केला जातो (पटल १०२). त्यानंतर राजाने हत्ती व घोडे ह्यांची पूजा करावी (प. १०६). ह्यानंतर विनोद म्हणजे करमणुकीचे कार्यक्रम व्हावेत व राजाने ते पाहावेत. त्यात प्रथम सैन्यावलोकन, व नंतर संगीत, नाट्य, काव्यगायन, जलस्तंभविद्या, मल्लयुद्ध, मेषयुद्ध इत्यादी प्रकार व्हावेत. मग शोभेचे दारूकाम पहावे. नंतर कलावंतांचा सत्कार करावा. मग राजाने अंतःपुरात जावे. असे नऊ दिवस करावे. दशमीला शत्रूच्या दिशेने बाण टाकावेत (पटल १०७). ह्या दिवशी असे बाण टाकल्याने **तिथीच्या** प्रभावामुळे राजाला विजय मिळतो (प. १०८–१०९). नवरात्रात दररोज कुमारीपूजन करावे. ह्या कुमारी ३ ते १० वर्षांच्या अव्यंग असाव्यात (प. ११०). नरकचतुर्दशीला दीपदान करावे (प. ११२). कार्तिक प्रतिपदेस बलीचे ध्यान करावे (प. ११३). मार्गशीर्षमासात मुद्गान्न व चित्रान्न ह्यांचा नैवेद्य दाखवावा (प. ११६). पौषमासात संक्रांतीला गो, पृथ्वी व तिल ह्यांचे दान करावे (प. ११७). माघातील कृष्ण चतुर्दशीला उपवास करावा (प. ११८). फाल्गुन शुद्ध प्रतिपदेला एखाद्या पटावर रतीसह मदनाचे चित्र काढून ते नगरात फिरवावे. तिसऱ्या प्रहरी त्याला नैवेद्य दाखवून तो पट जाळावा (प. १२३)

तीर्थयात्रा

पापनाश व पुत्रप्राप्तीसाठी राजाने तीर्थयात्रा करावी. तीर्थयात्रेपूर्वी मी परत येईपर्यंत मौनी, ब्रह्मचारी राहीन असा संकल्प करावा व शकुन पाहून गमन करावे (प. १२५). दररोज एक किंवा अर्धा योजन जावे. तीर्थावर गेल्यावर केशश्मश्रू काढून टाकून तीर्थाधिपती देवतेची पूजा करावी. चांगल्या मुहुर्तावर पुनः परत येऊन ब्राह्मणभोजन करवावे (प. १२६). अशा प्रकारे तीर्थयात्रा केल्यास अश्वमेधाचे फल मिळते.

शकुन : स्वरूप व फल

कार्यारंभी शिंक आल्यास ते अनिष्ट आहे. दान करताना भोजनाच्या वेळी शिंक शुभ आहे. रस्त्याने जाताना देवलक, तेली, ससाणा दिसणे शुभ. मांजर आडवे गेल्यास तीन महिन्यांनी मृत्यू येतो. घरात कबुतर शिरणे धनिकांच्या बाबतीत अशुभ व गरिबांच्या बाबतीत शुभ (प. २४) असे विषय तसेच दुःस्वप्नाची शांती (प. २६) अपशकुनांची शांती (प. २५) ह्यासारखे विषयही साम्राज्यलक्ष्मीपीठिकेत आहेत.

राज्यशास्त्र

राज्यशास्त्रीय माहितीमध्ये राज्याभिषेकविषयक तपशील महत्त्वाचे आहेत.

राज्याभिषेक हा राजाच्या जन्मदिनी दरवर्षी, तसेच संकटाच्या वेळी करण्यास सांगितला आहे. त्याचे महत्त्व राजकीय नसून यातुधर्मात्मक आहे. राज्याभिषेका-नंतर राजाच्या कपाळावर एक पट्टा बांधावा, त्या पट्ट्यावर राजाला आवश्यक असलेले गुण लिहिलेलें असतात. उदा. दुष्टांचे शासन, गोदेवव्दिजभक्ती, सत्य, दया इत्यादी. ह्यांही गुणांचे महत्त्व यातुधर्मात्मक दृष्टिकोनातून आहे; राजकीय, भौतिक दृष्टीने नाही. (प. ४७–६२) अन्यत्र राजाची सामुद्रिकशास्त्रानुसार वर्णिलेली लक्षणे (प. ६६) यात्वात्मक दृष्टया अर्थपूर्ण आहेत. तसेच त्याला आवश्यक असलेल्या गुणांमधील विष्णुभक्तीचा उल्लेख (प. ६७) **धर्मेतिहासाच्या** दृष्टीने अर्थपूर्ण आहे.

राजाची दिनचर्या

राजाची दिनचर्या उपभोगप्रधान असली तरी तीही अनेक यातुधर्मात्मक वैशिष्टयांनी युक्त आहे. राजाने सकाळी उठल्याबरोबर इष्टदेवतास्मरण करावे. मग स्त्रियांनी त्याला आरसा, माला, पोपट, दुग्धघट ह्यांसारख्या मंगल गोष्टी दाखवाव्यात. तसेच त्याने श्रोतिय, धेनु, अग्निचित, गंधकुसुमादी पवित्र गोष्टींचे दर्शन घ्यावे (प. ७१) स्नानानंतर पुरोहिताने त्याला तिलक लावावा. तिलक लावणे हीही एक शुभ गोष्ट मानली आहे. मग राजाने जप करावा (प. ७२). देवतापूजन करून तुलसीमिश्रित तीर्थ प्यावे. (प. ७३) मग भारत श्रवण करावे. (प. ७४) नंतर विद्वद्गोष्टी व संगीत ह्यांचा आनंद घ्यावा. (प. ७५) मग मंत्र्यांसह सल्लामसलत (प.७६) कुलक्रमाने चालत आलेल्या नियोगी (ऑफिसर्स) बरोबर कामांची चर्चा करावी. हत्ती–घोडयांना औषधोपचार करावेत. तालमीत जाऊन वेताळाची पूजा करावी. अंगाला लाल माती लावून कुस्त्या खेळाव्यात. मग पुन: स्नान करून अंत:पुरात जावे (प. ७७). नंतर भोजन करावे. मग पोटावरून हात फिरवून शतपावली करावी व पापनाशासाठी रामायणश्रवण करावे. सायंकाळी राजमार्गावरून व बाजारपेठेतून फिरून यावे (प. ७८) मग संध्या, अग्नी, द्विज ह्यांची उपासना करावी. भागवत ऐकावे. निरनिराळ्या देशातून आलेल्या संदेश-पत्रिका वाचाव्यात. (प. ७९).

राजाने साम्राज्यलक्ष्मीला स्थैर्य यावे म्हणून नृत्य पहावे. ह्यातून नृत्याचे भावात्मक महत्त्व सूचित केले आहे व नृत्याची माहिती दिली आहे. (प. ८०) चांदण्या रात्री ज्योत्स्नाविहार करावा (प. ८१) आषाढातील चतुर्दशीला तालमीचे पूजन करावे (प. ९१) मधून मधून मृगयेस जावे. त्यात विविध पशूंना मारून मग हिंसाशान्ती करावी. त्यावेळी गाई, सोने, जमीन ह्यांचे दान करावे.

दुर्गशास्त्र

आकाशभैरवाच्या साम्राज्यलक्ष्मीपीठिकेमध्ये राजाला उपयोगी असे दुर्गशास्त्र आले असून तो विषय फार महत्त्वाचा आहे. त्यात दुर्गांचे गिरिदुर्ग, वनदुर्ग, जलदुर्ग कर्दमदुर्ग, मिश्रदुर्ग, नरदुर्ग, कोष्ठदुर्ग असे प्रकार पाडले आहेत. गिरिदुर्गांचे भद्र, अतिभद्र, चंद्र, अर्धचंद्र, नाथ, सुनाभ, रुचिर व वर्धमान असे उपप्रकार वर्णिले आहेत. तसेच ह्या प्रत्येक प्रकारच्या दुर्गात राहण्यामुळे मिळणारे यात्वात्मक फायदेही वर्णिले आहेत. उदा. वर्धमान हा किल्ला मर्दलनावाच्या वाद्याप्रमाणे क्रमाने वाढत जाणाऱ्या आकाराचा असतो आणि अशा किल्ल्यात राहिल्याने राजाची धनधान्यांनी वृद्धी होते. दुर्ग शुभ दिनी व शुभ नक्षत्रावर बांधावा. वेगवेगळ्या द्वारात वेगवेगळ्या देवदेवतेची स्थापना करावी. ह्यासारखे अनेक यातुधर्मात्मक दृष्टीने महत्त्वाचे तपशील दुर्गशास्त्रातही आले आहेत (प. ३१–३६) तसेच पटल ३९ ते ४३ मध्ये आलेल्या राजवाड्याची बांधणी, नगररचना ह्यासारख्या विषयातही अनेक तपशील यातुधर्मात्मक दृष्ट्या अर्थपूर्ण आहेत.

राजाने नेमावयाचे अधिकारी

पटल ६३ मध्ये अधिकाऱ्यांची यादी दिली आहे. त्यामध्ये सेनाध्यक्ष, वनपाल, धान्यकोष्ठाधिप ह्यांसारख्या व्यावहारिक दृष्ट्या उपयुक्त अशा अधिकाऱ्यांबरोबर उपाध्याय, पुरोहित, पौराणिक, ज्योतिषी, ह्यांसारखे अधिकारी उल्लेखिले आहेत. ह्यांवरून राज्याची संकल्पना कशी यातुधर्मात्मक होती हे स्पष्ट होईल.

विविध कला, विद्या

ह्यांची यादी पटल ६४ मध्ये आली आहे. त्यामध्ये आयुर्विद्या, धनुर्विद्या, गांधर्वविद्या, चित्रकर्म ह्यांसारख्या उपयुक्त विद्या व कलांबरोबर ऋग्विद्या, अथर्वविद्या, परकायप्रवेशिका, अदृश्यविद्या, मरणकारिणीविद्या, उच्चारविद्या ह्यांसारख्या यातुधर्मात्मक दृष्ट्या महत्त्वाच्या विद्यांचा समावेश लक्षात घेण्याजोगा आहे.

काही विद्यांचे विवेचन

आकाशभैरवकल्पातील साम्राज्यलक्ष्मीपीठिका हा एक विविध प्रकारच्या माहितींचा संग्रह आहे हे सुरुवातीला सांगितलेच आहे. ह्या ग्रंथामध्ये रथविद्या (प. १३१), गजविद्या (प. १३२) अश्वविद्या (प. १३३) धनुर्विद्या (प. १३५-१३६) युद्धविद्या (प. १३४; १२८, १२९, १३७ इ.) ह्यांसारख्या विषयांचे तपशीलवार विवेचन आहे. ह्यांतील बरीचशी माहिती पारंपारिक असून ती शिवतत्त्वरत्नाकरासारख्या अन्य माहिती संग्रहस्वरूपाच्या ग्रंथामध्ये कमी अधिक प्रमाणात आढळते. ह्या विषयांच्या शिवतत्त्वरत्नाकरातील माहितीचे तपशील व त्याचे यातुधर्मात्मक महत्त्व मी माझ्या ' शिवतत्त्वरत्नाकर : एक धर्मकोश ' ह्या लेखात

(पूर्वार्ध–नवभारत, एप्रिल, १९७४, पा. ५१–७९; उत्तरार्ध–नवभारत, मे १९७४, पा. ४१–८०) दिले आहे. ते विवेचन आकाशभैरवकल्पातील साम्राज्यलक्ष्मी-पीठिकेमधील ह्या विषयांच्या बाबतीतही लागू पडत. असल्या ह्या विषयांचे तपशील व त्यांचे यातुधर्मात्मक महत्त्व मी येथे वर्णीत नाही. केवळ शिवतत्त्वरत्नाकरावरील माझ्या लेखांचा संदर्भच देत आहे.

निष्कर्ष

आकाशभैरवकल्पातील साम्राज्यलक्ष्मीपीठिका ह्या ग्रंथाची सामान्य वैशिष्टचे पाहू जाता हे लक्षात येईल की ह्या ग्रंथात साम्राज्याच्या वाढीच्या व स्थिरीकरणाच्या दृष्टीने उपयुक्त अशी माहिती आली आहे. संस्कृत-मधील अशा प्रकारची माहिती संग्रहीत करणारे मानसोल्लास (अभिलषितार्था-चिन्तामणि), शिवतत्त्वरत्नाकर ह्यासारखे माहितीकोश प्रसिद्ध आहेत. मात्र मानसोल्लास व शिवतत्त्वरत्नाकर ह्यांच्याशी तुलना करता आकाशभैरवकल्पातील साम्राज्यलक्ष्मीपीठिका ह्या प्रस्तुत ग्रंथात काही वेगळेपणा जाणवतो. प्रथम म्हणजे अन्य ग्रंथांच्या तुलनेने प्रस्तुत ग्रंथातील तपशीलांमध्ये राजोपभोगाची दृष्टी कमी आहे. त्यामुळेच प्रस्तुत ग्रंथात पाकशास्त्र, कामशास्त्र, संगीत ह्यासारख्या उपभोग-विषयावर अन्य ग्रंथांच्या तुलनेने कमी माहिती मिळते. ह्या उलट राजाने साम्रा-ज्याच्या वाढीसाठी व स्थिरीकरणासाठी करावयाच्या धार्मिक कृत्यांची तपशीलवार वर्णने ह्या ग्रंथात आढळतात; अन्य माहितीकोशात एवढचा प्रमाणात आढळत नाहीत. हा प्रस्तुत ग्रंथाचा महत्त्वाचा विशेष आहे. त्या विशेषाचे मूळ प्रस्तुत ग्रंथाच्या **तांत्रिक** स्वरूपामध्ये आहे. प्रस्तुत ग्रंथामध्ये **तांत्रिक** माहिती अन्य **तांत्रिक** ग्रंथाच्या तुलनेने कमी असली तरी ग्रंथाचे **एकूण मूळरूप तांत्रिक** आहे व **माहिती-कोश हे दुय्यम स्वरूप** आहे. राजाने वर्षभर करावयाचे सण, व्रते इत्यादींची माहिती, तसेच तीर्थयात्रेचे तपशील अन्य माहितीकोशात आढळत नाहीत, ते प्रस्तुत ग्रंथात आढळतात हा दुसरा विशेष. बाकी धनुर्विद्या, गजविद्या, अश्वविद्या, ह्यांसारखे विषय अन्य माहितीकोशांमध्येही आलेले असल्याने प्रस्तुत ग्रंथाचे महत्त्व त्या विषयाच्या दृष्टीने फारसे नाही. मात्र संस्कृतमधील इतर माहितीकोशा-प्रमाणेच हाही एक **राजोपयोगी** माहितीकोश आहे आणि त्यात अनेक यातुधर्मात्मक दृष्टीने महत्त्वाचे विषय आढळतात. प्रत्येक विषयाकडे पाहण्याची दृष्टीच (अन्य ग्रंथांप्रमाणेच) यातुधर्मात्मक असल्याने प्रस्तुत ग्रंथाचेही महत्त्व (अन्य ग्रंथांप्रमाणेच) **शास्त्रेतिहास** किंवा **कलेतिहास** ह्या दृष्टीने फारसे नसून **धर्मेतिहास** ह्या दृष्टीनेच आहे असे वाटते.

महाराष्ट्र प्रकाशक संस्था

प्रभुवंश : एक अध्ययन

उषा रानडे

सुमारे एक वर्षापूर्वी 'प्रभुवंश' काव्याची एक हस्तलिखित पोथी लेखिकेला अभ्यासासाठी मिळाली. ही पोथी वाईचे श्री. अ. म. देव यांच्याकडे होती. या संस्कृत काव्यात श्रीमंत सवाई माधवराव पेशव्याच्या जन्मापासून तो त्याच्या विवाहापर्यंतचे वर्णन अतिशय रसाळपणे केलेले आहे. सदर काव्य इ. स. १८८० च्या सप्टेंबर महिन्याच्या 'काव्येतिहाससंग्रहा' त प्रसिद्ध झालेले आहे ही माहिती म. म. द. वा. पोतदार यांनी लेखिकेला दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानावयास हवेत. हे काव्य प्रसिद्ध झाले असूनही श्री. देव यांच्याकडील हस्तलिखितातील काही नवी माहिती आणि पूर्वी प्रसिद्ध झालेल्या काव्यात असलेली पण संशोधकांच्या नजरेस फारशी न आलेली काही माहिती अभ्यासकांसमोर ठेवण्यासाठी हे टिपण लिहिले आहे.

या काव्याच्या रचनेचा व लेखनाचा काल यासंबंधी प्रस्तुत हस्तलिखितात स्पष्ट निर्देश आहे. तो म्हणजे शक १७१६. किंवा इ. स. १७९४. कवी गोविंद किंवा टीकाकार अनंत हे दोघेही सवाई माधवरावाचे समकालीन होते असे यावरून दिसते. कदाचित दोघांचाही पुण्याच्या दरबाराशी निकटचा संबंध असावा. मात्र आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रांत गोविंद नावाचा कोणी कवी पेशव्यांच्या दरबारी असल्याचा उल्लेख नाही.

काव्येतिहाससंग्रहात ही पोथी १८८० त प्रसिद्ध झाली. परंतु प्रसिद्ध करताना ती कोठे व कोणाकडून उपलब्ध झाली यासंबंधी काहीही माहिती दिलेली नाही. कदाचित यामुळेच तिच्या विश्वसनीयतेबद्दल शंका येऊन सवाई माधवरावाच्या पुढच्या कोणत्याच चरित्रकारांनी तिची दखलही घेतलेली नाही. समकालीन शाहीरांच्या पोवाडे-लावण्यांतील अनेक वर्णनांचा, (विशेषत: रंगाच्या सोहळ्याच्या वर्णनाचा) मुक्तहस्ते उपयोग करणाऱ्या लेखकांनी या काव्याकडे का दुर्लक्ष केले असावे हे समजत नाही.

मुंज, विवाहसमारंभ यांची अत्यंत सविस्तर वर्णने यात आहेत. मराठी, सामाजिक चालीरीतींच्या अभ्यासकांना ती खचितच उपयुक्त ठरतील. सवाई माधवरावाच्या राजकीय जीवनाविषयी फारच थोडी माहिती या काव्यात आली आहे. पण जी आहे त्यात अशा एका गोष्टीचा उल्लेख आहे की, जो अन्यत्र नाही.

सवाई माधवरावाचे पालकत्त्व करण्याची जबाबदारी नाना फडणीसावर पडलेली होती. राजकारणातही तो नानाच्याच सहाय्याने चालत असे. तरीही मूळात त्याचा स्वभाव बालिश व काहीसा हूड असा होता. त्यातच नानाविरुद्ध सतत कारस्थाने चाललेली असत. याला कंटाळून केव्हातरी नानाने सर्वसंगपरित्याग करून काशी-यात्रेला जाण्याचे ठरविले. यावेळी माधवराव आणि नाना यांच्यात झालेला एक संवाद प्रस्तुत काव्यात दिलेला आहे. या संवादातून सवाई माधवराव व नाना यांचे स्वभाव, दृष्टिकोन आणि परस्परसंबंध यांवर फार मनोरंजक प्रकाश पडतो.

पहिली गोष्ट म्हणजे माधवरावानी नानांना विचारले की आपण काशीला गेल्यावर शत्रूंशी संधिविग्रह करू शकेल, विद्वानांचा आदरसत्कार करील असा कोणता मंत्री आपण माझ्याजवळ ठेवणार आहात. यावर तुझ्या वडिलांच्या वेळेपासून सर्वांत श्रेष्ठ, बुद्धिमान अस्त्रज्ञ व यशस्वी योद्धा असलेला हरिपंत (फडके) याची नियुक्ती केली आहे असे नानांनी सांगितले, यावरून नानांचा हरिपंत फडक्यांवर पूर्ण विश्वास होता असे दिसते. परंतु नानांसारखा राजकारण धुरंधर हातचा जाऊ नये म्हणून माधवरावाने त्यांना काशीला न जाण्याची विनंती केली व नाना आणि हरिपंत यांना जोडीने राजशकट चालवण्यास सांगितला. जसे आकाशात झेप घेण्यास गरुडाला दोन्ही पंख लागतात किंवा रथाला दोन्ही चाके लागतात, तसे तुम्ही दोघे कारभार करा असे माधवरावाने सुचवले. यावरून माधवरावाची गुणग्राहकता दिसते. कदाचित माधवरावाचे आपल्याविषयी काय मत आहे हे जाणून घेण्याकरिता किंवा राज्यकारभारात त्याने स्वतः लक्ष घालावे, परावलंबी राहू नये म्हणून नानांनी काशीयात्रेचे निमित्त काढले असेल. कारण पुढे माधवरावाच्या विनंतीनुसार नानांनी काशीयात्रेचा बेत रद्द केला. मात्र या प्रसंगाचे निमित्त साधून त्यांनी माधवरावाला उपदेश केला आहे की जशी ब्राह्मणभोजनाशिवाय व्रताची सांगता होत नाही किंवा पूर्णाहुतीशिवाय यज्ञ पूर्ण होत नाही. तसेच तू राजकारणात लक्ष घातल्याशिवाय ते मार्गी लागणार नाही. या संवादातूनच दक्षिणदिग्जेता हरिपंत ह्याचा माधव-रावाचा उजवा हात म्हणून व उत्तरदिग्जेता महादजी शिंदे याचा माधवरावाचा डावा हात म्हणून उल्लेख आढळतो.

'प्रभुवंश' काव्यात स. माधवरावाचा जन्म, मुंज, विवाह या तीन प्रसंगांचा उल्लेख आहे. पैकी जन्माचा शक व इतर माहिती ही ऐतिहासिक पुराव्यावरून बरोबर ठरते. परंतु मुंजीचा शक काव्यात दिलेला नाही. फक्त पर्वती परिसरात मुंज झाल्याचा उल्लेख आहे. पेशवे बखरीत शक १७०४ मध्ये मुंज झाल्याचा उल्लेख आहे. मराठी रियासतीत वैशाख शु. ५ हा मुंजीचा दिवस दिला आहे. 'प्रभुवंश' काव्यात विवाहाच्या प्रसंगाचे वर्णन आले असले तरी विवाहाचा शक दिलेला

नाही. पेशवे बखरीत माघ शु. ९ शक १७०४ दिला आहे. प्रभुवंशांत स. माधवरावाची पत्नी ही थत्ते यांची मुलगी असा उल्लेख आहे. यावरून स. माधरावाच्या पहिल्या विवाहाचे हे वर्णन आहे ही गोष्ट उघड आहे. परंतु वधूचे पूर्वाश्रमीचे नाव दिलेले नाही. तसेच तिच्या वडिलांचे नाव दिलेले नाही. फक्त लक्ष्मीपूजनानंतर 'रमा' असे नाव ठेवले आहे. तसेच मेव्हण्याने (श्वशुर्यक, शालकेन) स. माधवरावाची लग्नापूर्वी पूजा केली असा उल्लेख आहे. या वरून वधूचे वडील तेव्हा हजर नसावेत किंवा हयात नसावेत. पेशवे बखरीतील वर्णनावरून स. माधवरावाची पत्नी 'केशव नाईक थत्ते' यांची मुलगी होती असे दिसते. 'पेशवे कालीन महाराष्ट्रात' बाळाजी बहिरव थत्ते यांची ही मुलगी होती असे म्हटले आहे. हा लग्नसमारंभ कृष्णाजी नाईक थत्ते यांच्या वाडयात झाला असे बखरीत वर्णन आहे. त्यामुळे वधूच्या पित्याच्या नावाचा उलगडा होत नाही. पेशवे दप्तर, बखर यांत माधवरावाच्या मुंजीचे, लग्नाचे मिरवणुकीचे वर्णन आहे तसेच त्या प्रसंगी हजर असणारे छत्रपती, निजामाचा मुलगा, अनेक सरदार याचे वर्णन आहे. नानांनी या लग्नाची व्यवस्था किती चोख ठेवली याचेही वर्णन आहे. परंतु विवाहविधींचे वर्णन आढळत नाही. 'प्रभुवंश' काव्यात नानांचा कारभारी म्हणून उल्लेख येणे अपरिहार्यच आहे. पण मराठी रियासतीत सांगितल्याप्रमाणे लहानपणी स. माधवरावाच्या नेहमी भोवती असणारे पुरुषोत्तम दाजी पटवर्धन त्यांचे सहकारी यांचा उल्लेख नाही. पण हरिपंत फडके व महादजी शिंदे (औदीच्य राजजेता) यांचे उल्लेख आहेत.

'प्रभुवंश' काव्याखेरीज स. माधवरावाच्या जीवनावर इतर अनेक काव्ये रचली गेली. तसेच त्याच्या कारकीर्दीचे पेशवे दप्तर, मराठी रियासत, बखर, पोवाडे अशा अनेक पुराव्यांवरून धागेदोरे सापडतात. पण प्रस्तुत 'प्रभुवंश' काव्याचा कशातही उल्लेख नाही. मागे उल्लेखिल्याप्रमाणे गोविंद राजाच्या 'राजवंश' काव्याचा (Catalogus catalogorum) मध्ये उल्लेख आहे. तसेच गणपत हरिहर पटवर्धन ह्यांचे मराठीत एक सर्गाचे 'भट्टवंशकाव्य' आहे. पण ते बाजीराव ते चिमाजी अप्पाचा मृत्यू यथपर्यंतच्या काळाचे असल्याने प्रस्तुत काव्याचा व त्याचा संबंध येत नाही. या व्यतिरिक्त स. माधवरावाची कारकीर्द सांगणारे शाहिरी वाङ्मय आहे. शाहीर खंडू संतू याचा सवाई माधवरावाच्या जन्माचा पोवाडा प्रसिद्ध आहे (ऐतिहासिक पोवाडे, य. न. केळकर १९२८) यांत माधवराव परशुरामाचा अवतार आहे असे म्हटले असून त्याचा जन्म, मुंज, विवाह याचे वर्णन आहे. स. माधवराव रंग खेळत वानवडीपर्यंत गेले त्याचे वर्णन 'रंगाचे पोवाडे' म्हणून प्रसिद्ध असलेल्या पोवाडयांतून आढळते. होनाजी बाळ, प्रभाकर शाहीर, महादेव गुणराज छंदी यांचे रंगाचे पोवाडे प्रसिद्ध आहेत. तसेच प्रभाकर शाहीराने स. माधवरावाच्या मृत्यूच्या प्रसंगी पोवाडा केलेला आहे.

तेव्हा सवाई माधवरावाच्या जीवनातील एका कालखंडावर आधारलेले हे काव्य १८८० मध्ये प्रसिद्ध होऊनही त्याचा इतिहास–साधन म्हणून उपयोग का केला नाही ? सवाई माधवरावाच्या जीवनावरील वर निर्देश केलेल्या लेखनात या काव्याचा उल्लेखही येऊ नये ही आश्चर्याची गोष्ट आहे. निदान सवाई माधवरावासंबंधीच्या ऐतिहासिक माहितीला आधार म्हणून तरी राजकीय व सांस्कृतिक बाबतीत यातील तपशील उपयुक्त ठरावा.

संपादकीय खुलासा

त्रैमासिकाच्या अंक ५४ भाग १ व २ मध्ये डॉ. बा. ना. मुंडी यांचा "श्रीमंत रघुनाथराव पेशवे यांची वनयात्रा" या नावाचा निबंध प्रसिद्ध झालेला आहे. त्यात उद्धृत केलेली कागदपत्रे यापूर्वीच प्रसिद्ध झालेली आहेत असे मंडळाचे सदस्य श्री. प. के. जोशी यांनी निदर्शनास आणून दिले. डॉ. मुंडी यांनीही पत्र पाठवून हा निबंध संमेलनात वाचला त्याचवेळी सर्व खुलासा झालेला असल्याने निबंध प्रसिद्ध झालेला पाहून आश्चर्य व खेद व्यक्त केला. वार्षिक संमेलन व वाढदिवस याप्रसंगी वाचल्या जाणाऱ्या निबंधांना त्रैमासिकात प्रसिद्धी देण्याची प्रथा आहे. त्यानुसार या पूर्वीच्या संमेलनातील काही निबंध निवडण्यात आले. त्यात डॉ. मुंडी यांचा निबंध होता. त्यावेळच्या चिटणिसांनी निबंधावर कसलेच टिपण केलेलें नसल्याने या चर्चेची कल्पना कार्यकारी संपादकांना येऊ शकली नाही. डॉ. मुंडी याजकडे आम्ही दिलगिरी व्यक्त करतो व श्री. प. के. जोशी यांचे आभार मानतो.

कार्यकारी संपादक
१।४।७६

भा. इ. सं. मंडळ, बासष्टावे वार्षिक संमेलन

वृत्तान्त

दि. ३१ मे, १ व २ जून १९७५

रा. पां. गोस्वामी

निबंधवाचनास पुणे विद्यापीठाच्या संस्कृत-प्रगत-अध्ययन-केन्द्रातील संशोधक डॉ. ग. उ. थिटे यांच्या निबंधाने सुरुवात झाली. 'आकाशभैरवकल्प : एक अध्ययन' असा त्यांच्या निबंधाचा विषय होता. आकाशभैरवकल्प हा एक ज्ञानकोश वजा तांत्रिक स्वरूपाचा ग्रंथ असून यात धार्मिक व राज्यास पोषक असे अनेक विधी सांगितलेले आहेत. गायन, नर्तन, कामोपभोग इ. कित्येक राजोपभोग हे राजाने यात्वात्मक परिणाम साधण्यासाठी म्हणजेच पर्यायाने राज्यलक्ष्मीच्या अभिवृद्धीसाठी करणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे. तसेच इतरही अनेक मंत्रतन्त्रान्तर्गत गोष्टी आहेत. यातील काही भाग तंजावर येथून साम्राज्यलक्ष्मीपीठिका या नावाने प्रसिद्ध झाला असून इतर भागातील मंत्रतंत्रविषयक लहान लहान प्रकरणांची हस्तलिखिते अनेक ठिकाणी उपलब्ध होतात.

मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. ग. ह. खरे यांनी वाई येथील गोशाळा रास्ते या घराण्याचे संग्रही असलेल्या कागदपत्रांपैकी सुमारे एक हजार कागदपत्रे तपासून त्यांपैकी ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने उपयुक्त असे एकेचाळीस कागद निवडून आणले व त्यातून मिळणारी काही निवडक माहिती सांगितली. भिकाजी नाईक रास्ते यांची मुलगी बाळाजी बाजीरावास दिली होती. रास्ते सावकार असले तरी त्यांची मुले स्वाऱ्यांवर गेलेली दिसतात. सदरहू कागदांपैकी बरेचसे कागद मल्हार भिकाजी यांनी लिहिलेले आहेत. यातील बहुतांश कागद पानिपतच्या युद्धाच्या आसपासचे असून त्यात श्रीमंत (नानासाहेब पेशवे ?) रघुनाथराव दादा इत्यादींचे स्वारीबरोबर असतानाची बातमीपत्रे आहेत. पेशवे राक्षसभुवनवर असताना त्यांच्या फौजेची तपशीलवार संख्या दिलेली आहे. निजाम-पेशवे तहाच्या वाटाघाटी, बुसी येत असल्याची वार्ता, निजामास पानिपतसाठी मदतीचे आवाहन, याच दरम्यान रघुनाथरावाचे एक लग्न झाल्याचे वर्तमान, सावनूरकडील मोहीम, कोल्हापूरकरांचे पारपत्यासाठी फौज पाठविली इत्यादि वार्ता आहेत. पानिपतच्या पराभवाची वार्ता

बालापूर नजीक घाट येथून लिहिलेली असून नजीबखानास गोळी लागली असाही यात उल्लेख आहे.

डेक्कन कॉलेजमधील वस्तुसंग्रहाचे क्युरेटर श्री. मा. रा. कंटक यांनी 'संभाजीकालीन दक्षिणच्या राजकारणातील मुत्सद्देगिरीवर नवा प्रकाश हा निबंध' वाचला. हा निबंध डेक्कन कॉलेजमध्ये उपलब्ध झालेल्या एका पर्शियन कागदावर आधारलेला होता. यात संभाजीकालीन तीन महत्त्वाच्या बातम्या असून मोगला कडील लेखकाने त्या लिहिल्या असाव्यात. अन्तर्गत पुराव्यावरून हा मे-जून १६८३ चे दरम्यानचा कागद असावा. विजापूरकरांकडील सिद्दी मसौद व शर्जाखान या-दोन मातब्बरांस हरप्रयत्नाने मोगलांच्या चाकरीत आणवून विजापूरकरांचा कणा मोडावा या उद्देशाने गुप्त बोलणी करण्यासाठी मोगलांकडून आलेल्या मुस्तफा काशी याचे व विजापूरकरांकडील मियांजी यांचे जे गुप्त व राजकारणी बोलणे झाले त्याचा तपशील पहिल्या बातमीत आहे. यात त्यांच्यातील प्रत्यक्ष संवाद दिला आहे. मियांजी या व्यक्तीची माहिती प्रथमच येथे मिळत आहे. दुसऱ्या बातमीत संभाजीने विजापूरकरांशी बोलणी करण्याचे निमित्ताने काही लोकांना पाठवून किल्ला ताब्यात घेण्याचा डाव केला व तो विजापुरकरांच्या दक्षतेमुळे उधळून लावला गेला याची माहिती आली आहे. संभाजी गोव्यात डिचोलीस असताना औरंगजेबाचा मुलगा अकबर हाही दक्षिणेत होता. खुदावंदपूर येथे आपली व संभाजीची भेट व्हावी या उद्देशाने त्याने संभाजीस पत्र लिहिल्याची हकीगत तिसऱ्या बातमीत आहे. यामुळे अकबराच्या हालचाली व संभाजीशी झालेला त्याचा पत्रव्यवहार या संबंधी बरीच नवीन माहिती उजेडात येत आहे.

सायंकाळच्या निबंधवाचनास श्रीमती शालिनी कुलकर्णी यांच्या '१८ व्या व १९ व्या शतकातील मराठी राज्यातील काही दुष्काळ' या निबंधाच्या वाचनाने सुरुवात झाली. यात त्यांनी इ. १८८७, १७९३, १८०२–४, १८०५, १८२५–२६, १८३२, १८५३–५४, १८७६–७७ व १९०० या सालांतील दुष्काळांची माहिती सांगितली. दुष्काळाच्या कारणांची चिकित्सा करून, निसर्गनिर्मित व मानवनिर्मित दुष्काळ सांगून त्यावरील उपाययोजनांचीही माहिती त्यांनी दिली. इ. १७९३त बंगालमधून धान्य आणल्याचा त्यांनी उल्लेख केला. त्याबरोबरच धार्मिक उपाय, तसेच धरणे बांधण्यासारखे प्रत्यक्ष उपाय हेही केल्याचे संदर्भ त्यांनी सांगितले. त्याचबरोबर दुष्काळ व सुकाळातील काही भागांची त्यांनी तुलना केली. दुष्काळात सरकारची भूमिका जनतेला अनुकूल असे व जनताही स्वावलंबाने उपाययोजना करी असे त्यांनी सांगितले.

पुण्यातील भाऊमहाराजांचे बोळात रहाणारे श्री. गो. वि. करंदीकर यांनी त्यांचे वाड्यात जुन्या लाकडी पेटीत सापडलेली एक जुनी कटचार व एक जुने

पिस्तुल सभेपुढे दाखविले. कट्यारीवर अरबी भाषेतील काही धार्मिक मजकूर (बहुधा कुराणातील) कोरलेला आहे.

प्रा. रा. वि. ओतुरकर यांनी 'शिवकालीन सामाजिक' प्रेरणा या विषयावर निबंध वाचला. या सामाजिक प्रेरणा शिवाजीचे कार्यास कितपत अनुकूल वा प्रतिकूल होत्या याचा परामर्श घेणे हा त्यांचा हेतू होता. यात लोक राज्याविषयी कसे उदासीन असत, जातीच्या हक्कांबद्दल अधिक दक्षता घेत, वतने व मिराशी यांविषयी लोक अधिक दक्ष असत, स्थानिक लोकांत द्रव्यसंचयाची प्रवृत्ती नसे, नावलौकिकासाठी लोक प्रयत्नशील असत पण तो वर्णावर अवलंबून असे, पिढयान् पिढया घराण्यांचे वैर असे, धर्माकरता कोणी लढल्याचे वा प्राण दिल्याचे उदाहरण नाही, संतांची इहलोकाकडे दृष्टी नसे, संतांमध्ये समर्थांची फक्त शिकवणूक वेगळी दिसते, वाङ्मयात पारमार्थिक वाङ्मयच होते. लोकात मराठेपणाची भावना होती पण ती भाषिक नसून जातीय होती इत्यादी गोष्टी सांगून ही सर्व भूमिका शिवाजीस अनुकूल नव्हती. तसेच शिवाजीस कोणा अन्य व्यक्तीचीही प्रेरणा नसून शिवाजी स्वयंसमर्थ (self-made) होता. स्वतःची भूमिका स्वतः पाहणारा होता असे त्यांनी सांगितले.

सुप्रसिद्ध संशोधक श्री. देवीसिंह चौहान यांनी 'वाकाटक हे इराणी होते' हा निबंध वाचला. वाकाटक वंशातील, वराहदेव, मिहिरक, रोह-आर्य, मद्य-आर्य, नमिदास, चमिदास या व्यक्तिनामांचे भाषिक व ऐतिहासिक दृष्टया इराणी परंपराशी कसे साम्य आहे हे त्यांनी ऐतिहासिक भाषाशास्त्राचे आधारावर सांगितले. तसेच या वंशातील स्त्रीनामांमध्ये इराणीपद्धतीप्रमाणे व भारतीय परंपरेच्या विरुद्ध स्त्रीलिंगीरूपाचा लोप झालेला दिसून येतो. बुद्ध शाक्यमुनी असल्याने त्याच्या उपासनेत शक–Scythians अग्रेसर असत. वाकाटकांचे शिलालेखात पैशाची भाषेचे प्रभुत्व दिसून येते. त्यांचे जुन्या लेखातील वृष्णिवर्धन हे त्यांचे वृष्णिगोत्र (कुल) दाखविते. विष्णुवर्धन हा उत्तरकालीन विकृत पाठ होय. तसेच त्यांचे 'द्विज' हे उपपद ते क्षत्रकुलातील म्हणून 'त्रैवाणकातील' या अर्थी घ्यावयास हवे. शिरपूर येथील तीन शिलालेखांत आढळणाऱ्या 'वल्खात' या शब्दावरून त्यांचा इराणशी संबंध समजतो, ते वल्लूरवंशाचे होते. यातील मूळ शब्द वृक असून ते वृक जातीतील (tribe) होते हे दर्शवितो. वल्ख = वृक > वकाट > वाकाटक अशी या वंशनामाची उपपत्ती लागते.

पुणे विद्यापीठाच्या पुरातत्त्व विभागातील डॉ. सौ. शोभना गोखले यांनी 'रांजणगाव येथील क्षत्रपांची नाणी' या विषयावर सदीप व्याख्यान दिले. ही नाणी जुलै १९७४ मध्ये पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यातील रांजणगाव येथे

सापडली. रांजणगाव हे जुन्नर–प्रतिष्ठान मार्गावर असल्याने व्यापारी केन्द्र अथवा नाके असावे. यात चार नाणी पुळुमाविची असून ती पश्चिम महाराष्ट्रात प्रथमच सापडत आहेत. याशिवाय काही क्षत्रपांची नाणी काही नवीन कालनिर्देशासह प्रथमच सापडत आहेत. एकूण चौदा राजांची नाणी असून द्वितीय रुद्रसेन, भर्तृदामन व विश्वसेन यांची नाणी बहुसंख्येने आहेत. एकूण नाणी १५१८ आहेत. यातील निवडक नाण्यांची छायाचित्रे प्रत्यक्ष पडद्यावर दाखविण्यात आली.

डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागातील डॉ. म. के. ढवळीकर यांनी 'इनामगाव उत्खनन' या विषयावर सदीप व्याख्यान दिले. गेली सहा वर्षे चालू असलेल्या या उत्खननात दरवर्षी नवीन माहिती उजेडात येत आहे. येथे इ. पू. १६०० ते इ. पू. ९०० या काळातील माळव्यातून महाराष्ट्रात आलेल्या लोकांची संस्कृती नांदत होती. या वर्षी या उत्खननातील सर्वांत मोठे घर सापडले. हे इ. पू. १२०० ते ११०० चे काळातील होय. यात पाच खोल्या असून त्यांची रचना अवशेष स्थितीतील व काल्पनिक उभारणीच्या चित्राद्वारा स्पष्ट करण्यात आली. या घरांच्या अंगणात कच्च्या मातीच्या रांजणात भांडी व इतर अवशेषांचे द्वारा केलेले सांकेतिक दफन (अनैसर्गिक मृत्यूचे निदर्शक) सापडले. याच घराचे ७–८ फूट वरील भागात मानवी शरीराकृतीच्या कच्च्या रांजणात केलेले ३५ वर्षांचा माणूस व ३ वर्षांची मुलगी यांचे प्रत्यक्ष दफन सापडले. बाजूच्या वस्तूत तांब्याचे मणी ओवणीच्या दोऱ्यासह सापडले. घराला लागून धान्याचे कोठार असून त्यात दोन मोठी अग्निकुंडेही होती. येथे राहणारा हा धर्मगुरू व वसतीचा प्रमुख असावा. गावाशेजारील प्राचीन बंधाऱ्याचे या वर्षी उत्खनन करण्यात आले. त्याचा उद्देश पुराचे पाणी वळवून मोठा तलाव करून त्यावर गव्हाची शेती करणे हा असावा. हा तलाव ३५०' × ३०' लांबरुंद असावा. या वर्षी तांदुळाचे काही जळके कणही सापडले.

रविवार दि. १।६।१९७५ रोजी सकाळच्या सत्रात श्री. रा. पां. गोस्वामी यांनी 'शंभुदत्तकृत नाथचंद्रोदय' या विषयावर निबंध वाचला. इ. स. १८०३ ते १८४३ या काळात जोधपूरवर राज्य करणाऱ्या मानसिंहाचा आश्रित शंभुदत्त जोशी याने इ. स. १८०९ मध्ये भर्तृहरि, विक्रम, मैनावती इत्यादींच्या नाथपंथीय कथांवर आधारित सुमारे २७०० श्लोकांचे नाथचंद्रोदय हे संस्कृत काव्य लिहिले आहे. याचे हस्तलिखित पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात आहे. मानसिंहावरील नाथसंप्रदायाचा प्रभाव ही या काव्यामागील प्रेरणा आहे. मानसिंहाचा गुरू व कारभारी देवनाथ याचा आदरपूर्वक उल्लेख यात आहे. यामध्ये नाथसंप्रदायाचे काही प्रमाणात बहिरंगदर्शन घडते.

सुविख्यात संशोधक श्री. अ. ज. करंदीकर यांनी 'नरदेवाचा परिचय' हा निबंध वाचला. महाभारतासंबंधीच्या नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्। देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ॥ या श्लोकातील नर, नारायण व सरस्वती ही तीनही नामे देशवाचक, लोकवाचक व देवतावाचक असून असीरिया, बाबिलोन व सुमेर संस्कृतीशीं यांचा संबंध आहे. जय ही त्यांची वीरकाव्ये होत. यात नर याची अनर, इनर, अरुण, नेरथस, निर्ऋति, नेरगळ इत्यादी देशकालपरत्वे भिन्न रूपे आढळतात. अर्जुन (एरेजून, नेरजुन) व नकुल (सुमेरी निकल, नेरगल) या नावांतही नर शब्दाचे रूप सापडते. नरदेवाच्या मूळ आख्यायिका पुढे अर्जुनास जोडण्यात आल्या. उलूपी ही सुमेरची असून शची ही पौलोमी (पेहेलवी = पालायमान) म्हणजेच इराणकडील असावी. नर-निर्ऋति या मृत्यूदेवतांचा मंगळ-शनी यांचेशी संबंध जोडण्यात आला. मेरू (नर > नेरू) पर्वतास पुरुष ही संज्ञा त्याचे नर रूपाशी साम्य दाखविते.

इंदूर येथील डॉ. अ. प. भांडारकर यांनी 'दिवाण बाळाराव गोविंद ज्ञाती-निर्णय' हा निबंध वाचला. हा महादजी शिंद्याचा काही काळ दिवाण होता. त्यास गो. स. सरदेसाई यांनी सारस्वत ब्राह्मण ठरविले आहे. पण एका चित्रात दिसणारा त्याचा कृष्णवर्ण व देशस्थ आबा चिटणीसाच्या जातीतील बाळाजी जनार्दन जामगावकर यांचेशी असलेले त्याचे नाते यावरून तो देशस्थ होता असे सिद्ध होते.

पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयातील श्री. शां. ग. महाजन यांनी 'वंग-भंगाचा पश्चिम महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांवर परिणाम' या विषयावर निबंध वाचला. त्यांनी जमविलेल्या तत्कालीन माहितीवरून प्रादेशिक भाषेतील नियतकालिकांतून राष्ट्रीय वाङ्मय येत असल्यामुळे अशी नियतकालिके सार्वजनिक वाचनालयात घेण्यावर सरकारने निर्बंध घातले, वाचनालयांच्या इमारतीत राजकीय सभा घेऊ नयेत, कोणत्याही सभेसाठी पूर्वसंमती घ्यावी, सरकारी नोकरांनी वाचनालयात जाऊ नये असे निर्बंध घातले इत्यादि गोष्टी सांगितल्या. चालकांनाही विविधप्रकारे त्रास देण्यात आला. यामुळे वर्गणीदारांच्या संख्येवर विपरीत परिणाम झाला व नवीन वाचनालयेही कमी उघडली गेली. संस्थानातील ग्रंथालयांवरही काही प्रमाणात निर्बंध घातले गेले असे दिसते.

श्री. अशोककुमार अरोरा हे मराठी इतिहासात पदव्युत्तर संशोधन करीत आहेत. त्यांनी 'अजमेर ड्युरिंग मराठा रुल' हा त्यांचा इंग्रजी निबंध वाचला. त्यात त्यांनी शिंदे यांना अजमेर घेतल्यापासून त्यांना ते सोडावे लागेपर्यंतच्या त्यांच्या राज्यकारभाराचा आढावा घेतला. मराठ्यांनी घाट, देवळे बांधली; बाजारपेठ वसविली. या काळात अजमेरच्या जनतेला स्थैर्याचा लाभ झाला. तेथील

व्यापार वृद्धिगत झाला. गणपतीपूजा प्रचलित झाली. मराठ्यांनी ' अढाई दिन का झोपडा ' यासारख्या इस्लामी धर्मस्थानाचीदेखील डागडुजी करून संरक्षण दिले. राजपुतान्याच्या इतर भागात मराठ्यांविरुद्ध चळवळ होऊन त्यांना बाहेर हाकलण्याचे प्रयत्न चालू असता अजमेरचे लोक मराठ्यांच्या आधिपत्याखाली शांतता व समृद्धी अनुभवत होते. मेड जातीच्या लुटारू लोकांचा उपद्रव शमविण्यात मराठे कसे अपयशी ठरले हेही त्यांनी सांगितले.

यानंतर पुण्यातील श्री. बाबासाहेब ठकार व त्यांचे बंधू यांनी त्यांचे वडील कै. रघुनाथ गणेश ठकार यांचे स्मरणार्थ त्यांचा सुमारे ४५० ग्रंथांचा संग्रह; ज्ञानेश्वरीची एक प्रत प्रतीकात्मकरीत्या मंडळाचे उपाध्यक्ष म. म. द. वा. पोतदार यांचे हाती देऊन मंडळास दान केला. मंडळातर्फे कार्याध्यक्ष प्रा. ग. ह. खरे यांनी संग्रहाचा मंडळातर्फे स्वीकार केला. या प्रसंगी ठकार परिवारातील मंडळीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. श्री. बाबासाहेब ठकारांनी वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ छोटे भाषण केले.

इतिहासात पदव्युत्तर संशोधन करणारे श्री. जॉर्ज हॅरी यांनी ' हैदराबादचे नाव भाग्यनगर ' होते अशा अर्थाच्या शीर्षकाचा इंग्रजी निबंध प्रस्तुत केला. फेरिस्ता आणि कुतुबेमास्करी यातून उल्लेखिल्याप्रमाणे हैदराबादचा संस्थापक पाचवा कुतुबशहा याने भाग्यमती या आपल्या स्त्रीचे नाव राजधानीस दिले असे सांगून त्यांनी ' हैदराबाद हे भाग्यनगर म्हणून कधीही ओळखले जात नव्हते ' या प्रा. शेरवानी यांच्या मताचे खंडन केले.

पश्चिम विभागीय भाषा शिक्षणकेंद्रातील प्रा. कल्याण काळे यांनी ' हंसराज स्वामींचे दोन अप्रकाशित ग्रंथ ' हा निबंध वाचला. गेल्या शतकात परांडा येथे वास्तव्य करणारे, समर्थ सांप्रदायिक व शांकराद्वैताचे पुरस्कर्ते हंसराज स्वामी यांच्या १४ ज्ञात ग्रंथांपैकी १० प्रकाशित असून दोन अनुपलब्ध आहेत. उरलेल्या पूर्वारंभगाथा व तत्त्वझाडा या दोन अजून अप्रकाशित ग्रंथांचा त्यांनी परिचय करून दिला. पहिला ग्रंथ हा समर्थकृत पूर्वारंभ या प्रकरणावरील गद्य टीका असून त्याचे हस्तलिखित धुळे येथील समर्थ वाग्देवतामंदिरात उपलब्ध आहे. मूळ ग्रंथातील विषयाची टीकेत स्वतंत्र मांडणी असून त्यात उपदेशाचा अधिकारी, आत्मस्वरूप, गुरुकृपा, साधकभेद, आरंभ, परिणाम व विवर्तवाद, अन्वयव्यतिरेक व्याप्ती इत्यादी विषय आले आहेत. तत्त्वझाडा या दुसऱ्या ग्रंथाच्या हस्तलिखितांच्या दोन प्रती हंस मंडळात असून अद्वैतवेदान्तातील वर अनुल्लिखित असे देह, कर्मत्रय, वेदान्तातील काही परिभाषा, तत्वमसि वाक्यविवेचन, पूर्वाभ्यास व उत्तराभ्यास इत्यादी विषय यात आले आहेत. भाषा संवादात्मक आहे.

आंबेजोगाई येथील प्रा. श्री. वि. चितळे यांनी वझूर-राजूर येथील एका यादवकालीन स्तंभलेखाची माहिती दिली. एका मंदिरात असलेल्या या स्तंभलेखामध्ये 'माधाव व त्याचा मुलगा या दोघांनी मिळून हा स्तंभ घडविला; त्याचा खर्च दहा गद्याण झाला' या अर्थाचा मराठी भाषेत मजकूर आहे. हे पितापुत्र सुतार होते. लेखाखाली काही पुरुषाकृती कोरलेल्या असून त्याचा लेखाशी काही संबंध असावा काय असा संशय त्यांनी व्यक्त केला.

डेक्कन कॉलेज या संस्थेत पदव्युत्तर संशोधन करणाऱ्या श्रीमती उषा रानडे यांनी वाई येथील श्री. अ. म. देव यांचेकडे उपलब्ध झालेल्या गोविंद पंडितकृत प्रभुवंशकाव्य या अनंत पंडितकृत टीकेसहित संस्कृत हस्तलिखित ग्रंथाचा परिचय करून दिला. ११४ श्लोकांच्या या मूळ ग्रंथात सवाई माधवरावांच्या जन्मापासून विवाहापर्यंतची हकीगत आली आहे. विवाहवर्णन विशेष असून नाना व महादजी यांचा वादही आहे. टीकेचा काल शके १७१६ आहे.

डेक्कन कॉलेजमधील पुरातत्त्व विभागात काम करणारे प्रा. श. न. राजगुरू हे गेल्या वर्षी संशोधनार्थ ऑस्ट्रेलियात गेले होते. तेथील संशोधनासंबंधी त्यांनी सदीप व्याख्यान दिले. ऑस्ट्रेलियातील मरे-डार्लिंग दुआबातील मुंगो प्रदेशात एका शुष्क तळ्याचे काठी दाहसंस्कार करून विधिपूर्वक पुरलेल्या एका तरुणीचे अवशेष मिळाले. शिंपले व मासे यांच्या उपलब्ध अवशेषांवरून तत्कालीन हवामान व भौगोलिक परिस्थितीची कल्पना त्यांनी सांगितली. सध्याच्या मनुष्यवस्तीमुळे तेथील निसर्गावर आक्रमण होत आहे हेही त्यांनी सांगितले. ऑस्ट्रेलियात १५ हजार वर्षांपूर्वीचे पाटे सापडल्याचेही त्यांनी सांगितले. तेथील विशिष्ट प्रदेशात क्वचित् बुलडोझरनेही सुरुवातीचे उत्खनन कसे करावे लागते इत्यादी गोष्टी त्यांनी चित्रांचे सहाय्याने दर्शविल्या.

श्री. अ. ज. करंदीकर यांनी 'बाबिलोन आणि भारत' हा या संमेलनातील दुसरा निबंध वाचला. विशेषतः आंगिरसांच्यासंबंधी या दोन देशांच्या संदर्भात त्यांनी संशोधन केल्याचे सांगितले. वरुण देशाचा उल्लेख सापडत असल्याचे सांगून वरुणदेवतेचा प्राचीन आर्यांवर भीतियुक्त पगडा असून त्यास नदी ओलांडताना नरबली दिला जात असे. वसिष्ठांनी वरुणाचा त्याग करून नारायणाचा अंगिकार केला. नारायण हाही पाण्याशी संबंधित पण सौम्य देव होय. पश्चिम आशियातील अनेक भूप्रदेशांची नावे ही वैदिक ऋषि व देवतावाचक शब्दांशी संबंधित आहेत. गौतमकुलीन लोक समुद्र उल्लंघून गोदावरी काठी आले म्हणून तिचे नाव गौतमी असे पडले. गिलगमिश काव्यातील घटनांचे काही पौराणिक कथांशी (मोहिनी अवतार कथेशी) साम्य आहे. वराहाची गोमातेप्रमाणे पवित्रता मानली जात असे. ऋग्वेदातील वरुणाची चार रूपे म्हणजे चार देश असावेत. इत्यादी माहिती त्यांनी सांगितली.

श्री. कृ. रा. जैतली यांनी 'वेद आणि नाग संस्कृती' हा निबंध वाचला. त्यात इंद्रवृत्रकथेसारखी जुनी आख्याने केवळ रूपके नसून ऐतिहासिक पक्षाने त्याचा विचार केला पाहिजे असा विचार त्यांनी प्रामुख्याने मांडला. वृत्र हा अहि असून त्याची आई दनु म्हणजेच ग्रीक दनई होय. ग्रीकांच्या पूर्वजांनी धरणे बांधून नद्यांचे प्रवाह बदलले. इन्द्राने त्यांना ठार मारून नद्या मोकळ्या केल्या. बिलस्वर्ग हा भूमध्य समुद्राजवळील प्रदेश असावा व दानव हे भूमध्योत्तर ग्रीकांचे पूर्वज असावेत. मीडिया व मेसापोटेमिया हे गरुडवंशी देश असून इजिप्ती हे नागवंशी होते. प्राचीन काळी संपूर्ण भूखंडावर नागांचे वर्चस्व असावे असे विचार त्यांनी मांडले.

डॉ. ग. उ. थिटे यांनी 'कौटिलीय अर्थशास्त्रातील प्रिमिटिव्ह' या आपल्या निबंधात प्रिमिटिव्ह म्हणजे शास्त्रपूर्व, मागासलेले व विशेषतः यातुप्रधान विचार असे स्पष्टीकरण करून अथर्ववेदीय उपचारांचा ज्ञाता व मायायोगवित् अशा पुरोहिताची राजास आवश्यकता असून धर्मरक्षण व अधर्मनाशासाठी यातुविधींचा उपयोग करावा असे कौटिलीय अर्थशास्त्रातील विचार सांगितले. या ग्रंथातील अनेक यातुविधींचे उल्लेख करून हे सर्व यातुविधी मूळ ग्रंथात प्रक्षेप असावेत या एम् सी. शेठ यांच्या मताचे त्यांनी अशा विधींचा अथर्ववेदातील राजखंडात उगम असावा असा विचार मांडून खंडन केले.

डॉ. अ. प. भांडारकर यांनी 'सारस्वतांचा कट : कऱ्हाड्यांवर बहिष्कार' हा निबंध वाचला. सारस्वतांच्या कोकणातील आगमनाची व वस्तीची पार्श्वभूमी सांगून कुडाळ प्रांतामध्ये त्यांचे उपाध्येपण करणाऱ्या कऱ्हाडे ब्राह्मणांविरुद्ध सारस्वतांनी त्यांचे उपाध्येपण (वृत्ती) कट करून नाकारली (इ. १७९८–१८००) व क्रियावंत अथवा सारस्वतांकडून कृत्ये करवली. खेमसावंताने कऱ्हाड्यांचे बाजूने हस्तक्षेप केला असता वानवडीस असलेल्या दौलतराव शिंद्याचे मार्फत खेमसावंतावर दडपण आणवले. अखेर खेमसावंताने कऱ्हाड्यांस बाहेर जाऊन उपाध्येपण करावे असा सल्ला दिला व अशा रीतीने सावंतवाडीतील सारस्वतांच्या उपाध्येपणास कऱ्हाडे लोक कायमचे मुकले.

श्री. शां. ग. महाजन यांनी 'मोफत वाचनालये आणि त्यांचा पुणे शहरातील प्रसार' या निबंधात या विषयावरील १९१० ते १९२१ या काळातील परिस्थितीचा आढावा घेतला. या काळात पुण्यात स्थापन झालेल्या आठ मोफत वाचनालयांचा परिचय करून देऊन या चळवळीचा परिणाम म्हणून पुण्यातील किर्लोस्कर थिएटरात १९२१ मध्ये महाराष्ट्र मोफत वाचनालय संमेलन भरविण्यात आल्याचे सांगितले, यात महाराष्ट्रातील २०० वाचनालयांनी आपले रिपोर्ट पाठविले होते. मुख्यतः तरुण मंडळींनी या वाचनालयांची स्थापना केली. त्यात मुख्यतः समाजकार्य,

शिक्षण प्रसार, स्वदेशी, स्वराज्य इत्यादी हेतू होते. जागेचा व फर्निचरचा खर्च देणग्यांनी चालवीत. व्यवस्थेसाठी स्वयंसेवा हे तत्त्व उपयोगात आणले जाई. या चळवळीचे फळ म्हणजे ग्रंथालय संघाची स्थापना होय. तथापि ही वाचनालये नंतर बंद का पडली याचे कारण म्हणजे स्वयंसेवा व आर्थिक सहाय्य कमी पडले हे सांगून ही चळवळ प्रतिक्रियात्मक होती की काय असा संशय त्यांनी व्यक्त केला.

डॉ. प्र. ल. सासवडकर यांनी 'नारायणरावाचे कायस्थांवरील निबंध' या आपल्या निबंधाचा गोषवारा सांगितला. त्यात पूर्वी घातलेले निर्बन्ध कायस्थ पाळीत नाहीत, त्यांचा बंदोबस्त करावा अशा आशयाचे पत्र सवाई माधवरावांकडून खेमसावंतास गेल्याचे सांगितले. पुण्यात कायस्थ व पेणचे ब्राह्मण यांच्यात झालेल्या संघर्षाचा उल्लेख केला. पेशव्यांनी एक परिपत्रक काढून हे निर्बन्ध राज्यात घातले होते. यास नाना फडणीस कारणीभूत असावा. हे निर्बन्ध दुसऱ्या बाजीरावाने काढून टाकीपर्यंत चालू होते.

श्री. फ्रँक पर्लिन यांनी भारतातील शेतकी व्यवस्था आणि समाजसंस्था यांचा आजवर झालेला अभ्यास काहीसा वरवरचा असून, भूधारणा, खंडभागाची व्यवस्था, अशासारख्या तपशीलाचा उत्कृष्ट परिचय करून घेणे जरूर आहे असे प्रतिपादन केले. आतापर्यंत भारताच्या आर्थिक जीवनावर प्रसिद्ध झालेले साहित्य मुलगामी नसून काही गृहितकृत्यांवर आधारलेले, त्यांचाच प्रपंच करणारे आहे असे त्यांनी सांगितले

हा 'लेखन-वर्णन' कार ज्ञानदेव कोण ?

म. श्री कानडे

तंजावरच्या सुप्रसिद्ध सरस्वती महाल ग्रंथालयात 'लेखन-वर्णनम्' या नावाचे एक छोटेसे हस्तलिखित प्रकरण उपलब्ध आहे. प्रकरणाची ओवीसंख्या ५३ असून अखेरीस लेखक व लेखनकाल यांचा स्पष्ट निर्देश आहे. 'ज्ञानदेवेन विरचिले' हा लेखकाचा उल्लेख सहज दृष्टीस पडणारा आहे. त्याचबरोबर भानुवार, फाल्गुन वद्य चतुर्थी, विभव नाम संवत्सर शक १७३० असा कालोल्लेख आहे.

प्रकरणाचे स्वरूप 'पत्र' आणि 'पत्रिका' अशा दोन्ही शब्दात सांगितलेले आहे. प्रकरणामध्ये जो आशय आहे त्यावरून वैचारिक दृष्टीने काही विशेष हाती लागण्यासारखे नाही. शेवटच्या भागात नाथ पंथातील आदिनाथापासून मत्स्येंद्र-नाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ आणि ज्ञाननाथ यांची जी परंपरा निर्दिष्ट केली आहे ती अधिक लक्षणीय आहे.

निवृत्ती ज्ञानदेवांच्या बरोबरच त्यांच्या सोपानदेव आणि मुक्ताई या भावंडांचाही उल्लेख आहे. ज्ञानेश्वरीत आढळणाऱ्या गुरुभक्तीच्या अनुकरणाने प्रस्तुत प्रकरणातही निवृत्तीनाथांच्या कृपाप्रसादाचा निरनिराळ्या प्रकारे आदरपूर्वक निर्देश केल्याचे दिसून येते. नाथपरंपरा, चारी भावंडांचा निर्देश आणि गुरुकृपा यांच्या एकत्रीकरणातून १४ व्या शतकातील वातावरणाचा आभास निर्माण करण्याचा लेखकाचा प्रयत्न असावा.

अखेरच्या कालनिर्देशावरून प्रकरण १८ व्या शतकातील असल्याचे स्पष्ट आहे. भाषाही उत्तरकालीन असल्याचे सहज प्रत्ययास येणारे आहे. प्रकरणात मध्येच एका ठिकाणी, 'प्रतिष्ठानचे येकनाथ-हे पत्र वाचतील' असाही मजकूर आहे, तो पाहिला म्हणजे प्रकरणाची रचना एकनाथकालात झाली होती की काय अशीही शंका येते. मग शेवटच्या कालोल्लेखाचे काय ? का तो लेखनकाल नसून प्रकरणाची नक्कल करून घेतल्याचा काळ आहे ?

गीता-टीका (ज्ञानेश्वरी), अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आणि अभंग ही ज्ञानदेवकृत रचना आता सर्वमान्य आहे. परंतु त्याखेरीज अनेक लहान-मोठी प्रकरणे 'ज्ञानदेव' नामधारक लेखकांनी लिहिलेली उपलब्ध झाली आहेत. ज्ञानदेवांच्या लोकोत्तर विभूतिमत्वाच्या प्रभावामुळे त्यांच्या नावाचे अनुकरण करण्याची

इच्छा उत्तरकालीन सामान्य लेखकांच्या मनातही निर्माण होणे स्वाभाविक आहे. तथापि अभ्यासकांच्या दृष्टीने अशा लेखनाची अंतरंगाच्या व बहिरंगाच्या दृष्टीने पाहणी करून त्याचे स्थान निश्चित करणे अवश्य आहे.

ज्ञानदेवकृत लेखन–वर्णनम्

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥
श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीसदाशिव निवृत्तीदेवाय नमः ॥ श्रीरामकर्ता ॥
नयनाच्या अंजनि । देखणीचि लेखणि ।
माजि देखण्याचि मिरवणी । या निवृति होतें ॥ १ ॥
अैसें हे पत्र । स्वानंदमय स्वतंत्र ।
हे शुद्धश्वेत । अैसें ग माय ॥ २ ॥
या नयनाचें अंजन । माजि देखणि लेखणी करून ।
माजि देखण करि लेखण । नवलावो ग माय ॥ ३ ॥
नवलानवल । या डोळियाचि बोल
अबोलण बोल । उठताती वो माय ॥ ४ ॥
अवो माय अवो माय । या माजि सामाय ।
अगम्यागम्य सोय । निवृतिराज लिहिवी ॥ ५ ॥
नयनाचें अंजन नवल । हे या पत्रि खळिलें ।
अखळुखळा आलें । देखणीया गे माय ॥ ६ ॥
श्वेताती श्वेतलें । देखणीयाचें काळें ।
डोळियाचे खळिलें । अखळु वो माय ॥ ७ ॥
अव्यक्त रे खण । यया परि देखण ।
रेखाटिलें यण । निवृत्तिराज ग माय ॥ ८ ॥
रेखणीया पाठीं । अलक्ष रेखा उठी ।
अैसि हे गोमटि । निज पत्रिका ग माय ॥ ९ ॥
अवो माय अवो माय । न बोलतें बोलों काय ।
अैसीया निवृत्तिराज हे । बोलिलें ग माय ॥ १० ॥
चहु रकानियावर । माया अलक्षदकार ।
निवृतीचा कर । चपल मिरवे ग माय ॥ ११ ॥
मिरवे चपळपणी । चहुं रकानियांमाजि देखणी ।
माजि डोळियांचे पाणी । खेळतसे ग माय ॥ १२ ॥
नवला नवल करणें । नवलानवल केणें ।
कैसें लिहिलें डोळियान । हे पत्र ग माय ॥ १३ ॥

अक्षर डोळा आणि । अवीनाश लेखणी ।
माजि बरवालि (?) देखणी । लिहितसे ग माय ॥ १४ ॥
पाहाते पाहातेस या परि । पाहाण्यातील सरी ।
या अक्षरे मोहरी । वरियलि ग माय ॥ १५ ॥
चहुं रकानियावरिलना । सहज उर्ध्व काना ।
हा देखणियच्या मना । उतरला ग माय ॥ १६ ॥
हे ते ते हे ना । समरसी हा माना ।
डोळियाच्या लेखना । निवृति लिही ॥ १७ ॥
चपळपण डोळा । अव्यक्त अक्षर सोहळा ।
चपळपण लिहिला । जाणीवी ग माय ॥ १८ ॥
हा निर्जि निज निवृतिनाथ । अनक्षरें उमटवीत ।
चपळपण हातें । मिरवे ग माय ॥ १९ ॥
सहजाचा हा तुळा । घेतांचि माथुला ।
अव्यक्त बुद्धि वोळला । हे पत्रिकेवरी ग माय ॥ २० ॥
तौ ते लेखना अतौतलें । हे पाहणें वोळलें ।
या निवृतिचे बोलें । लागे ग माय ॥ २१ ॥
आतां अक्षरें पत्रिके वरी । कीं पत्रिका या अक्षरि ।
आगागि अक्षरें सारी । हे पत्रिकाचि ग माय ॥ २२ ॥
तेंवि निजी निजवोळि । उमरलिया स्वमेळि ।
हे देखणि आली । लेखणी ग माय ॥ २३ ॥
देखणि देखे देखणिया । होऊनि लेखणि लिहितया ।
चपळपण मिरवतया । निवृती राज करी ग माय ॥ २४ ॥
अक्षरें लिहिती करासी । कर मिरवे अक्षरासी ।
हा निवृति रासि । आगांगसि ग माय ॥ २५ ॥
मौनाचे निज मौन । अलक्ष गहन ।
शुन्यि शुन्यि शुन्य भाजोन । देखणिचि देखणी लिहितसे ग माय ॥ २६ ॥
अनंगाच्या वदनि । अनिर्वाच्या बोलणि ।
हे मौन विसर्जुनि । लेखन ग माय ॥ २७ ॥
प्रवण पदींचिया वोळि । अव्यक्त मांडणि आलि ।
तें च्यारि शून्य पुसिलि । या वोलि गे माय ॥ २८ ॥
आतां न बोलोनि बोलें । हें धवळ पत्र आलें ।
धवळचा धामीं उगवलें । धवळसि गे माय ॥ २९ ॥

धवळिया वोळि । अवळिया बोलि ।
धवळि धवळा चपळि । हे गुरु देखणि ग माय ।। ३० ।।
आतां शब्द निःशब्द बोभाट । या टाकिलें परतट ।
निवृति कर सुभट । खेळतसे ग माय ।। ३१ ।।
जेथें तेथें नवानव रस । हा दाहावा देहे सुरस ।
येकादश निवृति राजहंस । ग माय ।। ३२ ।।
हंसा हंस करोनि निरास । परापर सुरस ।
त्या आंतु वे । ग माय ।। ३३ ।।
अनाक्षरी वोवाळिला । हेतु निरहेतु केला ।
लेखकु लेख सारिला । अलक्षा परि ग माय ।। ३४ ।।
अलक्षालक्ष । अैसें हे अपरोक्ष ।
दिसाटले स्वक्ष । संरक्षणालागि ग माय ।। ३५ ।।
या गैनिनाथें पचिकावळि । मंगळधाम वोवाळलि ।
निवृतिराज आणिलीं । देखणी लेखना ग माय ।। ३६ ।।
पत्रिका हे उमानाथ । शुत्ध बुत्ध श्वेत ।
पाठि पोटी घोटी । ते देखणीया ग माय ।। ३७ ।।
आदिनाथे पाहिली । केवळी लाविली ।
अव्यक्त मुद्रिका केलि । सगोजरी ग माय ।। ३८ ।।
निज मुद्रिका केली । परि जि जो नाही दिधली ।
मु (?) सता आलि । आदिनाथें ग माय ।। ३९ ।।
अनंगा निज मुद्रिका । या पत्री उमरलि देखा ।
हा आदिनाथें सिका । केला ग माय ।। ४० ।।
गैबिआ हात । धरी मछंद्रनाथ ।
हे पत्रिका शुरू होत । तीय ठाई ग माय ।। ४१ ।।
अैसी शुरू जाली । शुरू करूं पाहिली ।
तवं पाहण पाहुं आलि । पाहातीया माजि ग माय ।। ४२ ।।
सहज मछंद्रनाथ । पावलि गोरक्षातें ।
हे निशान निजाचतें । करूनि वाचि ग माय ।। ४३ ।।
मग गोरक्षीकरें । हा गैनिपंथ उतरे ।
सहज मोहरी मोहरे । निवृति वरी ग माय ।। ४४ ।।
निवृति उफराटी । पत्रिका करोनि उलटि ।
ज्ञानिया समसाटी । अंबर भरी गे माय ।। ४५ ।।

सहज ज्ञाननाथ । मुक्ताईस दावीत ।
सोपानासि म्हणत । वाचु ये बा ।। ४६ ।।
अनिर्वाच्य वाची । हे पुरवणी विनंतीचि ।
अैसीया पत्रिकेची । मानुरेया ।। ४७ ।।
हे विनंती कि विनता । ना अनिर्वाच्य विनविता ।
अगम्या गम्य डोळां घालितां । हे विनंती नव्हे ग माय ।। ४८ ।।
अव्यक्ताचिय चौकिवरी । हे पत्रिका ठेविली अैसीय परी ।
मुक्ताबाई म्हणे वाचुं सारी । न करडं स्वारी जनासि ग माय ।। ४९ ।।
जनवन निरंजन । या माजि अैसें लेखण ।
हे गुरु देखणीचें लेखन । अैसें ग माय ।। ५० ।।
गर्जोनि निवृति ज्ञाननाथ । अैसें अबोलण वाचित ।
हे पत्र प्रतिष्टानि येकनाथ । वाचिल वो माय ।। ५१ ।।
स्वति श्री विजय श्री जयश्री । या ठाकलिया निवृतितीरी ।
तैं हे पत्रिका सारी । लिहि डोळा ।। ५२ ।।
हे अगम्य कल्याण पत्र । असी रेखणी अनंगाचे नेत्र ।
पत्र वाचितया मंगळधाम स्वतंत्र । अर्पिल ग माय ।। ५३ ।।
इति श्री निवृति प्रसाद । ज्ञानदेवेन विरचिले ।
लेखन वर्णनंन्नाम । प्रकर्ण संपूर्णमस्तू ।।
शालीवाहन शेके १७३० ।। विभव नाम सवछर ।
फाल्गुण वद्य चतुर्थि भानुवारी ग्रंथ समाप्त ।।

।। श्री सदाशिवार्पणमस्तु ।।

राजे श्रीरामस्वामी मोहिते यांचा ग्रंथ

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

[ह्या प्रकरणाचा तपशीलवार अभ्यास व्हावयास हवा. पूर्वी काही प्रयत्न झालेले आहेत. (डॉ. पेठे कृत श्रीज्ञानदेव याग्यज्ञदर्शन, पृ. २५०) तथापी सर्व विवाद्य प्रश्नांचा निर्णय झालेला नाही. म्हणून मूळ संहिता प्रसिद्ध केलेली आहे.]

ग्रंथपरीक्षण व परिचय

'स्टडीज इन इंडॉलॉजी अँड मिडिव्हल हिस्टरी'
प्रा. गणेश हरी खरे गौरव ग्रंथ

संपादक :– म. श्री. माटे आणि गो. त्र्यं. कुलकर्णी
प्रकाशक :– जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९७४
पृष्ठे, ३०४। चित्रसंख्या १६। किंमत रु. ४०

'स्टडीज इन इंडॉलॉजी अँड मिडिव्हल हिस्टरी' हा प्रा. गणेश हरी खरे यांचा गौरवग्रंथ त्यांच्या पंचाहत्तराव्या वर्षी प्रसिद्ध झाला ही गोष्ट औचित्यपूर्ण आहे. प्रा. खरे यांचा इतिहास क्षेत्राच्या विविध शाखांतील व्यासंग आणि अधिकार भारतातच नव्हे तर भारताबाहेरही सर्वांना ज्ञात आहे. या ग्रंथामध्ये प्रा. खरे यांच्या भारतातील व भारताबाहेरील चाहत्यांचे आणि शिष्यांचे लेख समाविष्ट आहेत. ग्रंथामध्ये एकूण तेवीस इंग्रजी आणि सहा मराठी लेख आहेत. प्रागैतिहासिक काळापासून पेशवेकाळाच्या अखेरीपर्यंत, बंगालमधील आदिमानव, महाजनपद, 'महाभारतातील सूर्याचे मूर्तिस्वरूप, 'अजिष्ठा आणि समकालीन शिल्प,' 'विदर्भातील बौद्ध अवशेष', 'छत्रपती संभाजी आणि राजपुत्र अकबर', 'गोव्याचे कागदपत्र,' 'खाजगी कागदपत्र', 'लोकसाहित्य-ऐतिहासिक खुणा' इ० विविध विषयांवरील लेख या ग्रंथामध्ये अंतर्भूत करण्यात संपादकांचे परिश्रम आणि योजकता दिसून येते. 'महाभारतातील सूर्याचे मूर्तिस्वरूप' या लेखात केवळ महाभारतातील सूर्याच्या मूर्तिस्वरूपाची चर्चा केली नसून सूर्याच्या उपलब्ध शिल्पावशेषांचीही लेखकाने जाणकारपणाने दखल घेतली आहे. उदा० महाभारतातील नागराजाने सूर्याच्या रथाचे सारथ्य केले हा पुरावा सादर करून लेखकाने अहिच्छत्र येथे तशाच तऱ्हेची मृण्मय मुद्रा सापडल्याचे नमूद केले आहे. सांची आणि भारुथ येथील शिल्पपरंपरा दक्षिणेकडे प्रसृत करण्याचे महान् कार्य विदर्भमार्गे झाले याचे पुरावे पौनी येथील उत्खननात सापडले. तेथे सापडलेला स्तूप, लेख आणि शिल्पे यांची साक्षेपी चर्चा 'विदर्भातील बौद्ध अवशेष' या लेखात केली आहे. स्थानाच्या ऐतिहासिकतेला सांस्कृतिक इतिहासात फार महत्त्वाचे स्थान आहे. स्थानांचा इतिहास, त्यांचे शासकीय यंत्रणेतील महत्त्व, त्यांची नावे या सर्व गोष्टींचा नव्याने अभ्यास होऊ लागला आहे. ज्योतिषविद् भास्कराचार्यांचे जन्मस्थान विज्जलविद् म्हणजे मराठवाड्यातील बीड होय हे लेखकाने साधार दाखविले आहे. गजानन

हे महाराष्ट्रातील एक आवडते दैवत आहे. त्या देवतेचे प्राचीनत्व वैदिक काळापर्यंत होते ही गोष्ट 'श्रीगणेश-गजानन-पुरातत्त्वीय मागोवा' या लेखावरून दिसून येते. याशिवाय 'विष्णुकुंडीच्या इंद्रपूर दानपत्रावर नवीन प्रकाश', 'पंढरपूर-कल्पित आणि सत्य', 'मोगलाच्या हेरखात्याची नवी बाजू' इत्यादी लेख उल्लेखनीय आहेत. सर्वच लेखांचा दर्जा उत्तम असल्यामुळे सर्वांचा परामर्श घेणे स्थलाअभावी शक्य नाही.

शोभना गोखले

प्राचीन भारतीय नाणकशास्त्र

लेखकः- मधुकर केशव ढवळीकर
प्रकाशक :- महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळासाठी कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे. १९७५
पृष्ठे २९०, चित्रे ९, किंमत रु. २५.

मातृभाषेतून शिक्षण देण्याचे तत्त्व विद्यापीठांनी मान्य केल्यावर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाने पदव्युत्तर विद्यार्थींसाठी तिरनिराळ्या विषयांवरील ग्रंथनिर्मितीची जी योजना हाती घेतली तिला आता चांगलीच गती आलेली आहे. प्राचीन इतिहासलेखनामध्ये प्राचीन काळातील नाण्यांचा; अस्सल साधने म्हणून अंतर्भाव करावा लागेल. नाणकशास्त्रावरील सर्व ग्रंथ इंग्रजीत आहेत. मराठी भाषेत या विषयावर आत्तापर्यंत कोणताही ग्रंथ उपलब्ध नव्हता. "**प्राचीन भारतीय नाणकशास्त्र**' ह्या ग्रंथाच्या प्रकाशनामुळे मराठीतून इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या जिज्ञासूंची फार मोठी सोय झाली आहे, इतकेच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांनाही नाणकशास्त्राची रूपरेषा समजावून घेण्यास हा ग्रंथ उपयुक्त ठरेल.

पदव्युत्तर परीक्षेचा अभ्यासक्रम डोळ्यांपुढे ठेवून या ग्रंथाची रचना झाली आहे. या ग्रंथात भारतीय नाण्यांचे प्राचीनत्व, नाणकशास्त्राचे महत्त्व, आहत नाणी, विदेशी राजांची नाणी, सातवाहनांची नाणी, क्षत्रपांची नाणी, जनपदांची नाणी, गुप्तसम्राटांची नाणी, दक्षिणभारतातील नाणी इत्यादी विषयांचा उहापोह केला आहे. याशिवाय नाणी पाडण्याचे तंत्र आणि प्राचीन भारतीय मुद्रा अशी दोन परिशिष्टेही जोडली आहेत. नाणी पाडण्याच्या तंत्राच्या या परिशिष्टामधे प्राचीन काळी नाण्यांच्या टांकसाळी कशा होत्या याचे विवेचन लेखकाने केले आहे. त्यासाठी रोहतक आणि पंजाबमधील सुनेत या गावी सापडलेल्या साच्यांची चित्रे दिली आहेत. सातवाहन आणि क्षत्रपांच्या नाण्याचे साचे कोण्डापूर येथील उत्खननात सापडले आहेत, यावरून प्राचीनकाळी नाण्यांची बनावट कशा तऱ्हेने होत असे याची वाचकांना पूर्ण कल्पना येते.

निरनिराळ्या राजवंशातील राजांच्या नाण्याच्या दर्शनी बाजू आणि मागील बाजूचे लेखकाने बारकाव्याने वर्णन दिले आहे. त्यामुळे नाण्याची यथार्थ कल्पना येते. महाराष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने सातवाहनांची नाणी व क्षत्रपांची नाणी अतिशय महत्त्वाची आहेत. सातवाहन वंशातील प्रमुख राजांची नाणी ग्रंथात वर्णन केली आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्या मांडलिकांची नाणी पुस्तकात समाविष्ट केली आहेत. क्षत्रप राजांची नाणी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सापडतात. वाकाटकांचे किंवा राष्ट्रकूटांचे स्वतंत्र चलन असल्याचा पुरावा आज तरी उपलब्ध नाही. या काळात क्षत्रपांचीच नाणी प्रचलित होती. क्षत्रपांची नाणी त्यावर राजाची प्रतिमा, संवत्सर, राजाचे ब्राह्मी लिपीत नाव असल्याने देखणी दिसत आणि ती चांदीची असल्याने त्याचे मूल्य सर्वसामान्य लोकांनाही पटणारे होते. त्या दृष्टीने या ग्रंथात सातवाहन आणि क्षत्रपांच्या नाण्यांची चित्रे जास्त दिली असती तर या नाण्यांचे स्वरूप कळण्यास अधिक मदत झाली असती.

शोभना गोखले

पुराभिलेखविद्या

लेखिका : शोभना गोखले

प्रकाशक : महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळासाठी
कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे १९७५
पृष्ठे २८६, तक्ते १५, चित्रे ३६, किं. रु. ३५

मातृभाषेतून दिलेले शिक्षण उपयुक्त आणि जास्त प्रभावी ठरते ही गोष्ट तत्त्वतः सर्वमान्य आहे. या तत्त्वानुसार महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाने पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथनिर्मितीची जी योजना हाती घेतली आहे त्यातील प्राचीन इतिहास विभागाशी संबद्ध असा 'पुराभिलेख-विद्या' हा ग्रंथ आहे. अशा तऱ्हेचा मराठीतील हा पहिलाच ग्रंथ आहे. प्राचीन-काळी भारतात ग्रीस, इटली आणि चीन या देशांप्रमाणे इतिहासकार नव्हते. पुराणाच्या कर्त्यांनी सत्य व कपोलकल्पित यांची अशी सरमिसळ केली आहे की इतिहासाचे साधन म्हणून त्यांचा उपयोग फारसा होत नाही. त्यामुळे शिलालेख आणि ताम्रपट ही प्राचीन भारतीय इतिहासलेखनाची अस्सल साधने ठरली आहेत. या साधनांचा शास्त्रशुद्ध अभ्यास व्हावा हा हेतूने भारतातील बहुतेक विद्यापीठांनी पुरातत्त्व व प्राचीन भारतीय संस्कृती या विषयांमध्ये 'पुराभिलेख-विद्या' हा विषय अंतर्भूत केलेला आहे.

प्रस्तुत ग्रंथ मुख्यतः परीक्षेच्या अभ्यासक्रमानुसार लिहिला आहे. या ग्रंथामध्ये पुराभिलेख म्हणजे काय ? भारतातील लेखनकला, ब्राह्मी लिपीची उत्पत्ती, लेखन साहित्य, अंकलेखन, भाषा, कालगणनापद्धती इत्यादी विषयांचा समावेश असून सम्राट् अशोकाचे गिरनार येथील लेख, याशिवाय भारतीय इतिहासाच्या पुनर्रचनेमध्ये जे इतर महत्त्वाचे लेख आहेत ते या पुस्तकात घातले आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचा घाट ठरविण्यात ज्या लेखांचा मौलिक वाटा आहे अशा लेखांचाही या ग्रंथात समावेश केला आहे.

प्रतिपाद्य विषय स्वभावतः सोपा नाही. परंतु लेखिकेला गेली अनेक वर्षे हा विषय शिकविण्याचा अनुभव असल्यामुळे सर्व विवेचन केवळ सुलभ नव्हे तर मनोरंजकही झालेले आहे. लेखवाचन कष्टसाध्य आहे, पण ती विद्या एकदा हस्तगत झाली म्हणजे किती नव्या नव्या दालनांत आपण प्रवेश करू शकतो हे समजते, औत्सुक्य उत्पन्न होते. यातच लेखिकेचे यश सामावलेले आहे.

BRITISH POLICY IN INDIA

1858–1905 by S. Gopal
Cambridge University Press
Edition 1965, Indian Edition 1975
Price : Rs. 50/–

1857–58 marks the suppression of the revolt, and the beginning of the rule of the British Crown that replaced the rule of East India Company in India. The present book, " British Policy in India " 1858–1905, deals with the first period of the British rule, distinctly bringing out the ideas, policies and reflections of the British aspirations about India. The entire work is based on papers, documents, published and unpublished, of the British Statesmen as well as the Viceroys and other administrators appointed by the Crown to implement the ideas or policies of the British Parliament. As one Viceroy succeeds the other we find a very distinct change in the attitude according to the views either of the Liberal party or of the Conservative party in dealing with the Indian Empire. From the records presented by the

author it appears that there were two distinct schools of thought one representing the Conservative, the other Liberals ideals.

The regimes of all the Viceroys have been discussed from the British view point only. The author has tried to bring out in particular the ups and downs the Liberal policy suffered and the reasons for the choice of various Viceroys like Mayo, Northbrook etc has been aptly brought out. He has rightly condemned the policy of Lytton in respect of the educated Indians and newspapers. This policy of Lytton was not taken lightly by Gladstone therefore he openly asserted that 'India would be governed for the good of the Indian people and that no consideration of selfish interest would divert the British from their first and highest duty.' But unfortunately, 'Because of the personal limitations of the Viceroy, his principles suffered a reverse.' Dufferin acted more to the liking of the Conservatives than of his own party. Thus the hopes and ideals of the Liberal party were belied.

Followed by Dufferin, the next ten years rule was dull and uninspiring from the point of view of both the parties. The Liberal ideals were not at all put in practice. By 1898 Curzon was sent as Viceroy and he restored the main features of the Mayo tradition viz permanecy for British rule in India. He geared up the government machinery but the growth of political self-consciousness developed during the past twenty five years did not give Curzon the desired effect. 'Efficient administration is not a fulfilment but a process and this was beyond the understanding of Curzon.' And everybody would certainly agree with the authors' conclusion about Curzon.

After Curzon we find the political scene in India changing very fast. The author rightly concludes that 'India after 1905 and new interests and objectives compelled new lines of British policy.'

The style and presentation of the subject matter has been made most interesting by the author. And it is certainly a good

addition to the existing books on British history in India, particularly in understanding the British rulers' point of view while governing their ' hundred million of Eastern people. '

G. T. Kulkarni

इतिहास विचार तरंग

लेखक, प्रा. दि. के. देशपांडे,

प्रकाशक, लेखक, पुणे,

अंमळनेर येथे वीस वर्षांहून अधिक काळ इतिहास अध्यापनाचे कार्य करणारे प्रा. देशपांडे यांनी वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या निबंधांचा हा संग्रह आहे. सगळे निबंध संशोधनात्मक नाहीत, चिंतनपर, इतिहास या विषयाच्या अध्ययनासंबंधी, संशोधनासंबंधीही आहेत. १८५७ च्या उठावावरील लेख मीमांसात्मक आहे, सरदेसाई व आळतेकर हे गुणग्रहणपर तर १७१४ चा अहमदाबाद येथील हिंदू-मुसलमान दंगा हा लेख माहितीपर आहे. एकंदरीने सर्वच पुस्तक वाचनीय झाले आहे, व त्याचे प्रमुख कारण म्हणजे लेखकाची चिंतनशीलता हेच होय.

विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९७५ : संपादक म. रा. जोशी, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर. पृ. २५० मूल्य रु. १०|–

प्रस्तुत वार्षिकात दरसालप्रमाणे संस्कृत, संस्कृती व इतिहास यासंबंधीचे अभ्यासपूर्ण निबंध संग्रहित केलेले आहेत. यज्ञयागातील विधी व त्यांचा अन्वयार्थ व्याकरण, शिल्प, प्राचीन मराठी साहित्य या सर्वांवरील निबंधांच्या जोडीला प्रा. ग. ह. खरे यांनी नागपूरला गुंफलेल्या 'मुसलमानकालीन महाराष्ट्र' या व्याख्यानमालेचे सविस्तर इतिवृतहि यात दिलेले आहे.

Bose N. K., **The Structure of Hindu Society,** (Translated from the Bengali with an introduction and notes by Andre Beteille).

Orient Longman, New Delhi, 1975, p. 171, Rs. 35=00

An interpretation of the Hindu social structure is offered here by the late N. K. Bose. Sri Bose was an anthropologists and his very close acquaintance with various semi-civilized tribes of India like the Mundas and the Kolus have afforded him

significant glimpses into the manner in which Hindu Society developed. Especially important are his observations in connection with the gradual evolution of the most notable feature of the Hindu society viz. the caste-system. The synthesis of social, cultural and racial groups and traditions evident in the caste system is well brought out. How this system underwent changes all this time according to the requirements of a community or tribe that had to be integrated or that had changed a profession and what were the criteria for assigning a particlar status to a community is set forth clearly on p. 94. 95. and p. 99. The work contains a fund of very useful and interesting information about the rituals and customs prevalent among various castes. This is skillfully utilised to trace the origin of various Hindu Festivals like 'holi'. Although small this is a very thought provoking work.

भा. इ. सं. मंडळाच्या स्वीय ग्रंथमालेतील

क्र. १०६ चे प्रकाशन

प्रसिद्ध झाले !

ऐतिहासिक फार्शी साहित्य

सहावा खंड

संपादक : प्रा. ग. ह. खरे   सहसंपादक : डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी

प्रा. ग. ह. खरे आणि त्यांचे सहकारी यांनी बिकानेर येथील दप्तरातून नकलून आणलेल्या कागदांपैकी प्रस्तुत खंडात औरंगजेबाच्या कारकीर्दीतील पहिल्या २० वर्षांचे (इ. स. १६६५ ते इ. स. १६८५ या काळातील) अस्सल अखबार (बातमीपत्रे) संग्रहीत करण्यात आले आहेत. मूळ पर्शियन अखबार व त्यांचा मराठी अनुवाद अशा प्रकारे अत्यंत महत्त्वाची अशी ६०० बातमीपत्रे या खंडात अभ्यासकांना वाचावयास मिळतील.

(पृष्ठसंख्या ४४०, मूल्य १५ रुपये)

चिटणिसांचे निवेदन–

(१) वार्षिक संमेलन, शक १८९८
(२) श्रीज्ञानदेव चरित्रविषयक चर्चासत्र
(३) शिवराजनीतिविषयक चर्चासत्र
(४) वार्षिक वर्गणी

(१) प्रतिवर्षाप्रमाणे मंडळाचे वार्षिक संमेलन, शनिवार दिनांक २९ मे, रविवार दि. ३० मे आणि सोमवार दि. ३१ मे १९७६ असे तीन दिवस साजरे होईल. नेहमीप्रमाणे निबंधवाचन, व्याख्याने, सदीप व्याख्याने इत्यादी कार्यक्रम होतील. संशोधक–अभ्यासकांनी निबंध पाठवून आणि प्रत्यक्ष उपस्थित राहून, चर्चेत भाग घेऊन संमेलन यशस्वी करावे अशी विनंती आहे.

संमेलनातील निबंध शक्य तो त्रैमासिकात समाविष्ट करण्याचा प्रयत्न असतो. या दृष्टीने, आपले निबंध, टीपा इत्यादि सहित परिपूर्ण, मुद्रण प्रत म्हणून उपयोगात येतील असे पाठवावेत.

(२) संमेलनाबरोबर या वर्षी मंडळाने आणखी दोन चर्चासत्रे आयोजित केलेली आहेत. शक १८९७ हे संत ज्ञानदेवांच्या सप्तम जन्मशताब्दीचे वर्ष. मंडळाने यानिमित्त आपल्या परंपरेस अनुसरून श्रीज्ञानदेवांच्या चरित्रविषयक विविध समस्यांचा साधार परामर्श घेणारे चर्चा-सत्र दिनांक २६, २७ व २८ मे ७६ या तीन दिवस घेण्याचे ठरविले आहे. श्रीज्ञानदेवांच्या वाङ्मयाचे सुमारे पंचवीस अभ्यासक त्यासंबंधी तपशीलवार चर्चा करून या समस्यांचा उलगडा करण्याचा यत्न करतील.

(३) जून १९७६ च्या पहिल्या आठवड्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजनीतीचा विविध दृष्टिकोनातून परामर्श घेणारे दुसरे एक चर्चासत्र घेणाचा मानस आहे. या सत्रातही अधिकारी विद्वानांच्या निबंधांचे वाचन आणि त्यावर चर्चा असा उपक्रम होईल.

संत ज्ञानदेव आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याविषयी आस्था असणाऱ्या सर्वांनी या कार्यक्रमांना उपस्थित राहून सक्रीय भाग घ्यावा अशी विनंती आहे.

चर्चासत्राचा वृत्तान्त, परगावच्या अभ्यासकांचा प्रवास व निवास खर्च, अशा गोष्टींसाठी बराच खर्च करावा लागणार आहे. शिवराजनीती चर्चासत्राला महाराष्ट्र

शासनाने काही अनुदान दिले आहे. ज्ञानदेव चर्चासत्राला अनुदान मिळवण्याचा यत्न चालू आहे. या शासकीय सहाय्याच्या जोडीला, चर्चासत्रे यशस्वी करण्यासाठी विद्याप्रेमी धनिक आणि संशोधन संस्था पुढे येतील असा विश्वास वाटतो. आर्थिक सहाय्य मिळवण्याचे यत्न सुरूच आहेत. मंडळाच्या सर्व सभासदांनी व हितचिंतकांनी आपल्या शक्तीप्रमाणे आर्थिक सहाय्य पाठवून चर्चासत्रे यशस्वी करण्यास हातभार लावावा अशी प्रार्थना आहे.

शक १८९८ ची वार्षिक वर्गणी सर्व सभासदांनी सत्वर भरावी अशी विनंती आहे.

वैशाख शु. १ श. १८९८ चिटणीस
(३ । ४ । १९७६)

English Summaries :

(1) **Kulkarni G. T. and Kantak M. R.,** Some known and unknown Maratha Families in Mughal Service during Shivaji's. times. The paper gives information regarding a number of Maratha families, contemporary to Shivaji, who had accepted service under the Mughals. It is based on unpublished archives in the possession of the Andhra Pradesh Government. The authors conclude that like the Deccan Sultanates, the Mughals also depended heavily on the support of local chieftains and hereditary landlords of the Maratha land.

(2) **Kelkar Y. N.,** Jyotirlinga Trimbakeshvar and Joglekar. One of the leading families of Trimbakeshvar was that of the Joglekars. This is an account of the rise of that family during the early part of the eighteenth century based on documents available with that family. This family ably served the Peshwas.

(3) **Kantak M. R.,** New light on the diplomatic relations of the Deccani powers during the times of Sambhaji. This is an account of the political manoeuvres of the various powers involved

in the struggle for supremacy in the Deccan immediately after the death of Shivaji. The events described have taken place around 1683 and the document on which the narration Is based is probably a news report sent by a confidential agent of the Mughals.

(4) **Shobhana Gokhale**, An unpublished Brahmi inscription from Kanheri. The inscription records a grant of a cave, a water pond and a sum of money towards a Buddhist establishment by one Lavanika, wife of a merchant–prince from Kalyana.

(5) **Vasudha Gande**, The Krishnakarnamrit of Lilashuka Bilvamangala. An appreciation of the critical edition of Krishna Karnamrit brought out by Francis Wilson. The author has also given a brief introduction to the poem itself

(6) **Ganesh Thite**, The Samrajyalakshmitpithika from Akashbhairavkalpa–an encyclopediea of magico-religious formulea. An introduction is the magico-religious nature of the work which is mainly a work on polity.

(7) **Usha Ranade**, Prabhuvamsha, a study. A brief study of ' Prabhuvarasha ', a poetic account of the life of Sawai Madhavrao. According to the author the account is contemporary to the Peshwa and touches upon events not mentioned in other sources.

(8) **Goswami R. P.**, Report on the sixty second, ' Annual ' A brief introduction to the various papers read and discussed during the three days, 31 st May, 1 st and 2 nd June 1975.

(9) **Kanade M. S.**, The identity of Jnyanadeva, author of Lekhan–varnanam, Discussion on the date and identity of the author, Jnyanadeva of a small manuscript named -' Lekhan-Varnanam' in the Tanjore Saraswati Mahal Library.

(10) Book notices and reviews.

□ □ □

४६२

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकासंबंधी केंद्र
शासनाच्या नियमानुसार द्यावयाची माहिती [१९५६ चे नियम ८ नमुना ४]

१. प्रकाशन स्थळ : भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

२. प्रकाशनकाल : त्रैमासिक (सध्या वार्षिक)

३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : चिं. ना. परचुरे, भारतीय, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०
मुद्रणस्थळ : ज्ञानविलास प्रेस, पुणें २

४. प्रकाशकाचे नाव, चिं. ना. परचुरे, भारतीय, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, राष्ट्रीयत्व व पत्ता : १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०

५. संपादकाचे नाव, म. श्री. माटे, भारतीय, कार्यकारी संपादक.
राष्ट्रीयत्व व पत्ता : भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०.

६. मालक व पत्ता : भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०.

मी चिटणीस प्रगट करतो की, माझी माहिती व विश्वास याप्रमाणे वर दिलेला तपशील अचूक आहे.

३०–४–७६

चिं. ना. परचुरे
[चिटणीस]